# प्रकरण २ इतिहासपूर्व महाराष्ट्र

**अश्मयुग**

जगातील अतिप्राचीन मानवाचा शोध आफ्रिका खंडातील इथिओपिया या देशात लागला. तिथे हडार नावाच्या गावी, अफार नदीच्या खोऱ्यात एका तेरा वर्षाच्या मुलीचा सांगाडा सापडला. तो छत्तीस लाख वर्षापूर्वीचा आहे. त्या मुलीचे 'ल्युसी' असे नाव ठेवले आहे. तिची उंची १.०७ मीटर आणि वजन ३० किलो असावे. यानंतरच्या मानवी शरीराचे अवशेष केनिया, टांझानिया आणि दक्षिण आफ्रिकेत मोठ्या प्रमाणावर सापडले आहेत. हे मानव माकडसदृश (hominin) होते. त्यांच्या अभ्यासावरून मानवाच्या उत्क्रांतीचा अभ्यास करता येतो. हे आफ्रिकेत घडून आले. याचे मुख्य कारण असे, की चिंपांझी आणि मानव यांचे गुणसूत्र (DNA) ८० टक्के समान आहे आणि ते आफ्रिकेत सापडत असल्यामुळे मानवी उत्क्रांती तिथे घडून आली असावी यात शंका नाही.

इथिओपिया आणि आफ्रिकेत इतरत्र सापडलेला मानव हा दगडी हत्यारे घडवत नव्हता. तो शिकारही क्वचित, आणि तीही लहान प्राण्यांची करत असावा. खरे म्हणजे तो शिकारी नव्हता, तर उलट त्या काळातील अजस्र प्राणी त्याची शिकार करीत असत. अलीकडे प्राप्त झालेल्या पुराव्यावरून इतर प्राण्यांनी अर्धवट खाऊन टाकलेल्या मांसावर तो गुजराण करत असे. तिथे सापडलेल्या हाडांच्या तुकड्यावरील जंगली श्वापदांच्या नखांच्या आणि दातांच्या खुणांवरून हे सिद्ध होते.

मानवाने हळूहळू प्रगती करण्यास सुरुवात केली. सुमारे पंचवीस लाख वर्षांपूर्वी तो दगडी हत्यारे करू लागला. दगडगोट्यांचे एका बाजूचे छिलके काढून तो मांसाचे तुकडे करू लागला. या मानवाला Homo habilis (म्हणजे हाताचा उपयोग करणारा मानव) असे नाव शास्त्रज्ञांनी दिले आहे. त्याची उंची सुमारे १.१७ ते १.५२ मीटर होती आणि वजन ४१ किलोच्या आसपास सपास असावे. त्याचा मेंदू ७४०० सेंटिमीटर इतका लहान होता. हा मानव दीर्घकाळ टिकून राहिला. तो आद्य पुराश्मयुगाच्या अंतापर्यंत वावरत होता.

दोन-तीन लाख वर्षापूर्वीपासून दोन पायांवर ताठ उभा राहणारा मानव अवतरला. त्याला Homo erectus अशी संज्ञा आहे आणि त्यानंतर ७०-८० हजार वर्षापूर्वी आपल्यासारख्या मानवाचे आगमन झाले. त्याला Homo sapien sapiens, म्हणजे शहाणा, विचार करणारा माणूस समजले जाते. तो आपल्यासारखा होता. मध्य पुराश्मयुगीन मानवाचा मेंदू थोडा मोठा, सुमारे १००० सेंटिमीटरचा होता. त्याचे वजन ५९ किलो व उंची १.५७-१.७२ मीटर होती. Homo habilis पेक्षा तो थोडा मोठा होता.

Homo sapiens या मानवाची प्राचीनता दीड ते दोन लाख वर्षे मागे जाते. त्याची उत्क्रांती आफ्रिकेतच झाली आणि तिथून तो जगभर पसरला. भारतात पुराश्मयुगीन स्थळे अनेक असली, तरी मानवाच्या अस्थी मात्र सापडत नाहीत. अलीकडे हाथनोरा (मध्य प्रदेश) इथे एका स्त्रीच्या कवटीचे अवशेष सापडले. ती तीन लाख वर्षांपूर्वीची आहे. तसेच केरळमध्ये एका उत्तर पुराश्मयुगीन लहान मुलाची कवटी सापडली आहे.

अलीकडे अतिरमपक्कम (तामिळनाडू) येथील उत्खननात सापडलेल्या दगडी हत्यारांचा काळ शास्त्रोक्त कसोट्या लावून केलेल्या कालमापनानुसार १५ लाख वर्षे मागे जातो. त्यावरून युरोपपेक्षा खूप आधी अश्मयुगीन मानव आफ्रिकेतून भारतात येऊन पोहोचला होता, हे सिद्ध झाले आहे.

भारतातील अश्मयुगीन अवशेष दहा लाख वर्षांपूर्वीचे आहेत आणि महाराष्ट्रातील साडेतीन लाख वर्षापूर्वीचे आहेत. नारायणगावजवळ (जिल्हा पुणे) बोरी या गावी काही दगडी हत्यारे सापडली. त्यांवर राखेचा थर आढळून आला. ती राख शास्त्रोक्त कालमापनानुसार, चार लाख वर्षांपूर्वी इंडोनेशियात झालेल्या ज्वालामुखीची होती, असे आता सिद्ध झाले आहे. त्या नंतरच्या काळातील दगडी हत्यारे नेवासे (जिल्हा अहमदनगर) इथे चिरकी नाल्याच्या परिसरात डॉ. (कै.) सांकलिया यांना सापडली. या स्थळाचा सखोल अभ्यास झाला आहे. आता महाराष्ट्रात बहुतेक सर्व भागांत - कोकणातसुद्धा - पुराश्मयुगीन हत्यारे सापडली आहेत.

पुराश्मयुगाची चार कालखंडांत विभागणी केलेली आहे. ती खालीलप्रमाणे - १. आद्य पुराश्मयुग (१० लाख ते १ लाख वर्षापूर्वीपर्यंत). २. मध्य पुराश्मयुग (१ लाख ते ४०,००० वर्षापूर्वीपर्यंत). ३. उत्तर पुराश्मयुग (४०,००० ते १५,००० वर्षांपूर्वीपर्यंत). ४. मध्याश्मयुग (१५,००० ते ४,००० वर्षापूर्वीपर्यंत).

**१. आद्य पुराश्मयुग (Lower Palaeolithic)**

या काळात मानवाने नद्यांच्या खोऱ्यातून वस्ती केली. त्याचे मुख्य कारण म्हणजे पाणी. त्यामुळे शिकार करता येण्याजोगे प्राणीही तिथे येत. शिवाय दगडी हत्यारे तयार करण्यासाठी लागणारे दगडगोटे नदीच्या पात्रात विपुल असतात. अश्मयुगीन मानव शिकारीवर आपली उपजीविका करीत असे, असा आजवर समज होता. परंतु आफ्रिकेत नव्याने सापडलेल्या पुराव्याचा विचार करता, तो शिकारी नसून त्याचीच इतर वन्यप्राणी शिकार करीत असावेत, असे म्हणण्याची वेळ आली आहे. तिथे गुहेत माणसाने खाऊन टाकलेली प्राण्यांची हाडे सापडली. परंतु त्यांवर आधीच्या इतर प्राण्यांच्या दातांच्या आणि नखांच्या खुणा होत्या; म्हणजे इतर जंगली श्वापदांनी अर्धवट खाऊन टाकलेल्या मांसावर माणूस जगत होता असे सिद्ध होते. खोलवर विचार केल्यास हे पटण्यासारखे आहे. तसे पाहिल्यास परमेश्वराने निर्माण केलेल्या प्राणिमात्रांत मानव सर्वांत दुबळा प्राणी आहे. त्याच्याजवळ वाघ- सिंहासारखी शक्ती तर नाहीच, पण दात आणि नखेही नाहीत. त्यामुळे त्यालाच इतर प्राण्यांपासून धोका होता. त्याच्याजवळ होती फक्त बुद्धी. तिचा उपयोग करून त्याने सर्व प्राणिमात्रांवर वर्चस्व गाजविले.

**दगडी हत्यारे**

भारतात आद्य पुराश्मयुगीन दगडी हत्यारे विपुल सापडतात. भारतातील पहिले अश्मयुगीन दगडी हत्यार मद्रासजवळ (हल्लीचे चेन्नई) पल्लावरम येथे रॉबर्ट ब्रूस फूट या ब्रिटिश भूशास्त्रज्ञाला सापडले. तेव्हापासून गेल्या दीडशे वर्षात जवळजवळ साऱ्या देशभर ही हत्यारे सापडली आहेत. आता त्या काळातील पर्यावरणाचा अभ्यास चालू आहे. भारतातील हवामान पाहिल्यास असे ध्यानात येईल की, अश्मयुगीन मानव सर्व प्रकारच्या पर्यावरणात राहत होता. काश्मीरसारख्या थंड हवेच्या बर्फाळ प्रदेशातही पुराश्मयुगीन मानव राहत होता आणि इतर भागातील उष्ण, दमट हवामानातही तो वावरत होता. नदीकाठी उघड्यावर त्याचे वास्तव्य होते आणि भीमबेटका (मध्य प्रदेश) येथील गुहेत आणि शिलाश्रयातही त्याने आसरा घेतला होता. कोणत्याही प्रकारच्या पर्यावरणाशी मिळतेजुळते घेण्याचे मानवी कसब लक्षणीय आहे.

महाराष्ट्रात आद्य पुराश्मयुगीन स्थळे अनेक सापडली आहेत. त्यांपैकी नेवासे आणि गंगापूर (जिल्हा नाशिक) या दोन ठिकाणी शास्त्रशुद्ध उत्खनन झाले आहे आणि त्यांचे सविस्तर वृत्तांतही उपलब्ध आहेत. तिथे सापडलेल्या दगडी हत्यारांमध्ये हातकु-हाडी (handaxe) आणि परशू (cleaver) ही प्रामुख्याने आहेत. भारतात इतरत्र ही हत्यारे क्वार्टझाईट दगडाची बनविलेली असली तरी महाराष्ट्रामध्ये तो दगड फारसा सापडत नसल्यामुळे इथे विपुल असलेल्या ट्रॅप किंवा बेसॉल्ट दगडाची ती बनवली गेली. त्यात हातकु-हाड आणि फरशी ही प्रामुख्याने आढळतात. (आ. २.१). त्याशिवाय गोलाकार, धारदार कड असलेले हत्यारही आहे. हातकुऱ्हाडीचा उपयोग कंदमुळे उकरून काढण्यासाठी होत असावा. फरशीचा उपयोग शिकारीत मारलेल्या प्राण्याच्या मांसाचे तुकडे करण्यासाठी आणि त्याची कातडी सोलून साफ करण्यासाठी होत असावा. गोलाकार हत्यार (discoid) हाडे फोडून त्यातील मॅरो काढण्यासाठी असणार. ही हत्यारे तयार करताना ज्या पातळ चिपा पडत, त्यांचाही तासणीसारख्या लहान हत्यारांसाठी उपयोग केला जात असावा. विशेष महत्त्वाचे म्हणजे युरोप, आशिया आणि आफ्रिकेत सर्वत्र अशा प्रकारची हत्यारे सापडली आहेत.

भारताचा आकार साधारण दोन लाख वर्षांपूर्वी स्थिर झाला. तिबेटचे पठार निर्माण झाले. हिमालयाची उंची आजच्याएवढी वाढली. त्याची उंच शिखरे बर्फाच्छादित राहिल्यामुळे भारतीय उपखंडातील हवामान कोरडे झाले आणि समुद्राची पातळी खाली गेली. राजस्थानात दिदवाना, गुजरातेत जुनागढ आणि महाराष्ट्रात पैठण येथे त्याचा पुरावा मिळतो. राजस्थानातील हवामान शुष्क असल्यामुळे तिथे पर्यावरणीय बदलाचा पुरावा अधिक चांगल्या स्थितीत उपलब्ध आहे. पुण्याच्या डेक्कन कॉलेजच्या विद्वानांनी त्याचा सखोल अभ्यास केला आहे. तेथील दगडी हत्यारांचा कालनिर्णय

**पर्यावरण**

तप्तदीपन (Thermoluminescence) चाचणीने निश्चित केला आहे. त्यावरून असे दिसून येते की, सुमारे १,९९,००० ते १,४०,००० या काळात तिथे आद्य पुराश्मयुगीन मानव वावरत होता. त्या काळात वाळूच्या टेकड्या तयार होण्यास सुरुवात झाली. शुष्क हवामान झाल्यामुळे वाळूचे कण उडून आले आणि त्यांच्या टेकड्या तयार झाल्या. या काळात युरोपात तिसरे हिमयुग (Riss) अवतरले होते आणि तिथे प्रचंड थंडी होती. त्यामुळे पाण्याच्या साठ्यांचे बर्फात

रूपांतर होऊ लागले होते. परिणामी समुद्राची पातळी जवळजवळ १०० मीटर खाली गेली. ज्यावेळी युरोपमध्ये प्रचंड थंडी असते त्यावेळी आपल्याकडे हवामान शुष्क होऊन दुष्काळ पडतात, असे शास्त्रज्ञांना आढळून आले आहे. हे नेमके का घडते याचे मात्र अद्याप स्पष्टीकरण देता येत नाही. महाराष्ट्रात त्या काळी हवामान शुष्क दुष्काळी असावे.

**वसतिस्थान**

पुराश्मयुगीन मानवाला कायम अन्नाच्या शोधार्थ फिरावे लागत असल्याने एके ठिकाणी फार काळ राहणे शक्य नव्हते. शिवाय महाराष्ट्रात नर्मदेतल्या खोऱ्यातल्यासारख्या नैसर्गिक गुहा किंवा शिलाश्रये नसल्यामुळे त्याला उघड्यावर नदीकाठी राहणे प्राप्त होते. हल्लीच्या आदिम जमातींच्या जीवनपद्धतीवरून असे म्हणता येईल, की एखाद्या सोयिस्कर ठिकाणी त्याच्या टोळीचा काही काळ मुक्काम असावा. त्याच्या आसमंतातील प्राणी, कंदमुळे आणि फळे मोसमानुसार कमी झाली म्हणजे तिथून तळ उठून जात असावा व दुसरीकडे मुक्काम केला जात असावा. कंदमुळे, फळे गोळा करण्याचे काम स्त्रियांचे; शिकार पुरुष करीत असावेत यात शंका नाही. हत्यारे तयार करण्याचे काम अर्थातच पुरुषाचे आणि अन्न तयार करणे स्त्रीचे. मुक्कामाच्या आसपास १० मैलांच्या (१६ किलोमीटर) प्रदेशात उपलब्ध असलेले अन्न ते मिळवित असावेत, असे हल्लीच्या चेंचू, गोंड, येरुकुल या आदिम जमातींच्या जीवनपद्धतीवरून वाटते.

या दगडी हत्यारांना त्यांच्या धाटणीवरून ॲश्युलियन असे नाव दिले आहे. या प्रकारची हत्यारे सर्वप्रथम फ्रान्समध्ये १८५० च्या सुमारास पॅरिसच्या सेंट ॲश्युल या उपनगरात सापडली, म्हणून त्यांना ॲश्युलियन असे नाव दिले गेले. युरोपभर, आफ्रिकेत आणि आशियात अनेक ठिकाणी या शैलीने घडविलेली हत्यारे सापडतात. हे त्या काळातील एक प्रकारचे जागतिकीकरणच म्हणावे लागेल. सुरुवातीच्या काळात ही हत्यारे ओबडधोबड होती. हातावर नियंत्रण नसल्यामुळे खोल, मोठाल्या चिपा निघत. परंतु मानवाला जसजसा अनुभव मिळत गेला तसतशी अधिक सुबक हत्यारे तयार होऊ लागली. छोट्या, पातळ चिपा काढून हत्यार घाटदार दिसू लागले. सुरुवातीस फक्त एका बाजूच्या चिपा काढीत. नंतर दोन्ही बाजूंनी काढू लागले. त्यामुळे हत्यार अतिशय कलापूर्ण झाले. काही हातकुन्हाडी आणि फरश्या तर इतक्या सुरेख आहेत की, त्यांना अश्मयुगीन कलावस्तू म्हणता येईल. ही ॲश्युलियन हत्यारे आफ्रिकेत पंधरा लाख वर्षांपूर्वी तयार करण्यात आली आणि तिथून भारतात दहा लाख वर्षांपूर्वी आली असावीत, असे तज्ज्ञांचे मत आहे. ताठ उभा राहणारा मानव (Homo erectus) दहा लाख वर्षांपूर्वी आफ्रिकेतून बाहेर पडला आणि अरबस्तान, इराण, अफगाणिस्तानमार्गे भारतात आला असावा. त्याच्या आधीचा (Homo habilis) (म्हणजे हाताचा उपयोग करणारा) ज्याने प्रथम हत्यारे तयार केली आफ्रिकेच्या बाहेर पडला नव्हता. त्याचा मेंदू आकाराने लहान (७४० सेंटिमीटर) होता आणि तो उंचीने कमी (१.१७-१.५२ मीटर) होता. वजन ५९ किलो. त्या मानाने सोळा लाख वर्षांपूर्वीचा, ताठ उभा राहणारा Homo erectus अधिक उंच होता (१.०७-१.७२ मीटर), त्याचा मेंदूही मोठा (८५०-१०००० सेंटिमीटर) होता. तो दहा लाख वर्षांपूर्वी मोरोक्कोमार्गे फ्रान्स आणि स्पेनमध्ये गेला त्या आधी तो आशियात आला होता. नर्मदेच्या खोऱ्यात हाथनोरा इथे सापडलेली कवटी ही त्या Homo erectus ची असावी असे तज्ज्ञांचे मत आहे.

अतिप्राचीन मानव (नरवानर) चाळीस लाख वर्षांपूर्वी जरी अवतरलेला असला, तरी दगडी हत्यारे घडविण्यास त्याने सुमारे तीस लाख वर्षांपूर्वी सुरुवात केली आणि पंचवीस लाख वर्षांपूर्वीपासून ती पूर्व आणि दक्षिणेत सापडू लागली. सुरुवातीची हत्यारे अगदी साधी आहेत. नदीकाठचे गोटे घेऊन त्यांच्या कडेच्या दोन-चार चिपा काढून वाकडीतिकडी धार असलेली हत्यारे केली गेली. ओल्डुवायच्या खोऱ्यात अशी हत्यारे आणि त्यांबरोबर सापडलेली, शिकारीत मारलेल्या प्राण्यांची हाडे यांवरून हे स्पष्ट होते. हाडातील मॅरो खाण्यासाठी ती तयार केली गेली असावीत.

महाराष्ट्रातच नव्हे, तर भारतात इतरत्रही ॲश्युलियन पद्धतीच्या हत्यारांच्या आधीची हत्यारे सापडत नाहीत. तेव्हा ॲश्युलियन मानव भारतात बाहेरून आला यात शंका नाही. या पद्धतीच्या हत्यारांचे दोन गट पाडता येतात. काही हत्यारे थोडी ओबडधोबड आहेत, ती सुरुवातीच्या काळातील असावीत. परंतु नंतर अनुभवामुळे आणि तंत्र विकसित झाल्यामुळे सुबक हत्यारे घडविण्यात आली. त्यांचे आकारही सुबक आणि घाटदार आहेत. मोठाले कळपे न काढता, लहान, पातळ चिपा आणि खपल्या काढून उत्कृष्ट हत्यारे बनविली गेली. परंतु दोन्ही गटांतील हत्यारांचा कालनिर्णय करण्यासाठी उत्खनित थरांचा पुरावा उपलब्ध नाही. केवळ त्यांच्या शैलीनुसार काही आधीची आणि काही नंतरची

असावीत असे वाटते. परंतु प्रगती अत्यंत धिमी होती, तीन लाख वर्षापूर्वीपासून एक लाख वर्षापर्यंत ती वापरात होती, तेव्हा थोडीफार प्रगती झाली असावी असे गृहीत धरले जाते.

ही हत्यारे वापरण्यासाठी ती दांडक्यात किंवा मुठीत बसविली होती का, असा प्रश्न उभा राहतो. या संदर्भात काही हातकुऱ्हाडींच्या खालच्या बाजूस खुणा आढळतात. त्यामुळे त्या लाकडी मुठीत बसविल्या असाव्यात, असे काहींचे मत आहे. हातकुऱ्हाडीसारखे हत्यार ज्या मानवाने निर्माण केले असेल, तो अत्यंत बुद्धिमान असावा असे शास्त्रज्ञांचे मत आहे. त्याचा बुद्ध्यंक खूपच वरचा असावा.

**अन्न**

पुराश्मयुगाच्या सुरुवातीच्या काळात माणूस इतर प्राण्यांनी अर्धवट खाऊन टाकलेले मांस खात होता. परंतु थोड्याच काळात त्याने दगडी हत्यारे तयार करण्यास सुरुवात केल्यानंतर तो शिकार करू लागला. त्या काळातील मारलेल्या प्राण्यांची हाडे त्यांच्या जीवाश्मांच्या (fossils) स्वरूपात आढळतात. भारतात नर्मदेच्या खोऱ्यात ती विपुल सापडतात. महाराष्ट्रात मांजरा नदीच्या खोऱ्यात ती खूप मोठ्या प्रमाणावर सापडली आहेत. त्यात जंगली बैल, जंगली हत्ती, जंगली घोडा, पाणघोडा, गेंडा इत्यादी आहेत. त्यांच्या अभ्यासावरून तत्कालीन पर्यावरणाची कल्पना करता येते. पुराश्मयुगीन मानवाला त्याचे अन्न वसतिस्थानाच्या आसपास उपलब्ध होते. किंबहुना, ते असेल तेथेच त्याचा वावर होता. दहा-पंधरा मैलांच्या परिसरातील साधनसंपत्तीवर त्याचा अधिकार होता. अर्थात त्यामुळे शेजारच्या टोळीशी संघर्ष होणे स्वाभाविक होते. कंदमुळे फळे-बिया गोळा करणे हे स्त्रीचे काम आणि शिकार करणे हे पुरुषाचे, अशी कामाची वाटणी असणार, हे उघड आहे. शिकारीतसुद्धा शक्यतो छोट्या प्राण्यांची शिकार अधिक. कुटुंबातील पुरुष आणि मुले ती करीत असणार. परंतु अन्न निसर्गात उपलब्ध असले, तरी ते मिळविणे हे अतिकष्टाचे काम होते.

अन्नाची कायम टंचाई असल्यामुळे हे करावे लागे. लहान प्राणी, पक्षी यांची शिकार कुटुंबातल्या पुरुषांना करणे शक्य असते. परंतु हत्तीसारख्या मोठ्या प्राण्याची शिकार हे अवघड काम असते. त्यासाठी काही टोळ्यांना एकत्र यावे लागत असावे. हत्तीची शिकार म्हणजे ४०० किलो मांस. एकच टोळी ते संपवू शकणार नाही. दोन-चार दिवसांत संपवले नाही तर ते सडणार. तेव्हा असा प्रसंग फार विरळा. त्यासाठी काही टोळ्या एकत्र आल्यामुळे सांघिक भावना निर्माण होते. विवाह निश्चित केले जातात आणि नातेसंबंध निर्माण होतात. भांडणतंटे मिटवले जातात. टोळ्यांच्या भौगोलिक सीमा निश्चित केल्या जातात.

**समाज**

आद्य पुराश्मयुगीन समाजजीवनाचा अभ्यास करण्यासाठी आणखी एक महत्त्वाचे साधन शास्त्रज्ञांना आता उपलब्ध झाले आहे. मानवाची उत्पत्ती माकडापासून झाली किंवा नाही याबद्दल वाद असला, तरी गोरीला, चिंपांझी यांचे निरीक्षण केल्यास मानवी जीवनावर प्रकाश टाकता येतो. वारुळालील मुंग्या, वाळवी खाण्यासाठी गोरीला झाडाची फांदी तोडून, काठीचे टोक चावून टोकदार करून, तिचा भाल्यासारखा उपयोग करतात. त्यांच्याही टोळ्या असतात आणि प्रत्येक टोळीचा एक म्होरक्या असतो. मानवाने तसेच केले असावे. लाकडी भाले युरोपात सापडले आहेत. पुराश्मयुगीन समाज कसा असावा यासंबंधी काही निष्कर्ष काढण्यात आले आहेत. हल्लीसुद्धा जगात अनेक ठिकाणी आदिम जमाती संस्कृतीच्या प्राथमिक अवस्थेत आहेत. शिकार आणि कंदमुळे, फळे यांवर त्यांची उपजीविका अवलंबून असते. भटके जीवन ते जगतात, उघड्यावर राहतात. आफ्रिकेतील कुंग-बुशमेन ही जमात अद्याप आद्य पुराश्मयुगीन जीवन जगत आहे. इतरही काही जमाती आहेत. भारतातील चेंचूही त्यासारखेच आहेत. त्यांच्या जीवनपद्धतीचा सखोल अभ्यास झाला आहे. त्यावरून आद्य पुराश्मयुगीन मानवाचे जीवन कसे असावे, याची थोडीफार कल्पना येते.

आद्य पुराश्मयुगीन मानवाच्या छोट्या टोळ्या असाव्यात. एका टोळीत वीस ते पन्नास माणसे असावीत. या टोळ्यांच्या मध्ये संघर्ष होत असणार. तो कमी व्हावा म्हणून स्त्रियांची देवाणघेवाण होत असावी. त्यातून पुढे विवाहसंस्था उगम पावली. सगोत्र विवाह निषिद्ध आहे, यामागे हीच भावना आहे. आजही महाराष्ट्रातील खेडेगावात वधू दुसऱ्या गावातील असते, कारण गावातील बहुसंख्य लोकांचे एकमेकांशी नातेसंबंध असतात. त्यामुळे। हे करावे लागते.

भाषा दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात गेल्या चाळीस-पन्नास वर्षांत पुरातत्त्वविद्येत विलक्षण प्रगती झाली आहे. कालमापनाच्या काही शास्त्रीय कसोट्या शोधून काढण्यात आल्या. त्यामुळे पुरातत्त्वज्ञांना मानवी संस्कृतीच्या

इतर अंगांकडे लक्ष देण्यास वेळ मिळाला. आता तर अश्मयुगीन मानवाच्या डोक्यात काय विचार असावेत, तो चिंतन कशाप्रकारे करत असावा, याची चर्चा चालू आहे. तो कोणती भाषा बोलत असावा यासंबंधी आडाखे बांधण्यात येत आहेत. आफ्रिकेत अश्मयुगीन मानवाच्या अस्थी, कवट्या मोठ्या प्रमाणावर सापडल्यामुळे हे शक्य झाले. मानवी घशात स्वरपेटी (voice box) असते आणि त्यामुळे काही विशिष्ट आवाज काढणे आपल्याला शक्य होते. आफ्रिकेत सापडलेल्या मानवी कवट्यांच्या अभ्यासावरून मानवशास्त्रज्ञांनी त्यातील स्वरपेटी कशा प्रकारची असावी आणि त्यावरून त्या मानवाला कोणते स्वर त्यातून काढणे शक्य होते, याचा आता अभ्यास सुरू केला आहे. निअंडरथल माणसाच्या स्वरपेटीवरून असे दिसते की, त्याला ए, ई, ऊहे स्वर काढता येणे शक्य नव्हते, परंतु त्याचा अर्थ त्याला बोलता येत नव्हते असा नाही. आजही आपल्या मराठी मंडळींना काही उर्दू शब्दोच्चार नीट करता येत नाहीत, हे ध्यानात घेतले म्हणजे त्याची कल्पना येईल.

**२. मध्य पुराश्मयुग**

सुमारे एक लाख वर्षापूर्वी हिमयुग संपत आले होते आणि आद्य पुराश्मयुग सरत आले. या तिसऱ्या आंतरहिमयुगाच्या काळात (Inter-glacial) मध्य पुराश्मयुगाची (Middle Palaeolithic) सुरुवात झाली. या काळातील दगडी हत्यारे युरोपमध्ये सर्वप्रथम मूस्टिये या गावी सापडली. त्यामुळे या संस्कृतीला 'मूस्टेरियन' असे नाव दिले आहे. भारतात मात्र १९५० सालापर्यंत मध्य पुराश्मयुगीन हत्यारे सापडलेली नव्हती. डेक्कन कॉलेज, पुणे यांच्यातर्फे डॉ. ह. धी. सांकलिया, नगर जिल्ह्यात नेवासे येथील ताम्रपाषाणयुगीन वस्तीचे उत्खनन करत होते. तेथे जवळच असलेल्या चिरकी नाल्याच्या परिसरात, प्रवरेच्या खोऱ्यात त्यांना काही लहान दगडी हत्यारे सापडली. तिथेच त्यांना आद्य पुराश्मयुगीन हत्यारेही मिळाली होती. ही छोटी चिपांची हत्यारे हुबेहूब युरोपमधल्या मूस्टेरियन हत्यारांसारखी होती. त्यावरून ती मध्य पुराश्मयुगीन होती हे सिद्ध झाले. आफ्रिकेतही अशा प्रकारची हत्यारे सापडतात. नेवाशाचा शोध लागल्यानंतर भारतात आजवर अनेक मध्य पुराश्मयुगीन स्थळांचा शोध लागला आहे. या संस्कृतीला भारतात 'नेवासियन' असे नाव दिले गेले आहे.

**हत्यारे**

मध्य पुराश्मयुग सुमारे १ लाख वर्षापूर्वीपासून सुरू झाले ते ३५००० वर्षांपर्यंत टिकले. या काळातील हत्यारे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. आद्य पुराश्मयुगीन हत्यारे क्वार्टझाइट आणि बेसाल्ट दगडाची केलेली होती. त्याऐवजी आता निरनिराळ्या रंगांचे चर्ट जातीचे दगड आणि गारगोटी (चाल्सीडोनी) यांची हत्यारे बनवण्यात आली (आ. २.२). हे दगड खूप कणखर असल्यामुळे हत्यारे अत्यंत धारदार आणि टिकाऊ होतात. दुसरे म्हणजे पूर्वीच्या हातकुऱ्हाडी, फरश्या इत्यादी प्रकारची हत्यारे यांचा वापर कमी झाला. हे का झाले असावे? याचे एक कारण म्हणजे पर्यावरणीय बदल, हवामान थंड झाले होते, पाऊस चांगला पडत होता. त्यामुळे वनस्पती भरपूर उगवल्या. जंगले वाढू लागली. त्यात लहान हरणे इत्यादी प्राणी आणि पक्षी आले. त्यांची शिकार करण्याकरता कुऱ्हाडी आणि फरश्यांचा फारसा उपयोग नव्हता, तर बाणासारखी टोकदार हत्यारे आणि शिकार कापण्यासाठी धारदार कड असलेल्या हत्यारांची गरज होती. त्यामुळे या काळातील हत्यारांत टोकदार टोच्या (points) आणि धारदार कड असणाऱ्या विविध प्रकारच्या तासण्या (scrapers) प्रामुख्याने आढळतात. ही हत्यारे आकाराने छोटी असल्याने ती हाडाच्या किंवा लाकडाच्या खोबणीत बसवून चाकू किंवा सुरीसारखे हत्यार बनवीत. क्वचित हातकु-हाडी आणि फरश्याही आढळतात.

ही मध्य पुराश्मयुगीन हत्यारे आद्य पुराश्मयुगीन हत्यारांच्या नंतरच्या काळातील आणि उत्तर पुराश्मयुगाच्या (Upper Palaeolithic) आधीची आहेत, हे स्तरशास्त्राच्या पुराव्यावरून सिद्ध होते. परंतु भारतातील मध्य पुराश्मयुग हे युरोप-आफ्रिकेतील मध्य पुराश्मयुगाच्या नंतरचे आहे, असे शास्त्रीय कालमापनावरून वाटते. रेडिओ- कार्बन चाचणीनुसार त्याचा काळ ४०,००० ते १५,००० वर्षे असा येतो. सर्वांत प्राचीन काळ पुण्यात मुठेच्या काठी सापडलेल्या मध्य पुराश्मयुगीन हत्यारांच्या पुराव्याचा आहे. तो ३९,००० वर्षे इतका आहे. परंतु युरेनियम-थोरियम कसोटीनुसार राजस्थानातील दिदवाना येथील मध्य पुराश्मयुगीन हत्यारे एक लाख ते दीड लाख वर्षापूर्वीची असल्याचे सिद्ध झाले आहे, हे या संदर्भात नमूद करणे आवश्यक आहे. भारतातील मध्य पुराश्मयुगीन हत्यारे मातीच्या ज्या थरात सापडतात, ते थर वाळूचे असून नदीला पूर आल्यामुळे तयार झालेले आहेत. त्यावरून त्याकाळी नदीत वर्षभर भरपूर पाणी असावे

असे भूशास्त्रज्ञांचे मत आहे. पाऊस चांगला पडत असावा आणि मोठाले पूर आल्यामुळे त्यांनी वाळू वाहून आणली असे म्हणता येईल.

या काळात लाकडी भाले आणि हस्तिदंताची व हरणाच्या शिंगाची हत्यारेही वापरात आली. युरोपात ती सापडतात, परंतु आपल्याकडे मात्र अद्याप मिळालेली नाहीत. या काळात दगडी हत्यारे तयार करण्याचे 'एक अभिनव तंत्र' वापरात आले. फ्रान्समध्ये लव्हालव्हा गावी मिळालेल्या हत्यारात ते प्रथम दृष्टोत्पत्तीस आले म्हणून त्याला 'लव्हाल्व्हा तंत्र' असे नाव दिले आहे. त्यानुसार जे हत्यार तयार करावयाचे, त्याचा गाभा (core) आधी तासून तयार करून घेत आणि नंतर त्याच्या खपल्या काढून हत्यार तयार करीत असत. भारतातही अशा प्रकारची हत्यारे सापडतात.

त्या काळात जंगलांची चांगली वाढ झालेली असावी आणि माणूस जंगलांच्या कडेने वावरत असावा. तिथे त्याला त्याचे अन्न मिळत होते. या या काळातील प्राण्यांचे जीवाश्म मोठ्या प्रमाणावर आढळतात. महाराष्ट्रात लातूर जिल्ह्यात मांजरा नदीच्या काठी तर त्यांचा खच पडलेला आहे. त्यात जंगली बैल, घोडा, पाणघोडा, गेंडा, हत्ती यांची हाडे आहेत. त्यांची शिकार प्रसंगोपात्त होत असे; परंतु छोटे प्राणी, हरणे, पक्षी व कंदमुळे फळे यांवर अधिक भिस्त असे. या काळात हवामान थंड आणि दमट असल्यामुळे माणसाला उघड्यावर राहणे फारसे शक्य नव्हते. गुहा, शिलाश्रये यात त्यांची वस्ती अधिक असे. मोठ्या शिकारीसाठी मोहिमेवर गेल्यानंतर झाडाच्या फांद्या तोडून त्यांचा आसरा उभा करत.

महाराष्ट्रात शिलाश्रये नाहीतच, नैसर्गिक गुहाही फार थोड्या आहेत. परंतु त्यात मानवी वस्तीच्या खुणा नाहीत. त्यामुळे झाडाझुडपांचा उभा आसरा करत असावेत. अन्न आद्य पुराश्मयुगीन मानव जिथे शिकार मिळेल तिथे मांस खाऊन टाकीत असे, हे प्राण्यांच्या हाडांवरून आणि हत्यारांच्या पुराव्यावरून स्पष्ट होते. हत्यारे मोठी आणि ओबडधोबड असल्यामुळे शिकारीसाठी बरोबर बाळगणे हे जिकिरीचे काम होते. शिकार केल्यानंतर हत्यारे तयार करून त्यांचा वापर केला जात असावा. परंतु मध्याश्मयुगात यात बदल झाला. लहान प्राण्यांची शिकार (उदा. हरणे इत्यादी) प्रामुख्याने करीत असल्यामुळे आणि तासण्यांसारखी छोटी हत्यारे बरोबर नेता येत असल्यामुळे शिकार केलेल्या प्राण्याची चिरफाड करून आवश्यक तेवढे भाग तळावर आणले जात असावेत, असे शास्त्रज्ञांना आढळून आले आहे. याचा अत्यंत सखोल अभ्यास प्राध्यापक बिनफर्ड यांनी केला. फ्रान्समध्ये त्यांना काही मूस्टेरियन स्थळांच्या निरीक्षणात विशिष्ट स्थळी प्राण्यांची विशिष्ट हाडे सापडली. हल्लीचे अलास्कामधील न्यूनामित एस्किमो वर्षातून एकदा कॅरिबूंची शिकार करतात आणि वर्षभराचे मांस, कातडी, हाडे सांभाळून ठेवतात. प्राण्याचे संपूर्ण धूड वस्तीवर नेण्यात काही अर्थ नसतो. तेव्हा त्याचे विशिष्ट भाग ते आणतात. अलास्कामधील पर्यावरण हिमयुगासारखेच आहे. त्याचा उपयोग करून बिनफोर्ड यांनी मध्य पुराश्मयुगीन मानव असे करीत असावा हे सोदाहरण दाखवून दिले आहे.

या काळातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे, मानवाला अग्नी निर्माण करण्यात यश आले. अग्नीवर नियंत्रण, तो पाहिजे तेव्हा पेटवता येणे आणि धुमसत ठेवणे हे मानवी संस्कृतीच्या विकासातील अत्यंत महत्त्वाचे पाऊल होय. या काळात मानव गुहेत आणि शिलाश्रयात राहू लागला. आवश्यक तिथे झाडझाडोरा उभा करून निवारा तयार करू लागला. त्यामुळे थोडीफार उसंत त्याला मिळाली. निरीक्षण करता येऊ लागले. जंगलात झाडे वादळात एकमेकाला घासून आग लागताना त्याने पाहिले असणार, तेंव्हा लाकूड घासून आग पेटवणे त्याला जमले असावे. भारतात या काळातील आगीचा पुरावा उपलब्ध नसला, तरी युरोपमध्ये तो उपलब्ध झाला आहे. तिथे गुहेत लहानसा खड्डा खणून त्यात अग्नी पेटवल्याचा पुरावा आहे. खड्याभोवती दगड ठेवले जात. त्यामुळे आग खड्यात सीमित राहत असे.

आद्य पुराश्मयुगात वावरणारे निरनिराळे प्राणी या काळातही अस्तित्वात होते आणि त्यांचे जीवाश्मही सापडले आहेत. असे असले तरी दगडी हत्यारांच्या आकारावरून शिकार प्रामुख्याने छोट्या प्राण्यांची केली जात असावी, हे स्पष्ट होते. तसेच कंदमुळे-फळे खाण्याचे प्रमाण या काळात वाढले असावे.

**३. उत्तर पुराश्मयुग**

चाळीस हजार वर्षांपूर्वी पर्यावरणात हळूहळू बदल घडून येऊ लागला. ते अधिकाधिक थंड होऊ लागले. उबदार हवामानात राहणाऱ्या मध्य पुराश्मयुगीन मानवाला ते मानवण्यासारखे नव्हते. युरोपात थंडी वाढल्यामुळे आपल्याकडे पावसाचे प्रमाण कमी होऊन दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. झाडाझुडपांचे खराटे होऊ लागले, आडोसा कमी

झाल्यामुळे प्राणी दुर्मीळ झाले. नद्या, तळी आटू लागली. या साऱ्याचा अनिष्ट परिणाम मानवी जीवनावर आणि प्राणिमात्रांवर होऊ लागला. त्यांना तग धरून राहणे अशक्य झाले.

पर्यावरणीय बदलामुळे मध्य पुराश्मयुगीन निअंडरथल मानव उत्तर पुराश्मयुगात टिकाव धरू शकला नाही. तो नाहीसा झाला. त्याचे काय झाले, हे सांगता येत नाही. एक नवीन मानववंश या काळात अवतरला. युरोपमध्ये त्याला होमो सेपियन्स 'शहाणा माणूस' असे नाव दिले गेले आहे. आपल्याकडेही तो आलेला असावा असा कयास आहे. तो मध्य पुराश्मयुगीन निअंडरथल मानवासारखा नव्हता. दिसायला आपल्यासारखाच होता. पूर्वीच्या निअँडरथल माणसापेक्षा त्याचा मेंदू : मोठा होता आणि तो त्याच्यापेक्षा बुद्धिमान होता, यात शंका नाही.

**पर्यावरण**

या काळात पर्यावरण अत्यंत प्रतिकूल होते. युरोपात चौथे हिमयुग अवतरले होते आणि आपल्याकडे दुष्काळी हवामान होते. नंतरच्या काळात म्हणजे मध्ययुगात इसवी सन १४००-१८०० या काळात असेच हवामान युरोपमध्ये होते. त्याला 'छोटे हिमयुग' (Little Ice Age) नाव दिले गेले आहे. त्यावेळी आपल्याकडे भयानक दुष्काळ वारंवार पडत होते, याचा लिखित पुरावा उपलब्ध आहे. तेव्हा उत्तर पुराश्मयुगातसुद्धा अशाच प्रकारचे पर्यावरण असावे हे स्पष्ट होते. त्यामुळे या काळात मानवी वस्ती फार तुरळक होती. उत्तर पुराश्मयुगीन फार थोडी स्थळे भारतात आहेत. महाराष्ट्रात तर हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी आहेत. त्यांपैकी पाटणे (जि. जळगाव) येथील उत्तर पुराश्मयुगीन स्थळाचे शास्त्रशुद्ध उत्खनन झाले आहे. इतक्या प्रतिकूल परिस्थितीतही नव-पुराश्मयुगीन मानव केवळ त्याच्या बुद्धिमत्तेच्या जोरावर समर्थपणे तोंड देऊन टिकून राहिला हे सिद्ध होते.

**वसाहती**

मध्य पुराश्मयुगीन मानवांचा सर्वत्र वावर होता, परंतु उत्तर पुराश्मयुगात लोकसंख्या कमी झाली असावी, कारण पर्यावरण अत्यंत प्रतिकूल होते. त्यामुळे जंगले कमी झाली. परिणामतः प्राणी, पक्षी कमी झाले. पाऊस खूप कमी झाला. रानटी हत्ती, म्हैस, बैल, घोडा यांची हाडे सापडतात. परंतु शहामृगाच्या अंड्याच्या पुराव्यावरून वाळवंटी हवामान होते असे म्हणता येईल. या काळात कुत्रा माणसाळवला गेला. त्याचा शिकारीत उपयोग होत असे. त्याची हाड़े उत्खननात सापडतात. परंतु मानव शिकारीपेक्षा वनस्पतिजन्य अन्नावर अधिक अवलंबून राहिला. तसेच या काळात मासेमारी सुरू झाली. दातेरी गारेची पाती लाकडात बसवून मत्स्यबाण तयार केले जात. शिवाय माशांची हाडे उत्खननात सापडतात. काही ठिकाणी पाट्यांसारखे वापरून गुळगुळीत झालेले दगड सापडले आहेत. तेव्हा अन्न तयार करण्याच्या प्रक्रियेसाठी त्यांचा उपयोग होत असणार. जंगली धान्य वाटण्यासाठी त्यांचा वापर होत असावा.

हत्यारे उत्तर पुराश्मयुगीन दगडी हत्यारे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. मध्य पुराश्मयुगीन तासण्या आता फारश्या उपयोगाच्या नव्हत्या, त्यांच्याऐवजी सर्वत्र छोटी, पात्याची (blade) हत्यारे सापडतात. मध्याश्मयुगात तासणी (scraper) तयार करण्यासाठी त्या आकाराचा गाभा (core) आधी तयार करून घेत. पण त्यापासून एकच तासणी काढता येत असे. उत्तर पुराश्मयुगात चिपांऐवजी लहान पातळ पात्यांची हत्यारे वापरात आली (आ. २.३). ती अत्यंत विपुल प्रमाणात आढळतात. ती तयार करण्यासाठी गारेचा दगड (chalcedony) वापरत. आधी त्याचा गाभा (core) चांगला तासून तयार करत. त्याचा वरचा भाग सपाट (prepared platform) करीत. दगडी हातोड्याने उभे ठोके देऊन त्यापासून छोटी पाती एकामागून एक काढली जात. हे गाभेही मोठ्या प्रमाणावर सापडले आहेत. काही वेळा गारेचा दगड खूप अंतरावरून आणावा लागत असे.

या तंत्रानुसार काढलेली पाती इतकी छोटी आहेत की, पाते हातात धरून ते कसे वापरत असावेत याची शंका येते. परंतु हाडाच्या किंवा लाकडाच्या खोबणीत अशी काही पाती चिणून बसविली की त्याचा छानसा चाकू किंवा सुरी तयार होत असे. अशी दांडक्यात बसविलेली हत्यारेही उत्खननात सापडली आहेत. गारेच्या दगडाचे पाते, तो कणखर असल्यामुळे, अत्यंत धारदार आणि टिकाऊ असते. अशा पात्यांची, टोचे, सुया, करवतीसारखे दाते असलेली पाती अशी हरत-हेची हत्यारे बनविता येतात. या काळात हाडांची हत्यारेही बनविण्यात आली. तीही अत्यंत प्रभावी असत. हाडे फोडून त्यातील मॅरो खाल्यानंतर हाडांच्या ढलप्या हत्यारे बनविण्यासाठी फारच उपयुक्त. त्यांच्या चाकू, सुऱ्या उत्तम. सुयाही या काळात प्रथम वापरात आल्या. तेंव्हा चामड्याची वस्त्रे शिवून तयार करत असावेत. युरोपात या काळात

चौथे हिमयुग अवतरले होते. त्यामुळे चामड्याची वस्त्रे तयार केली गेली. या काळातील एक दगडी हत्यार स्क्रूड्रायव्हरसारख्या टोकाचे आहे. त्याला burin असे नाव आहे. खरे म्हणजे ते उत्तर पुराश्मयुगाचे व्यवच्छेदक लक्षण समजले जाते. युरोपात ते सर्वत्र आढळते. परंतु भारतात त्या मानाने दुर्मीळ आहे. त्याचा मुख्य उपयोग गुहेच्या किंवा शिलाश्रयाच्या भिंतीवर किंवा हाडावर अथवा दगडावर कोरीव काम करण्यासाठी होत असे. युरोपात असे कलावशेष अनेक ठिकाणी सापडले आहेत. भारतात मध्य प्रदेशात नर्मदेच्या खोऱ्यातील गुहांतील आणि शिलाश्रयातील काही कोरीव आकृती आणि रंगीत चित्रे उत्तर पुराश्मयुगीन असावीत असा तज्ज्ञांचा कयास आहे. महाराष्ट्रात फक्त पाटणे (जिल्हा जळगाव) इथे कोरीव नक्षी असलेले शहामृगाच्या अंड्याचे तुकडे सापडले. ते कोरीव काम ब्युरीनच्या साहाय्याने केले असावे.

**अन्न**

पर्यावरण वाळवंटी झाले याचा निर्णायक पुरावा शहामृगाच्या अंड्यांवरून मिळतो. शहामृग हा प्राणी आज फक्त वाळवंटात आढळतो. आफ्रिकेच्या सहारा वाळवंटात तो आहे. वाळूत तोंड खुपसून तो बसतो. वाळवंटातील वाळूच्या वादळापासून बचाव व्हावा म्हणून त्याला असे करावे लागते. शहामृग हा आकाराने सर्वात मोठा पक्षी आहे. त्याची अंडीही मोठी असतात. उत्तर पुराश्मयुगीन शहामृगाची अंडी महाराष्ट्रातील उत्खननात सापडली आहेत. कै. शंकरराव साळी यांनी पाटणे (ता. चाळीसगाव, जि. जळगाव) इथे उत्खनन केले. त्यात त्यांना उत्तर पुराश्मयुगीन दगडी हत्याराबरोबर शहामृगाच्या अंड्याचे तुकडे सापडले. त्यांचे रेडिओकार्बन पद्धतीने कालमापन केले. त्यावरून ती अंडी पंचवीस हजार वर्षांपूर्वीची आहेत, हे निर्विवाद सिद्ध झाले. या पक्ष्याची शिकार त्या काळातील मानव करत होता, यात शंका नाही. भारतात इतरत्रही या काळात शहामृग वावरत असावा. मध्य प्रदेशात नर्मदेच्या खोऱ्यात असलेल्या शिलाश्रयातील प्रागैतिहासिक रंगीत चित्रात तो आढळतो. या काळात मानव मासेमारी करू लागला. पूर्वीच्या काळात प्रभावी हत्याराअभावी मासे पकडणे खूप अवघड होते. या काळात अन्नटंचाई निर्माण झाल्यामुळे मासेमारी, पक्षी, छोटे प्राणी यांची शिकार करण्यासाठी खूप निरनिराळ्या प्रकारची दगडी हत्यारे तयार करावी लागली. त्यात लाकडी दांडक्यात किंवा हाडात खाच पाडून त्यात ही गारेची पाती बसवून त्याचे चाकू, सुरीसारखे हत्यार तयार करत. काही त्रिकोणी पाती बसवून त्याचा मत्स्यबाण केला जाई. त्यामुळे या काळात मासेमारी अधिक सुकर झाली.

**कला**

या काळातील मानव बुद्धिमान असल्यामुळे त्याच्या विचार करण्याच्या शक्तीची प्रचिती आपल्याला तत्कालीन चित्रांत दिसून येते. महाराष्ट्रात अशी चित्रे किंवा कोरीव आकृत्या दगडावर अद्याप आढळलेल्या नसल्या तरी आसपासच्या प्रदेशात, प्रामुख्याने मध्य प्रदेशात, आढळून आल्या आहेत. त्यात त्याची कलाप्रियताही दिसून येते. ही प्रस्तरचित्रे तत्कालीन मानवाच्या धर्मभावनांशी निगडित असावीत, असे विद्वानांचे मत आहे. त्याचे मुख्य कारण असे की, हल्ली भारतात आणि जगात इतरत्र वावरत असलेल्या वन्य जमाती आजही प्रसंगोपात्त अशा प्रकारची चित्रे काढतात. त्यांच्या अभ्यासावरून वरील तर्काला पुष्टी मिळते.

**धार्मिक समजुती**

या काळातील मानवाच्या धार्मिक समजुतींची थोडीशी कल्पना भारतात इतरत्र उपलब्ध झालेल्या पुराव्यावरून येते. युरोपात, त्यातही फ्रान्स आणि स्पेनमध्ये तेथील नैसर्गिक गुहांतून या काळातील अनेक रंगीत चित्रे आढळून आली आहेत. तसेच कोरीव कलाकृती - दगडांवर आणि हाडांवर सापडल्या आहेत. त्यांचा अभ्यासही मोठ्या प्रमाणावर झाला आहे. भारतात उत्तर प्रदेशात या काळातील धार्मिक समजुतीवर प्रकाश टाकणारा पुरावा आढळून आला आहे. तिथे बेलन नदीच्या खोऱ्यात (जिल्हा मिर्झापूर) अतिप्राचीन आद्य पुराश्मकाळापासून मानवाचा वावर होता. उत्तर पुराश्मयुगीन स्थळाच्या एका उत्खननात एक त्रिकोणी आकाराचा दगड सापडला. त्यावर त्रिकोण कोरलेला होता. तो मानवाने कोरलेला होता का, की नैसर्गिक नक्षी होती हे निश्चित सांगता येत नाही, परंतु तशाच प्रकारच्या एका दगडाची त्या भागातील एक वन्य जमात पूजा करत असल्याचे आढळून आले. त्याला ते 'कढाईकी माता' म्हणतात. त्यावरून असे म्हणता येईल की, पंचवीस- तीस हजार वर्षांपूर्वीसुद्धा अशा प्रकारच्या कोरीत दगडाचा त्यांच्या धार्मिक समजुतींशी संबंध संभव असावा.

**४. मध्याश्मयुग**

सुमारे १५००० वर्षांपूर्वी पर्यावरणात बदल घडून येऊ लागला होता. युरोपात चौथे हिमयुग संपून नव्या (चौथ्या) आंतरयुगाला सुरुवात झाली होती. हवामान उबदार होऊ लागले होते. आपल्याकडे दुष्काळ संपून पाऊस चांगला पडू लागला. झाडझाडोरा वाढला, हिरवाई दिसू लागली. प्राणि-पक्षी सर्वत्र वावरू लागले. पर्यावरण अत्यंत अनुकूल झाल्यामुळे मानवाचे जीवन सुखकर झाले. पुराश्मयुग आणि नवाश्मयुग यांच्यामधला हा काळ होता. त्याला मध्याश्मयुग म्हणून ओळखले जाते. मानवी जीवनातील हा काळ अत्यंत सुखाचा समजला जातो. छोटे प्राणी, पक्षी, कंदमुळे, फळे विपुल होती. त्यामुळे फारसे कष्ट न करता मानवाला अन्न मिळत होते. परंतु हे सुखाचे दिवस फार काळ टिकले नाहीत. पंधरा हजार वर्षापूर्वीपासून पुढे दहा हजार वर्षे जेमतेम हे मध्याश्मयुग टिकले. काही भागात तर ते त्याहीपेक्षा कमी काळ होते. अनुकूल पर्यावरण आणि अन्नाची रेलचेल यांमुळे या काळात लोकसंख्या झपाट्याने वाढली. संपूर्ण भारतभर मध्याश्मयुगीन स्थळे विखुरलेली आहेत, त्यावरून हे सिद्ध होते. साऱ्या जगभर हे घडून आले. मध्याश्मयुगात मानवी जीवनाला थोडेफार स्थैर्य लाभले.

मध्याश्मयुगीन संस्कृतीचा शोध एकोणिसाव्या शतकात युरोपमध्ये अकस्मात लागला. १८५४ च्या सुमारास प्रचंड दुष्काळ पडल्यामुळे स्वित्झर्लंडमधील सरोवरांची पातळी खूप खाली गेली. त्यामुळे तिच्या काठावर असलेल्या प्राचीन संस्कृतीचे अवशेष सापडले, ते नवाश्मयुगीन होते. त्यामुळे पुराश्मयुग आणि नवाश्मयुग यांच्या मध्यंतरीच्या काळात मध्याश्मयुग अवतरले असावे हे स्पष्ट झाले. 'भारतात मध्याश्मयुगीन पात्याची छोटी हत्यारे सर्वप्रथम कार्लाईल याला उत्तर प्रदेशातील कैमूर डोंगरातील नैसर्गिक गुहा आणि शिलाश्रयात (जिल्हा मिर्झापूर) सापडली. तिथे तत्कालीन चित्रकलेचेही अवशेष होते. तसेच चुली आणि इतर अवशेषही जमिनीवर पडलेले होते. दक्षिणेत रॉबर्ट ब्रूस फूट या भूशास्त्रज्ञाने अनेक मध्याश्मयुगीन स्थळांचा शोध लावला. गेल्या दीडशे वर्षांत साऱ्या भारतभर आता शेकडो मध्याश्मयुगीन स्थळांचा शोध लागला आहे आणि त्यांपैकी काहींचे शास्त्रशुद्ध उत्खननही झाले होते याची कल्पना येते. आहे. त्यावरून मध्याश्मयुगीन मानवाचे जीवन किती सुखी होते याची कल्पना येते.

**पर्यावरण**

ज्याअर्थी मध्याश्मयुगात अन्नाची रेलचेल होती, त्याअर्थी तत्कालीन पर्यावरण अत्यंत अनुकूल असावे. डॉ. गुरुदीप सिंग यांनी राजस्थानातील दिदवाना, लुणकरणसर, सांभार इत्यादी सरोवरांच्या काठावर उत्खनन करून पर्यावरणासंबंधीचे मोलाचे संशोधन केले आहे. त्यानुसार दहा हजार वर्षांपूर्वी राजस्थानात, आज जिथे वाळवंट आहे आणि पाऊसही खूप विरळा पडतो, तिथे सुमारे १० इंच पाऊस असावा असे अनुमान त्यांनी केले आहे. तत्कालीन पुरापराग विश्लेषणाच्या आधारावर त्यांनी हा निष्कर्ष काढला आहे. त्यांच्या मते दोन कालखंडांत तर पाऊस खूप अधिक होता. एकदा ८०००-७००० वर्षांपूर्वी आणि नंतर इसवी सनपूर्व ३०००-१५०० १५०० मध्ये या काळात. गुजरातमध्ये गेंड्याची हाडे काही ठिकाणी सापडली आहेत. तेव्हा पाण्याचे छोटे साठे सर्वत्र असावेत असे म्हणता येईल.

**वसाहती**

मध्याश्मयुगीन मानव गुहा, शिलाश्रये आणि काही ठिकाणी जुजबी झोपड्या बांधून राहत असला, तरी महाराष्ट्रात त्या प्रकारचा पुरावा अद्याप आढळलेला नाही. परंतु तो असण्याची शक्यता आहे. या काळातील दगडी गारांची हत्यारे मात्र अनेक ठिकाणी सापडली आहेत. या काळात मानवाने मृताचे दफन करण्यास सुरुवात केली. त्यावरून मरणोत्तर जीवनावर त्याचा विश्वास होता असे वाटते. गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश इत्यादी भागांत मध्याश्मयुगीन दफने सापडली आहेत. उत्तर प्रदेशातील पुरुष आणि स्त्रिया उंच आणि शरीराने दणकट होते. त्यामानाने गुजरात, राजस्थानमधील मध्याश्मयुगीन लोक हल्लीच्या लोकांसारखे होते.

**हत्यारे**

उत्तर पुराश्मयुगात पात्याची दगडी हत्यारे वापरात आली. या काळात ती चालू राहिली, पण अधिक छोटी झाली. मुठीत किंवा हाडात किंवा लाकडी दांडक्यात बसवून त्यांचे संयुक्त हत्यार अधिक वापरण्यात आले. भूमितिजन्य आकाराची - म्हणजे त्रिकोणी, चतुष्कोनी हत्यारे तयार करण्यात आली (आ. २.४). चाकू, सुऱ्या, मत्स्यबाण, साधे बाण इत्यादी प्रकारची हत्यारे होती. शिकारीसाठी धनुष्यबाण मोठ्या प्रमाणावर वापरले गेले. निरनिराळ्या प्रकारचे बाण

असत. एकंदरीत हत्यारांचा विचार केल्यास असे दिसून येते की, या काळात कंदमुळे, फळे यांचा अन्नात उपयोग खूप वाढला. शिकारीत छोटे प्राणी (उदा., ससा, कासव) आणि पक्षी यांच्यावर अधिक भिस्त होती. कुत्रा माणसाचा जिवलग मित्र झाला. त्याचा शिकारीत चांगला उपयोग होत असे.

मध्याश्मयुगीन स्थळांच्या उत्खननात गारेच्या पात्यांच्या हत्यांरांशिवाय इतर काही वस्तू सापडतात. त्यात पाटे, वरवंटे, कुटण्यासाठी दगडी बत्ते इत्यादी आढळतात. तसेच झोपड्यांतून खड्ड्यातील चुलीही आहेत. त्यावरून अन्न भाजून खाण्यास या काळात सुरुवात झाली असे म्हणता येईल. तसे पाहिल्यास याची सुरुवात उत्तर पुराश्मयुगात थोडीफार झाली होती याचा पुरावा मिळतो. परंतु मध्याश्मयुगात त्याचे प्रमाण वाढले. जंगलात उगवणारे गवत, गवती बिया, काही जंगली धान्य यांचाही अन्नात उपयोग होऊ लागला होता. तेव्हा कुटणे, वाटणे, पीठ करणे या प्रक्रिया आल्याच. त्याचा पुरावा उत्खननात मिळाला आहे.

मध्याश्मयुगाच्या अखेरच्या काळात मानवाने प्राण्यांचे कळप पाळण्यास सुरुवात केल्याचा पुरावा युरोप आणि पश्चिम आशियात उपलब्ध आहे. भारतातसुद्धा आदमगढ (मध्य प्रदेश), बागोर (राजस्थान) इथे अशा प्रकारचा पुरावा आहे. शेतीचे ज्ञानही मानवाला त्या काळी अवगत असावे. परंतु दहा हजार वर्षांपूर्वी पुनश्च पर्यावरण प्रतिकूल होऊ लागले. शिवाय त्या काळी लोकसंख्या अमाप वाढली होती आणि उपलब्ध असलेले अन्न पुरे पडत नव्हते. त्यामुळे मानवाला शेती करणे भाग पडले. हे कसे घडून आले असावे याचा उत्कृष्ट पुरावा पश्चिम आशियात उपलब्ध झाला आहे. इझरेलमध्ये केबार गुहेत मध्याश्मयुगीन मानवाची वस्ती होती. पुष्कळशी शिकार आणि थोडेफार निसर्गतः उपलब्ध असलेल्या वनस्पती यांवर त्याची गुजराण होत असे. या संस्कृतीचा काळ इसवीसनपूर्व २०,०००-१३,००० असा निश्चित केला गेला आहे.

या पुढील टप्पा नाटुफियन संस्कृतीत पाहावयास मिळतो. इझरेलमधील वादी- अल-नाटुफ या गावी तिचा प्रथम शोध लागला. तिचा काळ इसवी सनपूर्व १३,०००-९५०० असा आहे. या मानवाची गुजराण प्रामुख्याने वनस्पती, कंदमुळे, फळे, निसर्गतः उगवणारा गहू, बार्ली यांवर होत असे. यातून पुढे शेती करण्यास सुरुवात झाली आणि तिचा प्रसार पश्चिम आशियात झाला.

**आद्य शेतकरी**

मध्याश्मयुग पंधरा हजार वर्षांपूर्वी सुरू झाले, पण जेमतेम दहा हजार वर्षे ते टिकले. ही दहा हजार वर्षे प्रागैतिहासिक इतिहासातील सुवर्णयुग समजण्यास हरकत नाही. त्या काळी पर्यावरण अत्यंत अनुकूल होते. उबदार हवामान, पुरेसा पाऊस आणि त्यामुळे निसर्गात भरपूर अन्न उपलब्ध होते आणि फारसे श्रम न करता मानवाला ते मिळू शकत होते. केवळ भारतातच नव्हे, तर जगात इतरत्रही ही समृद्धी होती. त्याचा एक परिणाम असा झाला की, मानवाला भरपूर स्वास्थ्य लाभले आणि त्यामुळे लोकसंख्या अफाट वाढली. भारतात सर्वत्र मध्याश्मयुगीन स्थळे शेकडो आहेत. प्रमाणाबाहेर लोकसंख्या वाढली आणि उपलब्ध अन्नपुरवठा हळूहळू कमी पडू लागला. तेंव्हा अन्नोत्पादनासाठी धडपड करणे मानवाला प्राप्त झाले. सात-आठ हजार वर्षांपूर्वीपासून अन्नटंचाई जाणवू लागली. निसर्गतः उत्पन्न झालेले अन्न - कंदमुळे, फळे, छोटे प्राणी कमी होऊ लागले आणि त्यामुळे अन्न निर्माण करण्याचे प्रयत्न मानवाला करावे लागले. यातून शेतीचा शोध लागला. तो सुखासुखी लागला नाही, त्यासाठी मानवाला भगीरथ प्रयत्न करावे लागले.

कसा लागला शेतीचा शोध ? प्रथम त्याने प्राणी पाळण्यास सुरुवात केली. मध्याश्मयुगात त्याने कुत्रा पाळण्यास सुरुवात केली होती. त्याचा त्याला शिकारीत उपयोग होत असे. तेव्हा प्राणी कसे माणसळावेत हे त्याला ठाऊक होते. युरोपात आणि आफ्रिकेत काही ठिकाणी मध्याश्मयुगात मानवाने हरणांचे कळप पाळण्यास सुरुवात केली असावी, असे तज्ज्ञांचे मत आहे. पाळलेला प्राणी म्हणजे एक प्रकारचे अन्नच. जरूर पडेल तेंव्हा तो मारून खाता येत असे. तेव्हा मध्याश्मयुगाचा अंत होऊन नवाश्मयुग अवतरले तेंव्हा प्रथम प्राणी पाळण्यास सुरुवात झाली. पश्चिम आशियात हे प्रथम घडून आले. इराक-इराण-तुर्कस्तानच्या सरहद्दीवर असलेल्या झाओस डोंगरात जंगली मेंढी, शेळी, बैल इत्यादी प्राणी असत. मध्याश्मयुगात • त्यांची शिकार होत असे. ते करताना प्राण्यांच्या सवयी मानवाने हेरल्या. जंगली

मेंढी, गाय-बैल यांना पकडून ठेवून त्यांना हळूहळू माणसळवण्यात आले. पुढे त्यांचे प्रजोत्पादन सुरू झाले. त्यांचे कळप मानव पाळू लागला. इराण, इझरेल इथे याचा उत्कृष्ट पुरावा मिळालेला आहे. त्यावरून असे दिसून येते की, प्रथम मेंढी-शेळी, नंतर गाय-बैल आणि शेवटी डुकरे पाळण्यास सुरुवात झाली. त्यामुळे जंगली प्राण्यांपेक्षा हे पाळलेले प्राणी आकाराने हळूहळू लहान झाले. याचा सखोल अभ्यास पश्चिम आशियात झाला आहे.

असाच प्रकार शेतीच्या बाबतीतही झाला. इराकमध्ये झायोस डोंगराच्या उतारावर गहू आणि बार्ली (सातू) निसर्गतः उगवतात. बारा-तेरा हजार वर्षांपूर्वी मानव ही धान्ये पाहत होता. दरवर्षी पावसाळ्यात त्यांची रोपे उगवतात. पिकल्यावर त्यांच्या लोंब्या जमिनीवर पडतात. स्त्रिया त्या गोळा करून त्यातील धान्य काढून घेत. त्यांचा खाण्यासाठी उपयोग होत असे. त्यांचे बी जमिनीवर पडून पुन्हा रोपे उगवतात हेही त्यांनी पाहिले आणि आपल्या वस्तीच्या आसपास गहू आणि बार्ली पेरण्यास सुरुवात केली असावी. या धान्यांचा जंगली वाण काही काळानंतर आकाराने लहान होतो. या सर्व स्थित्यंतराचे टप्पे पश्चिम आशियात केलेल्या अनेक उत्खननांवरून सप्रमाण स्पष्ट झाले आहेत.

प्राणी पाळण्यास आणि शेती करण्यास अशा प्रकारे सुरुवात झाल्यानंतर मानवाला एका ठिकाणी वस्ती करून राहणे भाग पडले. त्याचे भटके जीवन संपुष्टात आले. त्याला घर बांधणे भाग पडले. त्यात मुख्य म्हणजे धान्य साठवण्याची सोय करणे प्राप्त होते, कारण पेरलेले धान्य वर्षातून एकदाच पिकून पदरात पडत होते. तेंव्हा धान्य साठवण्यासाठी भांडी तयार करावी लागली. सुरुवातीस त्याने वाळलेल्या भोपळ्यांचा, आतून कोरून काढून भांड्यासारखा वापर केला. लाकडाचाही कोरून तसाच उपयोग केला. तसेच टोपल्या विणण्यास सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात मातीची, खापराची भांडी करण्याचे ज्ञान त्याला नव्हते, परंतु खापराचा शोध त्याला अकस्मात लागला. वेलीच्या फोकाच्या टोपल्या विणून त्यातून धान्य गळून जाऊ नये म्हणून त्या चिखलाने लिंपून काढत. अशी एखादी टोपली आगीत पडली आणि जळून गेली. त्यामुळे त्यातील वेलीचा विणलेला लाकडी भाग जळून गेला आणि चिखलाचा लिंपलेला भाग भाजून पक्का झाला. यातून खापराच्या भांड्यांचा शोध लागला असावा यात शंका नाही. इजिप्तमधील प्राचीन स्थळांच्या उत्खननात अशा जळक्या टोपल्या सापडल्या आहेत.

धान्य साठवण्याची सोय झाली. ते ठेवण्यासाठी झोपडी बांधणे भाग पडले. पश्चिम आशियात वाळवंटी प्रदेश असल्यामुळे झाडी खूप कमी, त्यामुळे लाकडाचा वापर खूपच कमी. कुडाच्या भिंती, चिखलाने लिंपून झोपड्या उभारल्या गेल्या. सुरुवातीला मातीचे गोळे केले आणि हळूहळू त्यांना चौकोनी आकार देऊन, कच्च्या विटा तयार करून त्यांच्या भिंती बांधण्यात आल्या. जसजशी शेती वाढत गेली तसतशी समृद्धी आली. झोपड्यांची जागा खोल्यांच्या घरांनी घेतली. त्यात स्वयंपाकघर, धान्य साठवण्याची सोय यांचा विशेष विचार केला गेला.

घर बांधण्यासाठी थोडेफार लाकूड आवश्यक होते. त्यामुळे लाकूड तोडण्यासाठी आणि सुतारकामासाठी निराळ्या प्रकारच्या हत्यारांची आवश्यकता होती. मध्याश्मयुगीन धारदार छोट्या गारेच्या पात्यांचा त्यासाठी उपयोग नव्हता. त्यामुळे बेसाल्टसारख्या कणखर दगडाच्या कुऱ्हाडी, छिन्नी यांसारखी सुतारकामाची हत्यारे घडवली गेली. ती घासून गुळगुळीत आणि चमकदार केली गेली (आ. ३.१). त्यांना वारंवार धारही लावली जाई. ही नवाश्मयुगीन हत्यारे भारतात अनेक ठिकाणी, प्रामुख्याने दक्षिण भारतात अधिक सापडतात. काश्मीरमध्ये आणि आसाममध्येही त्या प्रकारची हत्यारे वापरात होती. महाराष्ट्रात ट्रॅप या डोंगराच्या कातळात बेसाल्टच्या भिंती (dyke) आहेत. त्याच्या उत्कृष्ट कुऱ्हाडी आणि छिन्या बनवल्या गेल्या. दगडी हत्याराने झाड तोडता येईल का, याची आम्हाला थोडी शंका होती. तेव्हा अशा प्रकारची एक कुऱ्हाड करून त्याचा प्रयोग आम्ही डेक्कन कॉलेजमध्ये एक बाभळीचे झाड तोडण्यासाठी केला. थोडा अधिक वेळ लागतो, पण एका तासात पाच-सहा इंच व्यासाचे झाड तोडता आले. अशा प्रकारची सुतारकामाची हत्यारे उपलब्ध झाल्यामुळे नवाश्मयुगीन मानवाला झोपड्या बांधून राहणे शक्य झाले. इतर चिल्लर कामासाठी गारगोटीच्या पात्याची हत्यारे होतीच. ती शेकड्याने सापडतात. गारेच्या हत्यारांचा उपयोग करण्याची परंपरा आजही महाराष्ट्रातील धनगरांच्यात आहे. मेंढा किंवा बोकड बडवण्यासाठी ते गारेच्या पात्याचा वापर करतात.

चार-साडेचार हजार वर्षापूर्वी दक्षिण महाराष्ट्रात आणि आंध्र-कर्नाटकात हे आद्य शेतकरी सुखासमाधानाने राहत होते. या काळात उत्तर भारतात, त्यातही पंजाब- हरियाणात नागरी सिंधु संस्कृती बहराला आली होती. त्यांची मोठाली शहरे, त्यांची आखीव नगररचना, पश्चिम आशियाशी त्यांचा असलेला व्यापार, त्यामुळे तिथे प्रचंड सुबत्ता

होती. इ.पू. २३०० च्या सुमारास त्यांचा परदेशाशी असलेला व्यापार भरभराटीस आलेला होता. भारतातील अनेक चैनीच्या वस्तू - शंख, गोमेदाचे गणी, कापड, तांबे इत्यादी यांना मोठ्या प्रमाणावर मागणी होती. त्यासाठी कच्चा गाल मिळवण्यासाठी ही मंडळी इ.पू. २५०० मध्येच गुजरातमध्ये येऊन पोहोचली होती, थोड्याच काळात ते तापीच्या खोऱ्यातून महाराष्ट्रात येऊन पोहोचले. प्रवरेच्या खोयऱ्यात, दायमाबाद (ता. श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर) येथे त्यांनी आपली वसाहत स्थापन केली. प्रवरा-गोदावरीच्या काठची अत्यंत सुपीक जमीन, मुबलक पाणी, अनुकूल पर्यावरण यामुळे ते इथे आले. अर्थात ते कच्चा माल मिळवण्यासाठी येथे आले असावेत यात शंका नाही. नंदुरबार जिल्ह्यात प्रकाश इथेही तापीच्या काठावर त्यांची वसाहत असावी, असे तिथे सापडलेल्या खापरांच्या अभ्यासावरून वाटते.

दायमाबाद येथील सिंधु वसाहतीचा शोध अकस्मात लागला. तिथे आम्ही १९५९ मध्ये छोट्या प्रमाणावर उत्खनन केले होते. परंतु त्यात सिंधु संस्कृतीच्या अवशेषांचा पुरावा मिळाला नव्हता. पुढे काही वर्षांनी १९७० च्या सुमारास वर्तमानपत्रात एक बातमी आली होती. त्यात असे सांगितले होते की, दायमाबाद (श्रीरामपूरजवळ, जि. अहमदनगर) येथे गुराखी मुलांना सरपण गोळा करत असताना एका झाडाच्या मुळाशी काही ब्रॉँझच्या मूर्ती सापडल्या. श्रीरामपूर येथील पोलिसांनी त्या ताब्यात घेतल्या. आम्ही तिथे जाऊन त्या पाहिल्या आणि त्या अतिप्राचीन असाव्यात असे आमचे मत झाले. पुढे भारताच्या पुरातत्त्वखात्याने त्या ठिकाणी उत्खनन केले. तिथे त्यांना सिंधु संस्कृतीची वैशिष्ट्यपूर्ण खापरे सापडली. त्यावरून प्रक्षिच्या मूर्तीही सिंधु संस्कृतीच्या (इ.पू. २२००-२०००) काळातील होत्या, है निर्विवाद सिद्ध झाले. पुढे भारतीय पुरातत्त्व खात्याचे अधिकारी (कै.) डॉ. शंकरराव साळी यांनी मोठ्या प्रमाणावर उत्खनन करून दायमाबाद येथील सांस्कृतिक कालक्रम निश्चित केला. त्यावरून तिथे इ.पू. २२०० पासून ते इ.पू. १००० पर्यंत सतत बस्ती होत राहिली आणि त्यानंतर ते स्थळ उजाड झाले. महाराष्ट्राचे आद्य शेतकरी तीन हजार वर्षापूर्वी देशोधडीला लागले. त्यानंतर दायमाबाद इथे पुन्हा वस्ती झाली नाही.

दायमाबाद हे महाराष्ट्रातील खूप विस्तृत प्रागैतिहासिक स्थळ आहे. ते ३० हेक्टर भूभागावर पसरलेले आहे. ते इतके विस्तृत आहे याचे एक कारण असे की, तिथे निरनिराळ्या कालखंडांत निरनिराळ्या भागांत वस्ती झाली. परंतु असे असले, तरी इतकी मोठी प्रागैतिहासिक वस्ती महाराष्ट्रात दुसरी नाही. त्याला प्रकाश (जिल्हा नंदुरबार) हा एक अपवाद असण्याची शक्यता आहे. परंतु आता तेथील गावकरी मंडळींनी पांढरीच्या (प्राचीन वस्ती) पाचही टेकड्या खणून त्यांची नासधूस करून टाकली आहे. केंद्र सरकारला त्याची काळजी नाही आणि महाराष्ट्र सरकारबद्दल तर बोलणेच नको. महाराष्ट्रातील अशी अनेक प्राचीन स्थळे आता नामशेष होत आहेत.

**सावळदा संस्कृती (इ.पू. २५००-२०००)**

दायमाबादच्या उत्खननात सिंधुपूर्व काळातील एका ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचा शोध लागला. तिला सावळदा संस्कृती असे नाव दिले गेले आहे, कारण तिचा सर्वप्रथम शोध तापीच्या खोऱ्यात, खानदेशातील सावळदा या गावी (जिल्हा धुळे) लागला. इ.पू. २५०० च्या सुमारास ही संस्कृती उदयास आली. कावठे (जिल्हा धुळे) हे या संस्कृतीचे एक महत्त्वाचे स्थळ. त्याचे उत्खनन आम्ही मोठ्या प्रमाणावर केले.

सावळदा संस्कृतीची दायमाबाद येथील वसाहत एखाद्या लहान वस्तीसारखी होती. पंचवीस-तीस कुटुंबे तिथे झोपड्या बांधून राहत असावीत. सिंधु संस्कृतीच्या लोकांचे तिथे आगमन झाल्यानंतर त्यांना बहुधा सामावून घेतले असावे. त्यांपैकी काही परागंदा झाले असण्याची दाट शक्यता आहे. सिंधु संस्कृतीचे लोक त्यांच्यापेक्षा अधिक प्रगत होते. त्यांच्याजवळ गाईगुरांची खिल्लारे होती, शेळ्या- मेंढ्यांचे कळप होते, शिवाय शेतीचे प्रगत ज्ञान होते. प्रवराकाठच्या मळीच्या जमिनीत त्यांनी गहू, बार्ली आणि इतर धान्याची लागवड केली. गुरांसाठी

कुरणही जवळच होते. नदीच्या काठी त्यांनी घरे बांधली. परंतु प्रवरेला पूर येणार याची त्यांना जाणीव होती. शिवाय चोरा-चिलटांचा आणि जंगली जनावरांचा धोका होताच. तेंव्हा त्यांनी मातीची भक्कम तटबंदी उभारली. तिचे अवशेष उत्खननात उजेडात आले आहेत. पुरापासून बचाव व्हावा म्हणून नदीच्या काठाने बंधारा उभारला होता.

त्यांची घरेही मातीची होती. परंतु विटा तयार करण्याची कला त्यांना अवगत होती. त्याही त्यांनी काही ठिकाणी वापरल्या. सिंधु संस्कृतीच्या विटा - कच्च्या आणि भाजक्या एका विशिष्ट प्रमाणाच्या असतात आणि त्यामुळे तात्काळ

ओळखता येतात. त्यांचे प्रमाण ४:२:१ असे म्हणजे उदा., ४०x२०×१० सेंटिमीटर असे. त्यांची घरे मोठी होती. ती बांधताना थोडीफार योजना त्यांनी आखलेली असावी असे वाटते.

सावळदा संस्कृतीचे लोक अत्यंत अप्रगत अवस्थेत होते. सावळदा येथील उत्खननात सापडलेली त्यांची घरे खड्ड्यात केलेली होती. त्यांपैकी एक घर खूप मोठे होते. ते आकाराने लंबगोलाकृती (४ मीटर लांब, ३ मीटर रुंद) असून त्याची जमीन ३०-४० सेंटिमीटर खोलीवर होती. एका कोपऱ्यात खड्ड्यात चूल होती.

घराची जमीन फारशी चोपून तयार केलेली नव्हती. हे बहुधा वसाहतीच्या म्होरक्याचे घर असावे. इतर घरे आकाराने फार छोटी होती. दहा-बारा सेंटिमीटर खोलीचा गोलाकार किंवा लंबगोलाकार खड्डा खणून त्याच्या भोवताली वासे उभारून छप्पर कले जाई. ही घरे फार छोटी म्हणजे दीड-दोन मीटर व्यासाची असत. घराच्या अंगणात खड्डे खणून त्यात धान्य साठवत असत. अशी बळदे आजही महाराष्ट्रातील खड्यात पाहावयास मिळतात. लहान खड्डे बहुधा रात्री कोंबड्या ठेवण्यासाठी असावेत.

सावळदा संस्कृतीचे लोक अप्रगत अवस्थेतील असले तरी त्यांची खापरे वैशिष्ट्यपूर्ण होती. तांबड्या रंगाच्या खापरावर काळ्या रंगात नक्षी असे. या नक्षीत प्रामुख्याने जलचर प्राण्यांची मासे इत्यादी चित्रे अतिशय कलापूर्ण आहेत. लहान-मोठे मासे, ते मारण्यासाठी वापरले जाणारे मत्स्यबाणही (harpoon) त्यात दिसतात. नदीच्या काठी वसाहत असल्यामुळे मासे हे त्यांचे मुख्य अन्न असावे. त्याच्या जोडीला शिकार होतीच, पण तिचे स्थान दुय्यम होते.

दायमाबाद येथील उत्खननात सापडलेली घरे मात्र चांगली मोठी होती. त्यांपैकी एक घर ४.५ मीटर, चतुष्कोनी आकाराचे होते. मोठे असल्यामुळे मध्ये आडवी भिंत घालून त्याचे दोन भाग केले होते. ही भिंत बैठी असून, मागील भागात स्वयंपाकघर असावे. या घरात एक लिंगाच्या आकाराचा अकीकाचा (agate) दगड सापडला. तो धार्मिक समजुतींशी निगडित असण्याची शक्यता आहे. त्यावरून है घर जमातीच्या मांत्रिकाचे असावे असे वाटते. ते मंदिरही असण्याची शक्यता आहे.

दायमाबाद येथील काही घरे यापेक्षा मोठी होती. काही दोन खोल्यांची आणि तीन खोल्यांचीही होती. त्यांच्या भिंती फूटभर उंचीच्या असून त्यांवर कूड असे. आत गोलाकार खड्यात चूल असे आणि धान्य साठवण्यासाठी बळद खणलेले; चार खूर असलेले रांजणही साठवणासाठी होते. सावळदा येथील त्यांच्या बांधवांपेक्षा दायमाबाद येथील लोक अधिक समृद्ध होते, असे म्हणता येईल.

सावळदा संस्कृतीचे वर्गीकरण ताम्रपाषाणयुगीन म्हणून केलेले असले तरी त्यांनी दगडी हत्यारे क्वचितच वापरली. त्यांची बहुसंख्य हत्यारे हाडांची केलेली होती. ती खूप सापडतात. शिकारीत मारलेल्या प्राण्यांच्या हाडांची ती बनवली जात. त्यातही हरणांच्या हाडांची अधिक, कारण ती खूप टणक आणि चिवट असतात. त्याची तीराये, चाकू, सुऱ्या प्रामुख्याने आढळतात. ताम्रपाषाणयुगात सर्वत्र हाडांची हत्यारे सापडतात.

सावळदा लोकांची शेतीसुद्धा प्राथमिक अवस्थेत होती. ते बाजरी Pennisetum typhoides) पिकवत असल्याचा पुरावा सावळदा उत्खननात मिळतो. क्वचित गहू, आणि ज्वारीचीही लागवड होत होती. परंतु आजही तापीच्या खोऱ्यातील गुजरातमध्ये बाजरी हे मुख्य पीक आहे. बाजरी आणि ज्वारी ही पिके आपल्याकडे पश्चिम आशियातील आखाती प्रदेशातून आली. ही उन्हाळी पिके, त्यांना पाऊस फारसा लागत नाही. त्यामुळे इ.पू. २३०० पासून आपल्याकडे, पश्चिम भारतात त्यांची लागवड सुरू झाली.

खानदेशात सावळदा संस्कृतीचे लोक फार काल टिकाव धरू शकले नाहीत. सिंधु संस्कृतीचे लोक तापीच्या खोऱ्यातून महाराष्ट्रात आले आणि त्यामुळे ते देशोधडीला लागले. पुढे त्यांचे काय झाले हे सांगता येत नाही.

**सिंधु संस्कृती (इ.पू. २२००-२०००)**

सिंधु संस्कृतीचे लोक महाराष्ट्रात इ.पू. २२०० च्या सुमारास गुजरातमधून आले. खरे म्हणजे या काळात सिंध-पंजाबमध्ये या संस्कृतीचा ऱ्हास सुरू झाला होता आणि त्यांची स्थलांतरे सुरू झाली होती. पर्यावरण प्रतिकूल होऊ लागले होते, सरस्वती नदी आटू लागली होती, पावसाचे मान कमी झाले होते. त्यामुळे त्यांना इतरत्र स्थलांतर करणे भाग होते. महाराष्ट्रात दायमाबाद इथे त्यांच्या वस्तीचे उत्खनन झाले आहे. त्यात अत्यंत महत्त्वाचा पुरावा उपलब्ध झाला आहे. सिंधु संस्कृतीच्या लोकांची काही घरे दायमाबाद येथे उत्खननात सापडली. त्यांची आखणी योजनाबद्ध होती. दक्षिणोत्तर

अशी ती एका ओळीत बांधलेली होती. त्यांपैकी सहा घरे ही बहुधा एकाच कुटुंबाची असावीत; कारण सभोवती बांधलेल्या एका भिंतीत ती बंदिस्त होती. त्यात सापडलेल्या अवशेषांवरूनही या तर्काला दुजोरा मिळतो. ते तेथील महत्त्वाचे कुटुंब असावे. ही घरे आकाराने चतुष्कोनी असून पूर्व-पश्चिम आणि दक्षिणोत्तर अशा त्यांच्या भिंती होत्या. साऱ्यांच्या भिंती एकाच जाडीच्या (३० सेंटिमीटर) होत्या. त्यातील खोल्याही जवळजवळ एकाच आकाराच्या होत्या. परंतु प्रत्येक खोलीचा उपयोग निराळा होता. क्रमांक २० ची खोली हा जनावरांचा गोठा असावा, असे उत्खनकांचे मत आहे. एका खोलीत धान्य साठवण्यासाठी बळदे खोदलेली होती. क्रमांक १६ ची खोली हे त्या कुटुंबाचे स्वयंपाकघर असावे, कारण त्यात चुलाणे होते. या संकुलाच्या बांधणीत कच्च्या विटांचा वापर केलेला होता. त्यांच्या आकाराचे प्रमाण ४:२:१ असल्यामुळे ही सारी घरे सिंधु संस्कृतीच्या लोकांची होती यात शंका नाही.

या संकुलातील सर्व घरे (खोल्या) अतिशय काळजीपूर्वक बांधलेल्या होत्या. त्यांच्या सारख्या आकाराच्या भिंती आणि चौकोनी कोपरे यांवरून ती योजनाबद्ध बांधलेली होती, हे स्पष्ट होते. या संकुलातील एक खोली आकाराने खूप मोठी (६.३०४६ मीटर) होती. हे संपूर्ण संकुल एका समृद्ध कुटुंबाचे होते यात शंका नाही. त्याचा कर्ता कदाचित वसाहतप्रमुख असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सापडल्या आहेत. त्यावरून त्यांचे तंत्रज्ञान किती प्रगत होते याची कल्पना येते.

**ब्राँझ मूर्ती**

दायमाबाद इथे सापडलेल्या ब्राँझच्या मूर्ती अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहेत. इतक्या कलापूर्ण मूर्ती खुद्द हडप्पा-मोहेंजोदारोलासुद्धा सापडल्या नाहीत. त्यांचा काळ इ.पू. १२००-२००० असा आहे. त्यात एक रथ, हत्ती, रानगवा आणि गेंडा यांची चित्रे आहेत. ती आकाराने मोठी आणि खूप जड असल्यामुळे त्यांना लहान मुलांची खेळणी म्हणता येणार नाही. एकट्या हत्तीचे वजन वीस किलो आहे. तेव्हा त्यांना लोकांच्या धार्मिक समजुतींत स्थान असावे यात शंका नाही.

या मूर्तीपैकी सर्वांत महत्त्वाचा रथ आहे (आ. ३.२). त्याला बैल जोडलेले आहेत. त्यांच्या मानेवरचे जू काढता येते. बैलांची शिंगे आपल्याकडच्या खिलारी बेलासारखी आहेत. त्यांचा मागील भाग मात्र घोड्यासारखा दिसतो. रथ लढाईत वापरणाऱ्या रथासारखा दिसतो. त्यात बसण्यासाठी जागा नाही. फक्त सारथी आणि श्री हा यांना उभे राहण्यासाठी जागा आहे. रथात एक पुरुष उभा राहिलेला दिसतो. तीरथ हाकताना दाखवले आहे. त्याच्या हातात काठी आहे. त्याच्या पायाजवळ एका कुत्रा उभा आहे, बाजूला दोन पक्षी आहेत. पुढे धरण्यासाठी कठडा आहे. रथाची चाचे भरीव आहेत. इतका प्राचीन आणि कलापूर्ण रथ जगात इतरत्र कोठेही आजवर सापडलेला नाही. सिंधुकलेचा तो अत्युत्कृष्ट पुरावा आहे. हाच्या तीन प्राण्यांपैकी हत्ती खूप मोठा आहे. त्याच्या पायाला चाके लावलेली होती. परंतु ती आता नाहीत. रानगवा आणि गेंडा यांची चाके मात्र आहेत. रानगवा चांगला माजलेला दिसतो आणि गेंड्याच्या कातडीवरील घड्या अतिशय काळजीपूर्वक दाखवल्या आहेत.

काय प्रयोजन असावे या मूर्तीचे? त्या रोजच्या वापरातील निश्चितच नाहीत. प्रसंगोपात्त त्यांची पूजा होत असावी. त्या सर्व अत्यंत सुस्थितीत असून फारश्या वापरलेल्या नसाव्यात. हल्ली जशी आपल्याकडे जगन्नाथाची रथयात्रा निघते, त्यासारखा काहीसा या रथाचा उपयोग होत असावा. या संदर्भात काही सिंधु मुद्रांवर काही प्राणी एकामागून एक चाललेले दाखवले आहेत. तसा काहीसा यांचा उपयोग होत असणे शक्य आहे.

या मूर्ती जेंव्हा सापडल्या त्यावेळी त्या खूप अलीकडच्या म्हणजे अठराव्या शतकातील काही वन्य जमातींनी तयार केलेल्या असाव्यात असे काही विद्वानांचे मत होते. परंतु त्या जिथे सापडल्या तिथे उत्खनन केल्यानंतर त्या सिंधु संस्कृतीच्या काळातील असाव्यात हे आता निर्विवाद सिद्ध झाले आहे. शास्त्रीय तपासणीत, त्या आर्सेनिक ब्राँझच्या आहेत हेही आता मान्य झाले आहे.

कोण होता हा रथातला देव? सिंधु लिपी अद्याप वाचली गेली नसल्यामुळे आपल्याला केवळ तर्कावरच समाधान मानावे लागते. मोहेंजोदारो इथे सापडलेल्या एका मुद्रेवर योगासनात बसलेल्या एका व्यक्तीचे चित्र आहे आणि त्याच्या चारही कोपऱ्यात हत्ती, रानगवा, गेंडा इत्यादी वन्यप्राणी आहेत. एक कोपरा तुटलेला असल्यामुळे तिथे कोणता प्राणी होता हे सांगता येत नाही. या मुद्रेवरील चित्र पशुपतीचे आहे असे आजवर अनेक विद्वानांनी सांगितले आहे. पशुपती म्हणजे शिव. परंतु ती स्त्री असावी असेही काहींचे मत आहे. मुद्रेवरील चित्रात त्या व्यक्तीला दोन्ही बाजूला आणखी दोन

तोंडे दिसतात. त्यामुळे त्रिमूर्तीसारखा हा प्रकार असावा. तसेच अलीकडे काही सिंधु स्थळांच्या उत्खननात (उदा. कालीबंगन, राखीगढी) शिवलिंगे सापडली आहेत. शिवाय ऋग्वेदात दासांच्या शिश्नदेवाचा उल्लेख येतो. तेव्हा शिवासारखी ही देवता होती असे मानणे चूक ठरणार नाही.

**शेती**

सिंधु संस्कृतीच्या लोकांची शेती प्रगत होती हे आता सिद्ध झाले आहे. अनेक प्रकारची धान्ये, भाजीपाला, फळे ते पिकवत, त्यांच्याकडे नांगर होता. तो अर्थातच लाकडी असावा. खैराचा लाकडी नांगर आजही उत्तर भारतात वापरात आहे. शिवाय कालव्यांची सोय आणि विहिरीतील पाणी उपलब्ध असल्यामुळे बागायती शेती ते करत. परंतु ते महाराष्ट्रात आले, तेंव्हा या सर्व सुविधा उपलब्ध होत्या असे निश्चित सांगता येत नाही. नांगर आणणे सोपे होते. परंतु महाराष्ट्रात तरी त्यांच्या विहिरींचा पुरावा नाही. नदीच्या पाण्याचा सिंचनासाठी त्यांनी उपयोग केला असण्याची दाट शक्यता आहे. बहुधा त्यामुळेच ते गहू पिकवू शकले असावेत. गव्हापेक्षा बार्ली (सातू) मोठ्या प्रमाणावर पिकवली जात असे. मसूर, वाटाणे, तीळ यांचाही पुरावा उत्खननात मिळतो.

उत्खननात शेकडो वर्षापूर्वीच्या धान्याचे अवशेष कसे सापडतात याचे सामान्यजनांना आचर्य वाटणे स्वाभाविक आहे. याचे स्पष्टीकरण सोपे आहे. आज आपल्याकडे धान्य दळण्यासाठी गिरण्या आहेत. अतिप्राचीन काळी त्या नव्हत्या. पाटे-वरवंटे मात्र होते. त्यात रगडून धान्याचे पीठ करावे लागत असे. ते करण्यापूर्वी धान्यातील पाण्याचा अधिकाधिक अंश काढून टाकण्यासाठी ते आधी भाजून घेत. काही वन्य जमातीत अजूनही ही प्रथा आहे. धान्य भाजताना त्यातील काही दाणे अधिक भाजून त्यांचा कोळसा होतो. ते निवडून टाकून दिले जातात. असा कोळसा झालेले धान्य शेकडो हजारो वर्षे जमिनीत टिकून राहते. उत्खननात ते सापडते. पुरावनस्पतिशास्त्रज्ञ पाय कोणत्या प्रकारचे आहे, त्याचा वाण कोणता आहे, हे ओळखतात. त्यावरून तत्कालीन पर्यावरणावरही प्रकाश पडतो. तांदूळ असेल तर पाऊस अधिक असावा, असे अनुमान करता येते. ज्वारी, बाजरी या भरड धान्याला पाणी कमी लागते. धान्य परीपाच्या का रब्बीच्या मोसमातले आहे हेही जाणून घेता येते.

शेतीशिवाय शिकार, मासेमारी यांचाही अन्नात मोठ्या प्रमाणावर उपयोग होत असे. शेळी-मेंढी, गाय-बैल ही पाळीव जनावरे म्हणजे अन्नच. जरूर पडेल त्यावेळी त्यांचे मांस तयार असे. उत्खननात सापडलेल्या हाडांवरून प्राणी मुद्दाम मारला, हे त्यावरील घावावरून ओळखता येते. शिकार केलेल्या प्राण्यात प्रामुख्याने हरणे अधिक आहेत. महाराष्ट्रात हरीण, नीलगायही अनेक ठिकाणी आढळतात. हरणाचे सारा रुचकर म्हणून अधिक प्रिय. शिवाय ते दीर्घकाळ टिकते. सशाची शिकारही या प्रमाणावर केली जात असावी. प्रागैतिहासिक वसाहती नद्यांच्या काठी असल्यामुळे मासेमारी हा तर नित्याचा उद्योग होता. उत्खननात सापडलेल्या मानवी ताडांवरून कोण अधिक शाकाहारी किंवा मांसाहारी होते आणि कोण अधिक मलयाहारी होते हे आता सांगता येते.

**माळवा संस्कृती**

सिंधु संस्कृती उत्तर भारतात आणि गुजरातमध्ये इ.पू. १८००-१७०० च्या, रामारास लयास गेली. या काळात महाराष्ट्रात माळवा संस्कृतीच्या लोकांचे मोठ्या प्रभाणावर आगमन झाले. तापी, गोदावरी, कृष्णा या सर्व मोठ्या नद्यांच्या आणि त्यांच्या उपनद्यांच्या खोऱ्यात सर्वत्र प्रथम वस्ती माळवा संस्कृतीच्या लोकांनी केली. या संस्कृतीचा उगम माळव्यात नर्मदेच्या खोऱ्यात झालेला आढळून येतो. त्यांचे एकही सिंधु संस्कृतीत असण्याची दाट शक्यता आहे. कायथा (जिल्हा उज्जैन, मध्य प्रदेश) येथील उत्खननात तिथे प्रथम वस्ती ज्या लोकांनी केली त्यांच्यावरील सिंधु संस्कृतीचा प्रभाव जाणवतो. त्यातून पुढे माळवा संस्कृतीचा उगम झाला असावा, नर्मदेच्या तीरावरील महेश्वर आणि नावडातोडी, चंबळच्या काठावरील नागदा इत्यादी ठिकाणी माळवा संस्कृतीचे अवशेष मोठ्या प्रमाणावर सापडले आहेत. त्यांची खापरे अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण होती. ती महाराष्ट्रातही सापडतात. प्रकाश (जिल्हा नंदुरबार), दायमाबाद (जिल्हा अहमदनगर) आणि इनामगाव (जिल्हा पुणे) ही या संस्कृतीची मोठी गावे होती. परंतु ही नागरी संस्कृती नव्हती. महाराष्ट्रात इ.पू. १७००-१४०० या काळात ही संस्कृती नांदली. या लोकांना महाराष्ट्रातील आद्य शेतकरी म्हणता येईल.

माळवा संस्कृतीच्या वसाहती फारशा मोठ्या नव्हत्या. दोन-तीन हेक्टरवर पसरलेली ती खेडी होती. त्यांपैकी प्रकाश, दायमाबाद आणि इनामगाव ही थोडी मोठी होती. इनामगाव उत्खननात या संस्कृतीचे अनेक पैलू उजेडात आले.

घोडनदीच्या काठावर, जिथे नदी वळण घेते, तिथे एक डोह निर्माण झाला आहे. त्यात वर्षभर पाणी असते. त्यामुळे वसाहतीस ते योग्य स्थळ होते. शिवाय आसपास उत्तम शेतजमीनही आहे. तिथे या लोकांनी आपली घरे उभारली. त्यांची अनेक घरे उत्खननात उजेडात आली. ती योजनापूर्वक बांधलेली होती. पूर्व- पश्चिमोत्तर अशी एका ओळीत ती बांधलेली होती. ती चांगली ऐसपैस (७ × ५ मीटर) होती. त्यात मध्ये एक बैठी भिंत घालून स्वयंपाकघराला आडोसा केलेला असे (आ. ३.३). अंगणही चोपून तयार केलेले असे. घराच्या मातीच्या भिंती बैठ्या असून न्यांवर गवताचे छप्पर असे. कुडाच्या भिंतींचा पुरावाही मिळतो. घरात धान्य साठवण्यासाठी कच्च्या मातीचे चार पायांचे मोठाले रांजण असत. ते जमिनीला. चिखलाने लिंपून टाकले जात. एका घरात तर असे दहा-बारा रांजण होते. त्यावरून त्यांच्या समृद्धीची कल्पना येते. दायमाबाद येथील घरेही याच प्रकारची होती. तिथे एका घरात चूल होती. अंगणातही चुलाणे असे. ते शिकारीत मारलेले प्राणी भाजण्यासाठी असावे. तिथे धान्य साठवण्यासाठी जमिनीत बळदे खोदलेली होती. दायमाबाद येथील काही घरे वैशिष्ट्यपूर्ण होती. तेथील क्रमांक ३२, ३३ आणि ५४ या घरांचे एकच संकुल असावे, म्हणजे एकाच कुटुंबाची ती घरे असावीत असे वाटते. याचे मुख्य कारण असे, की ही तिन्ही घरे एका भिंतीत बंदिस्त केलेली होती. त्यात नैऋत्येकडून प्रवेश ठेवलेला होता. क्रमांक ३६ चे घरही याच संकुलाचे असावे. त्यातील क्रमांक ५४ चे घर सर्वात महत्त्वाचे असावे. त्याच्या अंगणात मोठी चुलाणे होती. ती अग्निकुंडे असावीत, असे उत्खनकांचे मत आहे. त्यात मध्यभागी एक मोठा चिखलाचा गोळा घट्ट बसवलेला होता. कालीबंगन ((राजस्थान) येथील सिंधु संस्कृतीच्या स्थळाच्या उत्खननात अशी अग्निकुंडे सापडली होती त्यावरून असे म्हणता येईल. बहुधा हे घर तेथील माळवा संस्कृतीच्या वसाहत प्रमुखाचे असावे.

**भांडी**

माळवा संस्कृतीची भांडी लोकांच्या समृद्धीची साक्ष देतात. ती इतकी विविध प्रकारची आणि घाटाची आहेत, की त्यांच्या उपयोगाची केवळ कल्पनाच करावी लागते. शिवाय त्यांवरील नक्षीही इतकी वैचित्र्यपूर्ण आहे की, त्याप्रकारचे चित्रण भारतातील प्राचीन खापरांवर क्वचितच आढळते. त्यात लहान-मोठी सर्व प्रकारची भांडी आहेत. त्यांचा एकच दोष म्हणजे ती तयार करताना मातीत धान्याचे तूस आणि बारीक रेती अधिक मिसळलेली दिसते. परंतु ती खरपूस भाजलेली मात्र असतात, त्यांवर फिकट गुलाबी किंवा पिवळसर लेप दिलेला असतो आणि त्यावर काळ्या किंवा तपकिरी रंगात नक्षीकाम केलेले असते. शिवाय ती अत्यंत कलापूर्ण आहेत. लहान-मोठे घडे, रांजण, वाडगे तर सर्व प्रकारचे आहेत. परंतु काही अशी आहेत, की ती इतरत्र क्वचितच आढळतात. कापलेली तोटी असलेले वाडगे बहुधा धार्मिक कर्मकांडासाठी असावे. लहान-मोठे लोटे हुबेहूब आज आपण वापरतो तसे आहेत. सपाट बुडाचे कप आणि आइस्क्रिमच्या कपासारखे चषक हे लक्ष वेधून घेतात, त्यांवरील नक्षीही वैशिष्ट्यपूर्ण आहे. हुबेहुब याच प्रकारची भांडी आणि त्यांवरील नक्षी इराणमध्ये सापडतात. त्यामुळे इराणशी त्या काळात काही संबंध असावा असे डॉ. सांकलियांचे मत होते. त्याचा संबंध त्यांनी आर्यांच्या आगमनाशी लावला होता.

माळवा संस्कृतीच्या रंगीत भांड्यांवरील चित्रे विविध प्रकारची आहेत. त्यात त्रिकोण, चौकोन, वर्तुळ हे भौमितिक प्रकार तर आहेतच पण झाडे, पाने यांचेही चित्रण आढळते. परंतु सर्वात लक्ष वेधून घेतात ती प्राण्यांची चित्रे. त्यात हरणे अधिक, बैल, कुत्रा हे प्राणीही आहेत. क्वचित सुसर, मगर, सरडेही दिसतात. निकृष्ट पोताची भांडीही मोठ्या प्रमाणावर वापरात होती. ती नित्योपयोगी, स्वयंपाकासाठी आणि साठवणीसाठी असावीत यात शंका नाही. मोठाली भांडी हातावर घडवली जात असावीत. या काळातील कुंभाराचा एक आवा इनामगाव उत्खननात सापडला होता, परंतु तो आकाराने फार लहान होता. क्वचित लहान भांडी भाजण्याकरता तो असावा.

माळवा संस्कृतीचे शेतकरी गहू, बार्ली यांची प्रामुख्याने लागवड कर्त. मसूर, वाटाणा, कुळीथ, तीळ, मूग इत्यादी धान्यांचा पुरावाही उत्खननात मिळतो. त्याच्या जोडीला शिकार व कंदमुळे, फळे होती. महाराष्ट्र हा निमदुष्काळी प्रदेश, सर्वत्र बोराटी खूप माजलेली असावी, कारण उत्खननात बोराच्या बिया खूप सापडतात.

**धार्मिक समजुती**

महाराष्ट्रातील उत्खननात माळवा संस्कृतीच्या धार्मिक समजुतींसंबंधीचा पुरावा अभावानेच आढळतो. याचा एकमेव पुरावा म्हणजे दायमाबाद इथे सापडलेला एक हंडा. त्याचे काही तुकडे सापडले. ते जोडून तयार केल्यावर त्यावर उच्च दर्जाचे चित्रण आढळले. संपूर्ण हंडा रंगवलेला होता. हा मोठा घडा असून त्याचे रंगकामासाठी मधोमध एक आडवा पट्टा ओढून दोन भाग केलेले होते. त्याच्या खालच्या भागात वाघ पळताना किंवा चालताना दिसतात. वरच्या भागात मोर, सांबर, हरणे इत्यादी प्राणी एका मानवी आकृतीसमोर उभे आहेत. ते त्यापुढे नमलेले दिसतात. खालच्या पट्ट्यातील वाघही तसेच असावेत. उजव्या बाजूच्या कडेस उभा असणारा माणूस पीळदार शरीराचा वाटतो. त्याचे शीर असलेला भाग तुटलेला आहे. त्याचा उजवा हात कमरेवर आहे. त्याने अधोवस्त्र नेसलेले आहे. तो बहुधा प्राणिसृष्टीचा देव असावा. दायमाबाद इथे सापडलेल्या ब्राँझमूर्तीतील रथातील देव आणि इतर प्राणी हे या संबंधात आठवतात. सिंधु संस्कृतीच्या पशुपतीसारखा हा देव असावा. तीच परंपरा पुढे माळवा काळात चालू राहिली, असे समजण्यास हरकत नाही. प्रकाश येथेही एक अशा प्रकारचे चित्र असलेले भांडे सापडले होते.

माळवा संस्कृतीच्या लोकांची दफने सापडत नाहीत. याला एकच अपवाद म्हणजे इनामगाव येथे एका माळवा घरात सापडलेले एका लहान मुलाचे दफन. त्याला दोन कुंभ, तोंडाला तोंड लावून आडवे, एका खड्ड्यात पुरलेले होते. परंतु हे माळवा संस्कृतीचे वैशिष्ट्य नसून दक्षिण भारतातील नवाश्मयुगीन संस्कृतीचा प्रभाव होता हे उघड आहे. माळवा संस्कृतीच्या लोकांचा मरणोत्तर जीवनावर विश्वास असावा. प्रौढाचे - प्रामुख्याने पुरुषाचे ते दफन करत असत. त्यांची दफने इनामगाव इथे सापडली नाहीत, परंतु दायमाबाद येथे मात्र ती आढळून आली. दफन वस्तीतच घराजवळ केले जाई. त्यासाठी लांब-रुंद खड्डा खणून त्यात शव दक्षिणोत्तर - ठेवत असत. मृताला मरणोत्तर जीवनात उपयोगी पडावे म्हणून भांड्यांत अन्नपाणी ठेवत असत. परंतु मध्य प्रदेशात माळव्यामध्ये, जिथे माळवा संस्कृतीचा उगम झाला, तिथे मात्र दफनांचा पुरावा अजिबात नाही. बहुधा ते लोक महाराष्ट्रात, दक्षिणेतील नवाश्मयुगीन लोकांच्या संपर्कात आल्यानंतर त्यांच्यातील काहींनी दफनाची - प्रौढांची आणि लहान मुलांची पद्धत अंगीकारली असावी.

**जोर्वे संस्कृती**

जोर्वे संस्कृती ही महाराष्ट्रात उगम आणि विकास पावलेली संस्कृती. त्या आधीचे लोक महाराष्ट्रात बाहेरून आलेले होते. परंतु ही संस्कृती मराठी मातीतील, अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण. इ.पू. १५०० च्या सुमारास महाराष्ट्रातून माळवा संस्कृती नामशेष झाली, परंतु माळव्यात ती पुढे इ.पू. १२०० पर्यंत टिकाव धरून होती. त्यानंतर तिचाही मागमूस राहिला नाही. एकंदरीत पुराव्याचा विचार करता असे दिसून येते की, जोर्वे संस्कृतीचा उगमही माळवा संस्कृतीतून झाला असे म्हणता ईल. इनामगाव येथील उत्खननात याचा अत्यंत तपशीलवार अभ्यास केल्यावर या निष्कर्षाप्रत आम्ही पोहोचलो.

भारताच्या पुरातत्त्वीय संशोधनात जोर्वे संस्कृतीचे अनन्यसाधारण स्थान आहे. सिंधु संस्कृतीचा शोध १९२१ च्या सुमारास हडप्पा आणि मोहेंजोदारो येथील उत्खननात लागला. परंतु त्यामुळे भारतीय पुरातत्त्वात एक प्रचंड मोठी दरी निर्माण शाली. सिंधु संस्कृतीचा इ.पू. १६०० च्या सुमारास अंत झाला. तेव्हापासून बुद्ध- महावीरांच्या काळापर्यंतच्या (इ.पू. सहावे शतक) हजार वर्षांत भारतात काय झाले, याची आपल्याला काहीही कल्पना नव्हती. स्वातंत्र्योत्तर काळात या प्रश्नाकडे पुरातत्वज्ञांचे लक्ष वेधले गेले. या काळात भारतात सर्वत्र ताम्रपाषाणयुगीन लोक राहत होते, याचा त्यांना शोध लागला. त्यात सर्वांत आधी शोध जोर्वे संस्कृतीचा. तो पुण्याच्या डेक्कन कॉलेजच्या डॉ. ह. धी. सांकळीयांनी १९५० मध्ये लावला. त्यावेळी वेळी त्यां त्यांचे नाशिक इथे उत्खनन सुरू होते. वर्तमानपत्रात आलेल्या एका बातमीने त्यांचे लक्ष वेधून घेतले. (कै.) डॉ. शंकरराव साळी नावाच्या एका संगमनेरच्या मामलेदाराच्या कचेरीतील लिपिकाला माहिती मिळाली, की जवळच ५ किलोमीटर अंतरावर प्रवरेच्या काठी असलेल्या जोर्वे या गावी एका शेतकऱ्याला त्याचे शेत नांगरत असताना काही रंगीत नक्षीची खापराची भांडी आणि तांब्याच्या बांगड्या व कुऱ्हाडी सापडल्या. साळींनी तत्काळ भेट देऊन त्या वस्तू ताब्यात घेतल्या आणि पुण्याला येऊन डॉ. सांकलियांना दाखवल्या. त्या किती प्राचीन होत्या याची त्या काळी कल्पना आली नाही. परंतु त्याच प्रकारची खापरे त्यांना नाशिक येथील उत्खननात सर्वांत खालच्या थरात, मौर्यकालीन अवशेषांच्याही आधीच्या थरात, सापडली. त्यावरून त्यांचा इ.पू. १०००-५०० असा काळ ठरवण्यात आला. त्यानंतर बहाळ (जिल्हा जळगाव), नेवासे (जिल्हा नगर) इथे तसलेच अवशेष सर्वात खालच्या थरात आढळून आले. जोर्वे संस्कृतीच्या शोधाने नंतर भारतात इतरत्र ताम्रपाषाणयुगीन वस्त्यांचा शोध आणि उत्खनन सुरू

झाले. त्यामुळे इ.पू. २०००-६०० या काळात देशात सर्वत्र ताम्रपाषाणयुगीन शेतकऱ्यांच्या जोर्वे संस्कृतीची आजवर दोनशेहून अधिक स्थळे सापडली आहेत (आ. ३.४). कोकणची किनारपट्टी सोडल्यास, जवळजवळ संपूर्ण महाराष्ट्रभर या संस्कृतीचा विस्तार झालेला होता. ही • ही सारी स्वयंपूर्ण छोटी खेडी होती. ती खेडीच राहिली आणि नामशेष झाली. त्यांना कधी समृद्धी लाभून त्यांचे नागरीकरण झालेच नाही. साधारणपणे २-३ हेक्टर भूभागावर खेडे वसलेले असे. काही थोडी मोठी होती. तापीच्या खोऱ्यात प्रकाश, प्रवरा-गोदावरीच्या खोऱ्यात दायमाबाद आणि भीमेच्या खोऱ्यात इनामगाव ही थोडी मोठी होती. त्यांपैकी इनामगाव येथील उत्खनन मोठ्या प्रमाणावर झाले असल्यामुळे या संस्कृतीचे अनेक पैलू उजेडात आले आहेत. तेथील पुराव्याची शास्त्रशुद्ध छाननी करून काही महत्त्वाचे निष्कर्ष काढण्यात आले आहेत, लोकांची घरे, घरांचे प्रकार, त्यांची वसाहतरचना, त्यातील सोयी, वापरातील भांडी, शेती आणि धान्याचे प्रकार, लोकांचे अन्न, त्यांच्या धार्मिक समजुती बासंबंधीची अत्यंत मोलाची माहिती या उत्खननामुळे उपलब्ध झाली. या संस्कृतीची जवळजवळ ५०-६० घरे या उत्खननात उजेडात आली आणि सुमारे २३० दफने सापडली. त्यामुळे तत्कालीन समाजजीवन, राजकीय व्यवस्थापन, लोकांचे आरोग्य, रोगराई यांचाही अभ्यास करता आला. याशिवाय तत्कालीन पर्यावरणासंबंधीही माहिती हाताशी आली.

जोर्वे संस्कृतीचा उगम माळवा संस्कृतीत आहे याचा उल्लेख पूर्वी केला आहे. भाषा विश्‍वसनीय पुरावा रंगीत खापरांमध्ये मिळतो. हा बदल इ.पू. १५०० च्या भारास दिसून येतो. जोर्वे संस्कृतीची रंगीत भांडी वैशिष्ट्यपूर्ण असली तरी त्यांची निर्मिती माळवा संस्कृतीच्या खापरातून झालेली स्पष्ट दिसून येते. इतकेच नव्हे, तर स्थांची घरे आणि इतर दैनंदिन वापराच्या वस्तू यात विलक्षण साम्य आहे. परंतु हा फरक फक्त महाराष्ट्रातच घडून आला. खुद्द माळव्यामध्ये माळवा संस्कृती इ.पू. १२०० पर्यंत काहीही बदल न घडून येता अस्तित्वात होती. त्यानंतर तिचा हास

**इनामगाव**

इनामगाव हे आज एक लहान खेडे, पुण्यापासून ८५ किलोमीटर अंतरावर, श्रीहनदीच्या उजव्या तीरावर वसलेले आहे. हल्लीचे गाव दोनशे वर्षांपूर्वी वसवले गेले, बडोदे संस्थानच्या महाराणी चिमणाबाई या इनामगावच्या घाटगे घराण्यातील होत्या, बहुधा घाटग्यांना हे गाव इनाम दिले गेल्यामुळे त्याचे इनामगाव नाव पडले असावे. पुणे विद्यापीठातील एक कर्मचारी, कै. भिडे यांनी तेथील रंगीत खापरे डॉ. सांकलियांना दाखवली. तेव्हा त्यांनी मला व माझे एक सहकारी, डॉ. (कै.) अन्सारी थांना पाहणीसाठी इनामगावला भेट देण्यास सांगितले. १९६८ च्या सप्टेंबर महिन्यात आम्ही तिथे गेलो. तेथील प्राचीन गढी गावापासून ३ किलोमीटर दूर आहे. तिचे हाडे वगैरे सापडत असल्यामुळे गावकरी तिथे जाण्यास धजत नसत. तेथील वापरांच्या अभ्यासावरून हे सिद्ध झाले की, ताम्रपाषाणयुगानंतर तिथे पुन्हा वस्ती शाली नाही. त्यामुळे जोर्वे संस्कृतीचा सखोल अभ्यास करण्यासाठी इनामगाव हे अत्यंत योग्य स्थळ होते आणि म्हणून तिथे खूप मोठ्या प्रमाणावर उत्खनन करण्याचे आम्ही ठरवले. आमचे गुरू डॉ. सांकलिया यांचेही फार दिवसांपासून आगैतिहासिक खेडे पाहण्याचे स्वप्न होते. 'याची देही याची डोळा' त्यांना ते पाहता आले, याचा आम्हांला सार्थ अभिमान वाटतो.

इनामगाव येथील प्राचीन गढीचा विस्तार सुमारे पाच हेक्टर आहे. त्यात पाच निरनिराळ्या टेकड्या दिसतात. त्यांपैकी फक्त एका मोठ्या टेकडीवर इ.पू. १७००- ९०० या संपूर्ण काळात वस्ती होती. इतर ठिकाणी निरनिराळ्या काळात वस्ती होती. त्यांपैकी चार टेकड्या चौकोनी आकारात वसल्या आहेत. त्यामुळे मध्यभागी मोठे मैदान आहे. पाचवी टेकडी पश्‍चिमेकडे थोड्या अंतरावर आहे. या सर्व प्राचीन गढ्यांची स्थिती अत्यंत शोचनीय आहे. लोकांनी मोठ्या प्रमाणावर माती खणून नेल्यामुळे प्राचीन अवशेषांची बेसुमार नासधूस झाली आहे. तसेच आसपास शेती असलेल्यांनी दरवर्षी प्राचीन वस्तीच्या भागात नांगरट करून आपली शेती वाढवली आहे. तेंव्हा नजिकच्या काळात इनामगावची ही प्राचीन वस्ती पूर्णपणे नाहीशी होणार आहे. सरकारकडे अनेक प्रयत्न करून त्याचा काही उपयोग होत नाही. साऱ्या देशात हा प्रकार चालू आहे.

इ.पू. १५०० च्या सुमारास जोर्वे संस्कृतीचा उदय झाला. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी ही संस्कृती इ.पू. १२०० पर्यंत टिकाव धरू शकली. परंतु इनामगाव इथे आणि 'भीमेच्या खोऱ्यात मात्र ती पुढे इ.पू. ९०० पर्यंत तग धरून राहिली. त्यामुळे तिचे पूर्व जोर्वे (इ.पू. १५००-१२००) आणि उत्तर जोर्वे (इ.पू. १२००-९००) असे दोन कालखंड करता येतात. पूर्व

जोर्वे काळात थोडीफार समृद्धी होती, परंतु उत्तर जोर्वे काळात मात्र लोकांची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची होती. शेती नावालाच शिल्लक राहिली होती, अनेकांच्या नशिबी भटके जीवन आले. पशुपालन आणि शिकार यांवर लोक कसेबसे दिवस ढकलत होते. परंतु इ.पू. ९०० नंतर येथील वस्ती उजाड झाली. त्या लोकांचे काय झाले हे आपल्याला माहिती नाही. याच काळात कर्नाटकातून महापाषाणीय लोकांची आक्रमणे सुरू झाली. त्यांच्याजवळ घोडे होते आणि लोखंडाची हत्यारे होती. त्यापुढे गरीब ताम्रपाषाणीय शेतकऱ्यांचा निभाव लागणे अशक्य होते.

घरे जोर्वे संस्कृतीच्या लोकांनी इनामगाव इथे घरे बांधताना थोडाफार विचार केलेला दिसतो. त्यांची घरे मातीचीच होती, परंतु ओळीत बांधलेली होती. समोरासमोर असलेल्या घरांच्यामध्ये दीड-दोन मीटरचा रस्ता किंवा गल्ली होती. ही घरे आकाराने चौकोनी असली तरी आधीच्या माळवा संस्कृतीच्या घरांपेक्षा लहान होती. साधारणपणे ५ x ३ मीटर आकाराची ही घरे होती. त्यांच्या मातीच्या भिंती बैठ्या (३०-४० सेंटिमीटर उंच) असून त्यांवर कुड, त्याला दोन्ही बाजूंनी चिखल थापलेला असे. वर कोनाकृती गवती छप्पर असे. बहुतेक सर्व घरे एका खोलीची होती. फक्त एकच घर मोठे होते. घरात मध्यभागी बैठी भिंत घालून त्याचे दोन भाग केलेले असत. मागच्या भागात चूल असे, पण ही वैलाची चूल नव्हती. एका लहान गोलाकार खड्ड्यात ती असे. तसेच जवळ एक मातीचा गोलाकार (१.५ मीटर व्यास, १० सेंटिमीटर उंच) कट्टा असे. त्यावर कणिंग उभारली जाई. शिवाय जमिनीत बळदही खणलेले असे. त्याच्या बाजू आणि तळ चुन्याने लिंपून काढीत. त्यात कडुनिंबाचा पाला ठेवत. त्यामुळे धान्याला कीड लागत नसे. अंगणातही बळदे खणलेली असत. प्रत्येक घरामध्ये असा मातीचा गोल कट्टा होता. त्याचे काय प्रयोजन असावे, हे ध्यानात येईना. परंतु गावातील घरांची पाहणी केल्यावर असे आढळून आले की, बहुतेक प्रत्येक घरात असे कट्टे होते. त्यावर कणिंग उभारलेली असे. बळदातही धान्य साठवले जात असे. पण मग कणगी कशासाठी, याची चौकशी केल्यावर त्याचा उलगडा झाला. गहू साठवण्यासाठी कणगी लागतात, कारण बळदातील उष्णतेमुळे तो खराब होतो. ज्वारी, बाजरीसारखी भरड धान्ये बळदात टिकून राहतात. ज्या कट्ट्यांवर कणिंग ठेवतात, त्याच्यात खाली वाळू आणि बोरीचे काटे घालून ठेवतात. त्यामुळे खालून उंदीर वर येऊन कणगीत शिरू शकत नाही. उत्खननात सापडलेल्या घरातील कट्ट्यात वाळू सापडली. बोरीचे काटे असावेत, परंतु ते नाहीसे झाले. भारतात प्राचीन परंपरा आजही हजारो वर्षांनंतर कशा टिकून आहेत याची त्यावरून कल्पना येते.

प्रत्येक घराला मोठे अंगण असे. ते सुद्धा घरातील जमिनीप्रमाणे सावून, चोपून तयार केलेले असे. आजही आपल्याकडे अंगणाचे महत्त्व अधिक आहे. घर फक्त साठवणासाठी आणि काही मौल्यवान वस्तू (असल्यास) ठेवण्यासाठी. बाकी सर्व व्यवहार अंगणात. इनामगाव उत्खननात प्रत्येक अंगणात चुलाणे होते. ते लंबगोलाकार खड्ड्यात असे. त्यात मध्यभागी एक मोठा चपटा दगड ठेवत. त्यावर चिखल थापलेला असे. अशा एका चुलाण्यात मातीचा तवा चिखल थापलेल्या दगडाला लावलेला होता. तो अर्थातच भाकरी भाजण्यासाठी होता. चुलाणे मोठे असल्यामुळे शिकारीत मारून आणलेले प्राणी तिथे भाजले जात असावेत. बळद बहुधा प्रत्येक घरात किंवा अंगणात असे. कणगीचा कट्टा मात्र फार थोड्या घरांत होता. त्याचा अर्थ त्यांची आर्थिक स्थिती हलाखीची असल्यामुळे ते फक्त बार्ली आणि ज्वारी पिकवत असावेत. गहू पिकवणे त्यांना परवडत नसावे. उत्खनन करत असताना प्रत्येक घरातील वस्तू अगदी खापराचा तुकडासुद्धा - घराच्या कोणत्या भागात सापडला, याची आम्ही नोंद ठेवत असू. त्यामुळे घरात आणि अंगणात किंवा आसपासच्या भागात तिथे राहणारी माणसे काय करत असावीत यासंबंधी तर्क करून महत्त्वाचे निष्कर्ष काढता येतात. याचा एक उपयोग असा होतो की, काही घरांतील वस्तूंवरून तिथे राहणाऱ्या माणसांचा व्यवसाय काय असावा, हे समजून घेता येते. त्यामुळे कुंभाराचे, लोणाऱ्याचे (चुना तयार करणाऱ्याचे), मणी तयार करणाऱ्याचे, इत्यादींची घरे ओळखता आली. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे वसाहतीच्या प्रमुखाचे आणि त्याच्या शेजारी वसाहतीचे धान्याचे कोठार आम्हांला सापडले. इतकेच नव्हे, तर प्रत्येक घरातील धान्य, जनावरांची हाडे इत्यादींच्या अभ्यासावरून तत्कालीन लोकांचा आहार, त्यांच्या दफनावरून त्यांचे आरोग्य इत्यादींचा अत्यंत सविस्तर अभ्यास करता आला. तत्कालीन पर्यावरणाची कल्पनाही त्यावरून येते. अशा प्रकारचा मानवी जीवनाचा सर्वांगीण अभ्यास केला असलेले हे भारतातील एकमेव उत्खनन आहे. त्याचा सविस्तर वृत्तांत तीन खंडांत प्रसिद्ध झाला आहे. इनामगावची प्राचीन वसाहत पाच टेकड्यांत विभागलेली होती. त्यातील टेकाड क्रमांक पाच हे थोडे दूर अंतरावर होते. बाकीची चार टेकाडे

एकमेकांना लागून होती. क्रमांक एकचे टेकाड सर्वात मोठे असून तिथे माळवा आणि पूर्व व उत्तर जोर्वे काळात वस्ती झाली होती. क्रमांक दोनच्या ठिकाणी फक्त माळवा संस्कृतीचे अवशेष होते. क्रमांक तीन आणि चार टेकड्यांत मात्र तिन्ही कालखंडांत वस्ती होती. क्रमांक पाचची वस्ती फक्त पूर्व जोर्वेकालीन होती. तिथे नदीचे पाणी एका ओढ्यातून वळवून एका तलावात साठवले जाई. त्याला समांतर असा बंधारा बांधलेला होता. त्याच्या डागडुजीसाठी काही मजूर तिथे राहत असावेत. पूर्व जोर्वे काळात तो बांधला होता, त्यानंतर तो निरुपयोगी झाला.

पूर्व जोर्वे संस्कृतीच्या लोकांची घरे बांधताना विशिष्ट योजना त्यांमागे असावी असे वाटते. याचे मुख्य कारण म्हणजे वसाहतीच्या प्रमुखाचे घर हे मोठ्या टेकाडाच्या मध्यभागी होते (आ. ३.५). हल्ली जसा पाटील किंवा देशमुखाचा वाडा गावात मध्यभागी असतो, तसा हा प्रकार आहे. त्याच्या शेजारी धान्याचे कोठार होते. वसाहत प्रमुखाचे अर्थात त्यावर नियंत्रण असणार, यात शंका नाही. इतर व्यावसायिकांची घरे इतर भागात होती. मुख्य टेकाडाच्या भागातील घरे खूपच सुस्थितीत होती. त्या मानाने इतर भागातील घरे निकृष्ट दर्जाची होती. ती आकाराने लहान असून त्यांच्या जमिनी चोपून पक्क्या केलेल्या नसत. तसेच त्यात धान्यही फारसे सापडले नाही. मुख्य टेकाडातील घरांच्या जमिनी वारंवार चोपून पक्क्या केल्याचा स्पष्ट पुरावा आहे. दर वर्षाआड, जमिनीवर भर घालून ती तयार करत. एका घरात ९-१० वेळा अशी जमीन भर घालून केलेली आढळली. म्हणजे निदान वीस वर्षे तिथे वास्तव्य असावे. काही ठिकाणी आधी मोठे असलेले घर नंतर लहान केलेले आढळले. कदाचित आर्थिक स्थिती खालावल्यामुळे असे करावे लागले असावे. इतर घरांत सर्वसाधारणपणे चार-पाच वेळा जमीन तयार केलेली आढळली, म्हणजे दहा वर्षे एका घराचे आयुष्य समजण्यास हरकत नाही.

दायमाबाद येथील जोर्वे संस्कृतीच्या लोकांची घरेही चौकोनी आकाराची (५ × ३ मीटर) असून त्यात मध्यभागी बैठी भिंत घालून त्याचे दोन भाग केलेले असत. तिथेही घरात सापडलेल्या वस्तूंवरून कुंभाराचे, मणी तयार करणाऱ्याचे, खाटकाचे अशी त्यात राहणाऱ्यांची घरे ओळखता येतात. तेथील एक घर (क्रमांक ६) हे बहुधा हाडाची हत्यारे तयार करणाऱ्या कारागिराचे असावे असे वाटते, किंवा ते खाटकाचे असणे शक्य आहे. क्रमांक ५८ आणि क्रमांक ६५ ही घरे मणिकाराची असणे शक्य आहे. त्यात गारेच्या दगडाची ड्रील्स सापडली. तेंव्हा ती मणी तयार करणाऱ्या कारागिराची असण्याची दाट शक्यता आहे.

दायमाबाद येथील क्रमांक ३८ हे घर आकाराने खूप मोठे (९ x ५ मीटर) होते. ते एखाद्या समृद्ध कुटुंबाचे असावे. परंतु पुढे त्यांच्या वारसांची आर्थिक स्थिती ढासळली आणि घर आकाराने खूप लहान (५ x ३ मीटर) झाले. या घरात भाजक्या मातीची मूर्ती सापडली. ती एका पुरुषाची आणि तीन स्त्रियांची होती. या घरात दंडगोल आकाराची एक मातीची मुद्रा सापडली. त्यावरून हे घर एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीचे असावे, असा तर्क करता येतो. आणखी एक वास्तू धार्मिक समजुतींशी ती निगडित असावी. त्यात एक मोठा मातीचा कट्टा होता. तो आकाराने ४ x ३.५ . व १० सेंटिमीटर जाड होता. ही वास्तू लंबगोल आकाराची होती हे विशेष." त्यात मानवी वास्तव्याचा फारसा पुरावा नव्हता, खापरांचे ढीग मात्र त्यात होते. पूर्व जोर्वेकालीन बहुसंख्य घरे आकाराने चौकोनी असली तरी काही गोल घरेही त्या काळात अस्तित्वात होती. ती आकाराने लहान (१.५ ते २ मीटर व्यासाची) होती. त्यात सापडलेल्या अवशेषांवरून आणि त्यांच्या बांधणीवरून ती गरीब लोकांची असावीत यात शंका नाही. अशा प्रकारची गोल घरे आजही इनामगाव आणि आसपासच्या गावांत पाहावयास मिळतात. ती अत्यंत गरीब लोकांची आहेत.

इनामगाव येथील पूर्व जोर्वे काळातील बहुसंख्य घरे एका खोलीची असली तरी एक घर मात्र खूपच मोठे होते ते वस्तीच्या मध्यभागी बांधलेले होते. ते पाच खोल्यांचे होते. त्यांपैकी चार खोल्या चौकोनी आकाराच्या आणि एक गोलाकार होती. ती स्वतंत्र बांधलेली होती, परंतु बाकीच्या चारही चौकोनी खोल्या एकमेकांना जोडलेल्या होत्या. त्यांपैकी दोन मोठ्या आणि दोन लहान होत्या. हे एकच घर खूप मोठे असल्यामुळे ते अर्थातच अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीचे असावे यात शंका नाही. त्यात धान्य साठवण्याची चांगली सोय होती. त्याच्या शेजारी दुसरी एक महत्त्वाची वास्तू होती. ती आकाराने मोठी असून (१० x १० मीटर) मध्ये एक बैठी भिंत घालून तिचे दोन भाग केले होते. परंतु आतमध्ये फक्त धान्य साठवण्यासाठी अनेक बळदे आणि कणगींसाठी गोलाकार कट्टे होते. त्यावरून हे धान्याचे कोठार असावे हे स्पष्ट होते. ते बहुधा वसाहतीचे असून वसाहत प्रमुख लोकांकडून धान्याच्या स्वरूपात कर गोळा करून ते या कोठारात

साठवीत असावा. दुष्काळात ते लोकांना वाटण्यासाठी असावे आणि म्हणूनच वसाहत प्रमुखाच्या घराच्या शेजारी हे कोठार बांधले गेले असावे.

**शेती**

पूर्व जोर्वे काळात पर्यावरण अनुकूल असावे असे वाटते. जोर्वे संस्कृतीचा एकूण विस्तार हा निमदुष्काळी प्रदेशात होता. त्यात इनामगावच्या परिसरात आजसुद्धा पाऊस बेभरवशाचा आहे. मध्य महाराष्ट्रात शेती म्हणजे जुगार समजला जातो, कारण दर तिसऱ्या वर्षी अपुरा पाऊस आणि दर चौथ्या वर्षी दुष्काळ ठेवलेला. परंतु पूर्व जोर्वे काळात पाऊस बऱ्यापैकी पडत असावा असे शास्त्रज्ञांचे मत आहे. गेल्या दहा हजार वर्षांतील पर्यावरणाचा क्रम ते खालीलप्रमाणे देतात :

१०,००० वर्षांपूर्वी अत्यंत शुष्क
१०,००० - ९,५०० वर्षांपूर्वी - थोडी सुधारणा
९,५००-५,००० वर्षांपूर्वी ५,००० —
३,७०० वर्षांपूर्वी शुष्क पाऊस चांगला
३,७०० - ३,५०० वर्षांपूर्वी शुष्क
३,५००-३००० वर्षांपूर्वी बरा पाऊस
३,००० - २,५०० वर्षांपूर्वी अत्यंत शुष्क, दुष्काळी पर्यावरण

वर दिलेले पर्यावरणातील बदल शास्त्रज्ञांनी पुरापरागविश्लेषणाच्या पुराव्यावर आधारलेले आहेत. राजस्थान हा सध्या वाळवंटी प्रदेश असला तरी प्राचीन काळी तिथे सिंधु संस्कृतीची भरभराटीस आलेली शहरे होती. पर्यावरणातील बदलामुळे ती लयाला गेली. तिथे पुष्कर, लुणकरणसर इत्यादी सरोवरे आहेत. त्यात प्राचीन वनस्पतींचे पराग दीर्घकाळ टिकून राहतात. त्यावरून पर्यावरणासंबंधी अनुमान करता येते. तिथे अश्मयुगापासून ते अलीकडच्या काळापर्यंत पर्यावरणात कसे बदल घडून आले, याचा शास्त्रज्ञांनी अभ्यास केला आहे. त्यावरून सांस्कृतिक बदल पर्यावरणातील बदलामुळे कसे घडून आले असावेत याची कल्पना येते. इ.पू. ३०००-१८०० या काळात पर्यावरण अनुकूल होते. त्यामुळे सिंधु संस्कृती बहरली. महाराष्ट्रापर्यंत ते लोक येऊन पोहोचले. परंतु प्रतिकूल पर्यावरणामुळे माळवा संस्कृती ग्रामीण संस्कृतीच राहिली, ती भरभराटीस येऊन नागरी झाली नाही. महाराष्ट्रात तर र ती जेमतेम दोनशे वर्षे तग धरून टिकून राहिली. परंतु इ.पू. १५००-१००० या काळात पर्यावरण थोडे सुधारले. त्यामुळे पूर्व जोवें काळातील लोकांना थोडे बरे दिवस आले; परंतु त्यानंतर वारंवार दुष्काळ पडू लागल्यानंतर त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची झाली. इ.पू. ९०० नंतर तर ते देशोधडीला लागले.

महाराष्ट्राचा हा आद्य बळीराजा शेती करत असला, तरी केवळ त्यावर जगणे अशक्य होते. त्याच्या जोडीला पशुपालन, थोडीफार शिकार व मासेमारी केल्याशिवाय भागत नव्हते. त्याच्याकडे शेळ्या, मेंढ्या आणि गाई-बैल होतेच, पण डुकरे, कोंबड्याही पाळल्या जात. म्हशीसुद्धा होत्या. माळवा संस्कृतीच्या काळात महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर वसाहती झाल्यावर बार्लीची लागवड प्रामुख्याने होत असे. त्यांनी गहूही आणला. परंतु गहू हे हिवाळी पीक, त्याला हिवाळ्यात पाऊस हवा, तो महाराष्ट्रात नाही. त्यामानाने ज्वारीच अधिक सोयीची. सिंधु संस्कृतीच्या काळात ती आखाती प्रदेशातून आपल्याकडे आली. थोडीफार बाजरीही लावली जात असे. परंतु मुख्य पीक बाली. याशिवाय मूग, मसूर, मटार, हुलगा, कुळीथ, उडीद यांचाही पुरावा उत्खननात

मिळतो. बोरीची झाडे सर्वत्र निसर्गतः उगवत असत. काही विद्वानांच्या मते महाराष्ट्रातील काळी, चिकण जमीन नांगर असल्याशिवाय लागवडीसाठी आणणे अशक्य होते. त्यामुळे नदीकाठच्या गाळवट भागात थोडीफार शेती केली जात असावी. परंतु काळ्या जमिनीला उन्हाळ्यात मोठाल्या भेगा पडतात. त्यामुळे खोलवर नांगरणी करण्याची जरूर नसते. एकोणिसाव्या शतकात भारतात आलेल्या एका ब्रिटिश तज्ज्ञाला असे आढळून आले की, काळी जमीन स्वतःच नांगरून घेते. याचा अर्थ एवढाच की, खोलवर भेगा पडल्यामुळे नांगरणीचे काम निराळे करावे लागत नाही. परंतु नांगराचा फाळ इनामगावाजवळच्या वाळकी उत्खननात सापडला. तो बैलाच्या हाडाचा असून त्याला एक छिद्र आहे. अशा प्रकारचे दगडी फाळ पश्चिम आशियात सापडले आहेत. तेव्हा थोडीफार नांगरणी होत असावी.

इनामगाव उत्खननात कडवे वाल आणि सागरी माशांची हाडे आढळून आली. त्यावरून कोकणातील तत्कालीन लोकांशी त्यांचा संपर्क असावा असे म्हणता येईल. जांभळाची झाडे इनामगावजवळच्या आसपास असावीत. दायमाबादच्या उत्खननात एका सुगंधी वनस्पतीचा शोध लागला. या सुगंधी बेला (Paronia odorata) वनस्पतीपासून हीना अत्तर तयार केले जाते. तीही कोकणातून आली असावी. आणखी एका वनस्पतीचा (Hyteropanax fragrans) पुरावा आहे. ती हिमालयातील शिवालिक पायथ्याच्या टेकड्यांत पार बंगाल, बिहारपर्यंत आढळते. रेशमाचे किडे ती खातात. आपल्याकडे इतक्या दूर ती कशी आली असावी हे एक गूढ आहे.

इनामगाव आणि दायमाबाद इथे सापडलेल्या धान्याच्या पुराव्यावरून असे दिसून येते, की तेथील शेतकरी खरीप आणि रब्बी अशी दोन्ही प्रकारची पिके काढत होते. याचा विश्वसनीय पुरावा इनामगाव येथील पूर्व जोर्वे कालखंडात मिळतो. तसेच गव्हाच्या लागवडीचाही पुरावा आहे. या काळात पर्यावरण थोडेफार अनुकूल होते, हे आपण पूर्वी, पाहिले आहे. सिंचनाची सोय असल्याचा उत्कृष्ट पुरावा उत्खननात मिळाला आहे. या काळात पाऊस थोडा अधिक असल्यामुळे नदीला पूर येत होता आणि वस्तीला कदाचित धोका निर्माण झाला असावा. त्यासाठी तेथील लोकांनी वसाहत प्रमुखाच्या नेतृत्वाखाली घोडनदीच्या पुराचे पाणी एका नाल्यावाटे वळवून, साठवून ठेवण्याची सोय केली. त्यासाठी एक नाली खोदली. ती ११८ मीटर लांब, ४ मीटर रुंद आणि ३.५ मीटर खोल होती. तिला समांतर असा एक दगडमातीचा बंधारा त्यांनी बांधला. हे पाणी एक तलाव खोदून त्यात आणून सोडले आणि तेथून एका कालव्याद्वारे ते शेतीला पुरवण्याची सोय केली. हा कालवा (१२० मीटर लांब आणि ६ मीटर रुंद) विमानातून घेतलेल्या छायाचित्रात स्पष्ट दिसतो. हा बंधारा मुख्य वसाहतीपासून सुमारे ३०० मीटर पश्चिमेकडे आहे. त्याच्याजवळच वस्तीचाही पुरावा आहे. बहुधा कालव्याची व्यवस्था पाहणाऱ्या कामगारांची तिथे वस्ती असावी. ही सिंचनाची सोय माळवा कालखंडात नव्हती आणि उत्तर जोर्वे काळात पुरेसे पाणी उपलब्ध नसल्यामुळे ती निरुपयोगी ठरली, असे उत्खनित पुराव्यावरून सिद्ध होते.

**अन्न**

निरनिराळ्या कालखंडांत महाराष्ट्रातील या आद्य शेतकऱ्यांचे अन्न कशा प्रकारचे होते हे शास्त्रीय परीक्षणावरून आता समजून घेता आले. पूर्व जोर्वे काळात इनामगाव येथील पशुपालनाचे प्रमाण ५२.७५ टक्के गाई-बैल आणि २२.९३ टक्के शेळ्या-मेंढ्या असे होते. या काळात शेतीला चांगले दिवस आले होते. त्यामुळे गायी-बैलांचे प्रमाण अधिक असणे स्वाभाविक आहे. परंतु नंतरच्या उत्तर जोर्वे काळात पर्यावरणातील बदलामुळे ते अधिक शुष्क झाल्यामुळे शेतीचे प्रमाण कमी झाले. पाळीव जनावरांच्या प्रमाणावरूनही हे सिद्ध होते. ते नेमके गायी-बैल २०.२२ टक्के आणि शेळ्या-मेंढ्या ५८.५४ टक्के असे उलटे झाले. अनेक लोकांना वर्षातून काही काळ भटके जीवन जगणे प्राप्त झाले. त्यासाठी शेळ्या- मेंढ्यांचे कळप घेऊन फिरणे अधिक सोयिस्कर असते. हल्ली महाराष्ट्रातील धनगरांचे जीवन याच प्रकारचे आहे. तसेच या काळात शिकारीचे प्रमाण वाढले. हरणाची शिकार मोठ्या प्रमाणावर केली गेली. त्याचे प्रमाण पूर्व जोर्वेकाळात ०.४ होते, ते उत्तर जोर्वे काळात १४% इतके वाढले. हरणाचे मांस रुचकर तर असतेच पण ते वर्षभर चांगले टिकते असे म्हणतात. त्यामुळे ते अधिक प्रिय. पाळीव प्राण्यांचे मांस खाल्ले जात असे हे निर्विवाद. ते हाडांच्या अवशेषांवरून, त्यांवरील घावांवरून सिद्ध होते. परंतु शास्त्रीय पाहणीवरून कोण अधिक मांसाहारी होते आणि कोण शाकाहारी हेही जाणून घेता येते. उत्खननात शेकडो दफने सापडली. त्यांच्या हाडांच्या अभ्यासावरून हे जाणून घेता येते. झिंक (zn), तांबे (cu) आणि स्ट्रॉशियम (sr) यांच्या अवशेषांवरून हे सांगता येते. पूर्व जोर्वे काळात त्या मानाने शाकाहाराचे प्रमाण अधिक होते. उत्तर जोर्वे काळात मांसाहाराचे प्रमाण वाढले, इतके की, कुत्र्याचे मांस खाल्ल्याचासुद्धा पुरावा आहे. तसेच त्या काळात मासेमारीचे प्रमाण वाढले. शिंपल्यांच्या ढिगांवरून कालवे किती खात असत याची कल्पना येते. हाडांतील मॅगनीजवरूनही ते सिद्ध होते. ढोबळ मानाने हे सांगता येते. परंतु प्रत्येक घरातील माणसांचा आहार कशा प्रकारचा होता आणि त्यावरून त्यांची सांपत्तिक स्थिती कशी होती यांसंबंधी महत्त्वाचे निष्कर्ष काढता येतात. लांब-रुंद चौकोनी घरात राहणाऱ्या लोकांच्या आहारात अधिक प्रथिने असत, त्या मानाने गोल घरात राहणाऱ्या मंडळींचा आहार साधा होता. पूर्व जोर्वे काळात जीवन स्थिर होते, सुबत्तेचे होते. मुले आईच्या अंगावर दोन ते पाच

वर्षांची होईपर्यंत पीत असत. परंतु उत्तर जोर्वे काळात भटके जीवन जगणाऱ्या मातांना हे शक्य नव्हते. त्यांची मुले जेमतेम वर्षभर अंगावर पीत असत. स्ट्राँशियम आणि कॅल्शियम यांच्या प्रमाणावरून हे जाणून घेता येते.

**प्राणी**

उत्खननात प्राण्यांची हाडे खूप मोठ्या प्रमाणावर सापडतात. त्यात प्रामुख्याने पाळीव प्राण्यांची आणि काही शिकारीत मारलेल्या जनावरांची असतात. या सर्व प्राण्यांचे मांस तत्कालीन मानव खात असे. हाडांवर असलेल्या घावांवरून हे स्पष्ट होते. ताम्रपाषाणयुगीन काळात गाय-बैल, शेळ्या-मेंढ्या आणि म्हशी पाळल्या जात. डुकरे, कोंबड्या, घोडा, गाढव पाळण्याचा पुरावाही आहे. कुत्रा तर मध्याश्मकाळापासून माणसाचा आवडता झाला होता. मासेमारी करण्यासाठी तांब्याचे गळ वापरत. हरिण, काळवीट, नीलगाय, सांबर यांची शिकार प्रामुख्याने केली जात असे.

इनामगाव इथे सापडलेल्या प्राण्यांच्या हाडांच्या परीक्षणावरून असे आढळून आले की, शेळी-मेंढा, गाय-बैल हे तीन महिने ते दोन वर्षाचे असताना कापले जात. त्यांच्या दातांवरून हे सिद्ध होते. काही हाडांवर भाजल्याच्या खुणा आहेत. तेव्हा मांस भाजून खात असावेत. भाजण्याचे काम उघड्यावर होत असावे, असे जळक्या हाडांवरून म्हणता येईल. रानडुकराची शिकार होत असे. पक्ष्यांची हाडेसुद्धा सापडतात. भांडी (आ. ३.६) पूर्व जोर्वे संस्कृतीची मातीची भांडी अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ती तांबड्या रंगाची असून त्यावर काळ्या रंगात नक्षी असते. त्यांची उत्पत्ती माळवा संस्कृतीच्या भांड्यांतून झाली याचा उत्तम पुरावा इनामगाव उत्खननात मिळाला. ती चाकावर पावलेली असून खरपूस भाजलेली असतात. त्यांवर तांबड्या रंगाचा पातळ लेप बैंकन मग नक्षी केली जाई. ती अत्यंत घाटदार आहेत. त्यात घडे, तोटीची भांडी, बागी, कुंडे इत्यादी हरप्रकार आहेत. जोर्वे संस्कृतीच्या कुंभारांचे आरे इनामगाव आणि दायमाबाद इथे सापडले. इनामगाव येथील भट्टी एखाद्या प्रचंड मोठ्या कबईसारखी होती. ती आकाराने गोल (व्यास १.७५ मीटर) असून दगडी पायावर उभारलेली होती. खालच्या बाजूस जळणाची सोय होती. दायमाबाद येथील भट्टी चौरस (५ x ५ मीटर) आकाराची होती. तिच्या भिंती (उंची १.४० मीटर) उंच होत्या (आ. ३.७). त्या भाजून पक्क्या झाल्या होत्या. त्यात आत अनेक अर्धवट भांडी होती आणि अर्धवट जळलेले सरपण होते. जोर्वे संस्कृतीच्या या भट्टया सिंधु संस्कृतीच्या भट्टयांपेक्षा थोड्या वेगळ्या आहेत. इनामगावची गोलाकार भट्टी त्या भावाने सिंधुकालीन भट्टीसारखी वाटते. फरक इतकाच, सिंधुकालीन भट्टी विटांची अरी. इनामगाव येथील भट्टी मातीची आहे. भांडी भाजण्यासाठी ७००° उष्णता आवश्यक असे. ताम्रपाषाण युगात हत्यारे प्रामुख्याने दगडी होती. ती गारेच्या दगडाची केली भात. त्याच्या लहान पातळ चिपा काढून त्यांना हाडात किंवा लाकडी दांडक्यात चिणून बसवत. त्याचा सुरीसारखा उपयोग होई. अणकुचीदार टोकाची हत्यारेही आहेत. या प्रकारची हत्यारे हजारोंनी सापडतात. गारेच्या चिपा काढण्याचे एक विशिष्ट तंत्र होते. ज्यापासून चिपा काढायचा तो गाभा (core) आधी तयार करून घेत आणि मग एकामागून एक चिपा काढत. नवाश्मयुगात वापरल्या जाणाऱ्या गुळगुळीत, चमकदार दगडी कुन्हाडी, छिन्या या काळात क्वचित वापरात होत्या. तांब्याची हत्यारेही वापरात होती. कुन्हाडी, छिन्नी, मासे मारण्याचा गळ इत्यादी सापडतात. तांब्याचे अलंकारही केले जात. तांब्याची कडी आणि मणी बनवले जात. परंतु तांबे दुर्मीळ असल्यामुळे त्याचा वापर बेताचाच होता. हाडांची हत्यारेही बनवली जात. त्यासाठी प्रामुख्याने हरणाच्या हाडांचा उपयोग केला जाई, कारण ते खूप टणक असते.

सोन्याचे अलंकारही वापरात होते. सोने खूपच दुर्मीळ असल्यामुळे उत्खननात एखाद-दुसरा मणी किंवा कर्णफूल सापडते. इनामगाव इथे सोनार होता. त्याच्या घरात मूस सापडली. तसेच तांब्याचे चिमटेही होते. सोने कर्नाटकातील हट्टी (जिल्हा गुलबर्गा) येथील खाणीतून आलेले असावे. चार हजार वर्षांपूर्वी तेथून सोने काढल्याचा पुरावा आहे.

ताम्रपाषाणयुगीन वसाहतीत अकीक, गोमेद यांसारख्या मौल्यवान दगडाचे मणी मोठ्या प्रमाणावर तयार केले जात. गारेच्या गिरमिटाने त्यांना छिद्रे पाडत असत. तांब्याची गिरमिटेही होती. शंखाच्या बांगड्या आणि पदके वापरात होती. त्यासाठी लागणारा शंख (Xancus pyrum) सौराष्ट्रातून आणला जात असे. चुना तयार करण्यासाठी कंकराच्या खड्यांचा उपयोग करत. बळदे सारवण्यासाठी चुना मोठ्या प्रमाणावर लागे. मेलेल्या जनावरांची कातडी साफ करण्यासाठीही चुना आवश्यक असतो. आजही त्याचा वापर केला जातो. खड्ड्यात चुन्याचे मिश्रण केलेले पाणी

साठवून त्यात कातडी दीर्घकाळ भिजत ठेवतात. त्यामुळे केस व चिकटलेले मांस काढून कातडे स्वच्छ करता येते. इनामगाव उत्खननात चुन्याच्या गोळ्यांचे ढीग काही ठिकाणी सापडले होते. तत्कालीन आर्थिक व्यवहाराचा थोडाफार पुरावा आढळतो. वस्तूंची देवाणघेवाण होत असे. सोने कर्नाटकातून, तांबे राजस्थानातून, शंख गुजरातमधून आणले गेले असावेत. परंतु त्याच्या बदलात काय दिले असावे हे सांगता येत नाही. बहुधा गोमेद, अकीक यांचे दगडगोटे दिले गेले असावेत. सौराष्ट्रात त्यांचे मणी तयार करण्याचा उद्योग खूप मोठ्या प्रमाणावर चालत असे. या मौल्यवान दगडांचे मणी तिथून पश्चिम आशिया, इजिप्तपर्यंत निर्यात केले जात. जोर्वे संस्कृतीचे लोक गुजरातमध्ये आणि कर्नाटकात जात येत असावेत, हे तिथे सापडलेल्या जोर्वे खापरांवरून सिद्ध होते.

**सामाजिक परिस्थिती**

जोर्वे संस्कृतीच्या बहुसंख्य लोकांची घरे एका खोलीची होती. फार थोडी घरे अधिक खोल्यांची होती. चौकोनी आकाराच्या घरावरून तिथे वर्षभर वास्तव्य असावे हे सिद्ध होते. तसेच त्यावरून एकत्र कुटुंबपद्धती असावी असा निष्कर्ष मानवशास्त्रज्ञांनी काढला आहे. घरातील मुलाचे लग्न झाले म्हणजे त्याला लगेच शेजारी लागून खोली बांधता येते. कुटुंबात स्त्रीला गौण स्थान असावे कारण सापडलेल्या एकूण दफनात पुरुषांची दफने अधिक आहेत. त्या मानाने स्त्रियांची फारच थोडी आहेत.

त्या काळात नायकशाही अस्तित्वात असावी, असा निष्कर्ष काढता येतो. इनामगाव, दायमाबाद इथे काही अशा वास्तू सापडल्या की, ज्यांच्या उभारणीत सर्व लोकांना भाग घ्यावा लागला असावा. उदा., इनामगाव येथील बंधारा, कालवा, धान्याचे कोठार इत्यादी. या सर्वांचे आयोजन आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी वसाहतप्रमुख आवश्यक होता. तेथील वसाहतीच्या मध्य भागातील पाच खोल्यांचे मोठे घर धान्याच्या कोठाराशेजारी होते. ते वसाहत प्रमुखाचे असावे, असा निष्कर्ष काढता येतो (आ. ३.५). शिवाय त्यात सापडलेल्या वैशिष्ट्यपूर्ण दफनांवरून या तर्काला पुष्टी मिळते. त्यात एका सुमारे ३५ वर्षे वयाच्या पुरुषाला ध्यानस्थ आसनात मांडी घालून एका चार खुरांच्या मोठ्या रांजणात बसवलेले होते. त्याच्या आधीच्या थरात, त्याच ठिकाणी जवळजवळ त्याच प्रकारचे रांजण (एक सबंध आणि दुसरा आधी त्याला लागून) पुरलेले होते. परंतु त्यात मृत व्यक्तीचे अवशेष नव्हते; म्हणजे ते सांकेतिक दफन होते. मृत व्यक्तीचे शव न सापडल्यामुळे सांकेतिक दफन केले असावे. त्यावरूनही त्याच्या समाजातील स्थानाची महती ध्यानात येते. हा माणूसही वसाहत प्रमुख असावा आणि वरच्या थरातील माणूस त्याचा वारस असावा. त्यावरून नायकशाही (Chiefdom) ही वंशपरंपरेने चालत असावी, असा निष्कर्ष काढणे संयुक्तिक होईल.

नायकशाहीचा पुरावा दायमाबादच्या उत्खननातही आढळून आला. तो सिंधु संस्कृतीच्या काळातील आहे. तिथे सहा खोल्यांचे एक घर होते. त्याच्या भोवताली बैठ्या भिंतीचे कुंपण होते. त्यात सिंधु लिपीतील एक मुद्रा सापडली. त्यावरून तिथे राहणारा माणूस हा तेथील वसाहत प्रमुख असावा असे वाटते.

**धार्मिक समजुती**

महाराष्ट्रातील या आद्य शेतकऱ्यांच्या धार्मिक समजुतींची थोडीफार कल्पना आपल्याला उत्खनित पुराव्यावरून येते. काही भाजक्या मूर्ती, जीवनोत्तर मरणावर विश्वास, खापरांवरील चित्रे यांच्या अभ्यासावरून तर्क करता येतो.

उत्खननात सापडलेली मातीची चित्रे ही लहान मुलांची खेळणीही असू शकतात. परंतु ती ज्या संदर्भात सापडतात, त्यावरून त्यांचा उपयोग काय होत असावा यासंबंधी आडाखे बांधता येतात. याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे इनामगाव इथे सापडलेल्या स्त्रीमूर्ती. तिथे एका घरात कोपऱ्यामध्ये एका लहान खड्ड्यात त्या पुरलेल्या आढळल्या. त्या कच्च्या मातीच्या असल्यामुळे खेळणी म्हणून फारशा उपयोगी नव्हत्या. शिवाय त्या अतिशय काळजीपूर्वक पुरून ठेवलेल्या होत्या. त्यात एक लंबगोलाकार मातीची डबी होती. तिच्यात एक छोटी स्त्रीमूर्ती होती (आ. ३.८). तिच्या झाकणावर आणखी एक मातीची स्त्रीमूर्ती आणि बैल ठेवलेला आढळला. या स्त्रीमूर्तीचे वैशिष्ट्य हे, की तिला शिर नव्हते (आ. ३.९). या मूर्ती ज्या घरात सापडल्या, त्याचा काळ साधारणपणे इ.पू. १३०० असा निश्चित केला आहे. या प्रकारच्या शिरोविहीन मूर्ती इनामगाव इथे आणखी काही मिळाल्या आहेत. शिरोविहीन मातृदेवतांच्या मूर्ती नंतरच्या इतिहासकाळात आढळतात. लज्जागौरी म्हणून आता त्या ओळखल्या जातात. इ.पू. दुसऱ्या शतकापासून त्या तयार

केल्या गेल्या. मातीच्या छोट्या मूर्ती सातवाहन काळातील आहेत. तेर इथे आणि इतर ठिकाणी त्या उत्खननात सापडतात. त्यांची उत्कृष्ट कलापूर्ण शिल्पे मात्र सहाव्या- सातव्या शतकातील आहेत (आ. ७.१). आंध्र-कर्नाटकात आणि महाराष्ट्रातही त्या आढळतात. आजही वांझ स्त्रिया पुत्रप्राप्तीसाठी त्यांची पूजा करतात. त्यावरून त्या सुफलनाशी संबंधित आहेत हे सिद्ध होते.

महाराष्ट्रातील एका जमातीची अशी एक शिरोहीन देवता आहे (आ. ३.१०). ठाणे जिल्ह्यातील वारली लोकांची पालघट नावाची देवता या प्रकारची आहे. त्यांच्यात घरात लग्न असले म्हणजे त्या देवतेचे चित्र पांढऱ्या रंगात घराच्या भिंतीवर काढतात. त्यात देवतेच्या पोटात घोड्यावर नवरा-नवरी व करवली बसलेली दाखवतात. वारली भाषेत 'पालघट' या शब्दाचा अर्थ, स्त्री ज्या अवस्थेत

प्रसूत होते ती अवस्था. त्यामुळे चित्रात तिचे पाय संपूर्ण फाकलेल्या अवस्थेत दाखवतात. त्यावरून ती सुफलनाची देवता आहे हे सिद्ध होते. वारली लोकांच्या सांगण्यानुसार पालघटच्या पूजेचा अधिकार फक्त स्त्रियांना असतो आणि कोणताही विवाह तिच्या अधिष्ठानाखेरीज पूर्ण होत नाही. आपल्या पुराणातही एका शिरोहीन देवतेचा उल्लेख येतो. मार्कंडेय पुराणातील देवी-माहात्म्यात एक कथा सांगितली आहे. त्यात शंभर वर्षे पडलेल्या एका दुष्काळाचा उल्लेख आहे. तेव्हा देवीने दुर्ग नावाच्या दैत्याचा संहार करून नंतर सर्वत्र पाऊस पाडला आणि सर्व भूमी वनस्पतींनी हिरवीगार केली. त्यामुळे तिचे नाव शाकंभरी झाले. पद्मपुराणात तिच्या शिराऐवजी कमळ असते असा उल्लेख आहे. लज्जागौरीच्या शिल्पात नेहमी शिराऐवजी कमळ असते, हे या संदर्भात ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. तसेच कर्नाटकातील बदामीजवळ असलेल्या बनशंकरी येथील देवी शाकंभरी म्हणून ओळखली जाते हेही नमूद केले पाहिजे. स्कंदपुराणात शाकंभरीचा 'छिन्नमस्ता' असा उल्लेख आहे. देवी-माहात्म्यात (९१.४३-४४) दुष्काळ पडू नये म्हणून शाकंभरीची पूजा करावी असे सांगितले आहे.

महाभारतातही एका शिरोहीन देवतेचा उल्लेख आहे. कार्तिकयाचा जन्म झाल्यानंतर त्याचे लालनपालन करण्यासाठी ज्या मातृकांची शिवपार्वतींनी नेमणूक केली, त्यात एक विशिरा नावाची होती.

या लज्जागौरी किंवा शाकंभरीच्या मूर्ती प्रागैतिहासिक काळातील अनेक स्थळी सापडतात. दुष्काळात त्यांची पूजा होत असावी. दुष्काळ' भारतात वारंवार पडतात. इ.पू. २०००-५०० या काळात जगात सर्वत्र प्रतिकूल पर्यावरण होते. त्या काळी आपल्याकडे या शिरोहीन देवतेची पूजा करण्यास सुरुवात झाली असावी. शिर असलेल्या काही स्त्री-मूर्ती मातृदेवतेच्या असाव्यात. सिंधु संस्कृतीच्या काळातील मातृदेवतेच्या मूर्ती सिंध-पंजाबमध्ये पुष्कळ सापडल्या आहेत. इनामगावातील एका स्त्री-मूर्तीच्या अंगावर छिद्रांची नक्षी आहे. ते अलंकार असण्यापेक्षा रोगाचे डाग वाटतात. देवीची साथ भारतात फार पूर्वीपासून होती. तेव्हा ही देवी त्या रोगाशी संबंधित शितळादेवीसारखी असण्याची अधिक शक्यता आहे.

मातृदेवतेच्या मूर्तीबरोबर बैलाची आकृती असण्याचा पूर्वी उल्लेख केलेलाच आहे. तेंव्हा बैलालाही धार्मिक समजुतींत स्थान होते यात शंका नाही. सिंधु संस्कृतीत तर ते प्रकर्षाने जाणवते. इनामगाव येथील शिरोहीन मातृदेवतेची मूर्ती बैलावर बसवलेली असावी असे त्यांच्यावरील छिद्रांवरून म्हणता येईल. काडीच्या साहाय्याने ती बैलावर बसवता येते. माळवा संस्कृतीच्या काळात वन्यप्राण्यांनाही पूज्य मानले जात असल्याचे पूर्वी सांगितले आहे.

इनामगाव येथील वसाहत प्रमुख हा बहुधा धर्मगुरूही असावा असे त्याच्या योगमुद्रेत बसवलेल्या दफनावरून वाटते. मृताचे दफन करताना सामान्यजनांचे पाय घोट्यापासून कापून टाकत. पण वसाहत प्रमुखाचे पाय तोडलेले नव्हते. याचा अर्थ, सामान्य जनांचे नियम त्याला लागू नव्हते. तो सर्वांपेक्षा वेगळा होता. त्याच्या घराशेजारील वसाहतीच्या धान्यकोठारात अग्निकुंडही होते. ते अग्निपूजेसाठी असण्याची दाट शक्यता आहे, कारण कोठारात अग्नीची सोय असण्याचे काहीच प्रयोजन नव्हते. आकाराने ते अग्निकुंड कालीबंगन राजस्थान इथे बालेकिल्ल्यात सापडलेल्या अग्निकुंडासारखे आहे.

**दफने**

माळवा संस्कृतीच्या लोकांत दफनपद्धती अस्तित्वात नव्हती. अपवाद म्हणून फक्त एका लहान मुलाचे अस्थिकुंभात दफन केलेले इनामगाव इथे आढळून आले. परंतु पूर्व जोर्वे काळात मृताचे दफन केले जाई. लहान मुलांना

दोन कुंभात घालून पुरले जाई (आ. ३.११). दोन्ही कुंभ एकाला एक तोंड लावून ठेवत. त्यांपैकी एक लहान आणि दुसरा मोठा असे. लहान कुंभात डोके आणि मोठ्यात शरीर ठेवत. डोके उत्तरेकडे आणि दक्षिणेकडे पाय करून दफन करत. मुलाचे शव कुशीवर, पाय पोटाशी दुमडून, गर्भावस्थेत असल्याप्रमाणे ठेवीत. तो जीव पुन्हा मातेच्या उदरात गेला अशी त्यामागे भावना असावी. त्याचा पुनर्जन्म व्हावा अशी श्रद्धा असावी. शंकराचार्यांनी म्हटल्याप्रमाणे माणूस मृत्यू पावतो म्हणजे पुनर्जन्मासाठी मातेच्या उदरात जातो.

मृताबरोबर त्याला मरणोत्तर जीवनात उपयोगी पडावे म्हणून लहान वाडग्यात अन्न आणि तोटीच्या भांड्यात पाणी ठेवत. ही दफने बहुधा घरातच किंवा अंगणात केलेली आढळतात. मृताचा आत्मा आपल्यात असावा अशी कल्पना त्यामागे असण्याची दाट शक्यता आहे. मोठ्या मुलासाठी तीन किंवा पाच कुंभ आणि लहान अर्भकासाठी एक कुंभ वापरल्याची उदाहरणे आहेत. अर्थात हे त्यांच्या सांपत्तिक

स्थितीवरही अवलंबून असणार. प्रौढ व्यक्तीचे दफन खड्डा खणून त्यात केले जाई (आ. ३.१२). डोके उत्तरेकडे आणि पाय दक्षिणेकडे करून शरीर उताणे ठेवत. विधिपूर्वक दफन करण्यापूर्वी मृताचे पाय घोट्यापासून खाली तोडून टाकत. बहुधा मृताचे भूत परत येऊ नये म्हणून असे करत असावेत. दफनामागे आणि दहनामागेही हीच कल्पना असते. मृताला मरणोत्तर जीवनात उपयोगी पडावे म्हणून अन्नपाण्याची भांडी ठेवत. त्यात असलेल्या तोटीच्या भांड्यावर काहीवेळा होडीचे चित्र असते. मरणोत्तर जीवनात माणसाला नदी पार करावयाची असते, अशी आजही आपल्यात समजून आहे म्हणून होडीचे चित्र काढत असावेत. बहुतेक सर्व दफने वसाहतीत घरात किंवा अंगणात केलेली असत. फक्त बहाळ येथील स्मशानभूमी टेकवाडा इथे वसाहतीपासून दूर, नदीच्या पलीकडच्या तीरावर होती. प्रकाश येथेही ती तापीच्या समोरच्या किनाऱ्यावर असावी. सिंधु संस्कृतीच्या नगरात स्मशानभूमी वेगळी असे. त्याचा प्रभाव तापीच्या खोऱ्यात दिसतो.

वसाहत प्रमुखाचे दफन पूर्णपणे वेगळ्या प्रकारचे होते, याचा वर उल्लेख केला आहे. त्याला घरातच खड्डा खणून एका चार खुरांच्या रांजणात मांडी घालून बसवले होते. मृत्यूसमयी त्याचे वय पस्तीसच्या सुमारास असावे. त्याचे पाय तोडलेले नव्हते. त्याच घरात, त्याच ठिकाणी, परंतु खालच्या थरात आणखी एक दफन याच पद्धतीचे होते. त्यात एक चार खुरांचा पूर्ण रांजण आणि दुसरा तसाच पण अर्धा उभा कापलेला, त्याला जोडून खड्ड्यात ठेवलेला होता, परंतु त्यात मृताचा सांगाडा किंवा हाडे नव्हती. त्यामुळे या दफनाला सांकेतिक म्हणणे योग्य होईल. कदाचित तो पुरुष वन्यप्राण्यांनी खाऊन टाकला असावा किंवा शेजारच्या टोळीशी झालेल्या चकमकीत तो मारला गेला असावा आणि त्याचे प्रेत सापडले नसावे. परंतु माणूस इतका महत्त्वाचा (वसाहतप्रमुख) की त्याच्या समाजातील उच्च स्थानामुळे योग्य प्रकारे दफन करणे आवश्यक होते, म्हणून अशा प्रकारचे सांकेतिक दफन कैले असण्याची शक्यता आहे. इनामगावच्या या दोन्ही दफनांच्या प्रकारावरून वसाहत प्रमुखाचे पद हे वंशपरंपरागत चालत जात असावे असा निष्कर्ष काढणे चूक ठरणार नाही. अशा प्रकारची सांकेतिक दफने सिंधु संस्कृतीच्या वसाहतीत कालीबंगन येथे सापडली आहेत.

**वाळकी**

इनामगावच्या पश्चिमेस ३० किलोमीटर अंतरावर घोड आणि भीमा या नद्यांच्या संगमावर वाळकी हे खेडे वसलेले आहे. गावापासून जवळच संगम आहे. तिथे पूर्व जोर्वे काळात वस्ती होती. तिचे उत्खनन आम्ही केले. त्यात काही थोडी चौकोनी आकाराची व अनेक गोलाकार घरे सापडली. ती सर्व अत्यंत निकृष्ट दर्जाची होती. चौकोनी घरांच्या बैठ्या भिंतींवरून त्यांना झोपड्याच म्हणावे लागेल. तसेच त्यांची जमीनही चोपून केलेली नव्हती. त्यावरून तिथे कायम वस्ती नसावी असे दिसते. गोलाकार झोपड्या तर अत्यंत निकृष्ट दर्जाच्या होत्या. त्यांचे पाच-सहाचा एक असे समूह होते. हल्ली साखर कारखान्यात जे मजूर ४-६ महिने कामासाठी येतात, त्यांच्या झोपड्यांसारख्या त्या असाव्यात. त्यातील मातीच्या तपासणीवरून कोणत्या झोपडीत माणसे राहत असावीत, कोणत्या झोपडीत शेळ्या-मेंढ्या, कोठे धान्य, कोठे स्वयंपाकघर होते, यांसंबंधी आडाखे बांधता येतात. एकंदरीत घरांच्या अवशेषांवरून ही इनामगावच्या समृद्ध शेतकऱ्यांची वाडी असावी, असे म्हणणे चूक ठरणार नाही. तिथे संगमाकाठची काळी जमीन अत्यंत सुपीक आहे. तेव्हा पावसाळ्यात शेती करून पिके काढत असावेत. चौकोनी घरात मालक येऊन राहात असावा आणि गोल झोपड्या मजुरांसाठी असाव्यात.

**उत्तर जोर्वे संस्कृती (इ.पू. १२००-९००)**

जोर्वे इथे ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचा शोध लागल्यानंतर महाराष्ट्रात अनेक जोर्वे संस्कृतीच्या स्थळांचा शोध लागला. त्यांपैकी नेवासा, चांडोली, दायमाबाद, प्रकाश इत्यादींचे उत्खननही झाले. सर्वत्र असे आढळून आले की, जोर्वे संस्कृतीचा हास इ.पू. १२०० च्या सुमारास सुरू झाला आणि थोड्याच काळात ती नामशेष झाली. याचे काय कारण असावे याचा पुरावा हाती येत नव्हता. आता नव्याने केलेल्या संशोधनावरून असे दिसून येते की, तापी, प्रवरा, गोदावरी या नद्यांच्या खोऱ्यातील जोर्वे संस्कृतीचे लोक देशोधडीला लागले, त्यांच्या वसाहती उजाड झाल्या; परंतु घोड, भीमा आणि कृष्णेच्या खोऱ्यात ही संस्कृती कशीबशी पुढे तीनशे वर्षे (इ.पू. १२००-९००) तग धरून राहिली होती. याचा विश्वसनीय पुरावा इनामगाव उत्खननात प्रथम मिळाला. उत्तर जोर्वे संस्कृती अगदी निकृष्ट स्वरूपात टिकून राहिली होती. त्यांची घरे, भांडीकुंडी, हत्यारे, गगनी या सर्वांवरून त्यांची आर्थिक स्थिती खूप खालावली होती याची कल्पना येते. घोडनदीच्या आणि कृष्णेच्या खोऱ्यात या संस्कृतीचे अवशेष सापडले आहेत. दक्षिण महाराष्ट्रात ही मंडळी कशीबशी जगली आणि इ.पू. ९०० नंतर नाहीशी झाली. त्यांचे काय झाले हे आपल्याला माहीत नाही. बहुधा शिकार आणि कंदमुळे-फळे यांवर गुजराण करून भटके-जीवन त्यांच्या नशिबी आले असावे.

जोर्वे संस्कृतीच्या शोधानंतर भारतात इतरत्रही पुरातत्त्वीय अन्वेषण मोठ्या प्रमाणावर सुरू झाले. त्यामुळे जवळजवळ साऱ्या देशभर इ.पू.च्या दुसऱ्या सहस्रकात ताम्रपाषाणयुगीन संस्कृती नांदत होत्या हे आता सिद्ध झाले आहे. याच काळात दक्षिण भारतात नवाश्मयुगीन शेतकरी राहत होते. परंतु ही सारी मंडळी कायम दरिद्रीच राहिली. त्यांची संस्कृती ग्रामीणच राहिली, तिचा विकास होऊन त्यांचे नागरीकरण कधी होऊ शकले नाही. याचे मुख्य कारण प्रतिकूल पर्यावरण असावे असे आता दिसून येते. इ.पू. ३००० पासून २००० पर्यंत पर्यावरण अनुकूल होते. राजस्थानमध्ये - जिथे आज वाळवंट आहे सिंधु संस्कृतीची नगरे भरभराटीस आलेली होती. त्या काळी तिथे सुमारे २४ इंच पाऊस पडत असावा असा निष्कर्ष पुरापराग विश्लेषणाच्या (Pollen analysis) पुराव्यावरून काढता येतो. परंतु इ.पू. २००० पासून पर्यावरण अधिकाधिक शुष्क होऊ लागले, पाऊस कमी झाला, वारंवार दुष्काळ पडू लागले. त्यामुळे सिंधु संस्कृतीचा -हास सुरू झाला. ते लोक भारतभर पांगले. त्यांच्या संस्कृतीचा प्रभाव काही ताम्रपाषाणयुगीन संस्कृतींवर पडलेला दिसतो. परंतु पर्यावरण अधिकाधिक शुष्क झाल्यामुळे इ.पू. १५०० नंतर काही संस्कृती (उदा., माळवा) नामशेष झाल्या. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात आणि संपूर्ण पश्चिम आणि दक्षिण भारतातील हे आद्य शेतकरी देशोधडीला लागले. पुढे इ.पू. सहाव्या शतकात पुन्हा वस्ती होईपर्यंत त्या वसाहती उजाड राहिल्या.

दुसऱ्या सहस्रकातील हा पर्यावरणीय बदल फक्त भारतापुरता मर्यादित नसून इजिप्त, पश्चिम आशिया आणि युरोपमध्येही घडून आला. इजिप्तमध्ये त्याचा लिखित पुरावा आहे. या काळात युरोपमध्ये भयानक, हिमयुगासारखी थंडी होती. तिला तिथे 'न्यूक्लिअर विंटर' म्हणतात. भविष्यात जर जर अणुयुद्ध झाले, तर त्यामुळे निर्माण होणाऱ्या धुराचा थर इतका प्रचंड मोठा असेल की, सूर्याचे किरण पृथ्वीवर पोहोचू शकणार नाहीत आणि त्यामुळे तिथे हिमयुगासारखी थंडी पडेल. शास्त्रज्ञांना असे आढळून आले आहे की, ज्यावेळी युरोपमध्ये भयानक थंडी पडते, त्यावेळी भारतासारख्या विषुववृत्तीय प्रदेशात दुष्काळ पडतात आणि ज्यावेळी त्यांच्याकडे उष्ण हवामान असते, तेव्हा आपल्याकडे चांगला पाऊस पडतो. हे आपण गेली काही वर्षे वाढत्या उष्णतामानामुळे अनुभवतो आहोत. हे हे का घडून येते याचा अजून उलगडा झालेला नाही, परंतु हे घडते हे मात्र खरे!

उत्तर जोर्वे संस्कृतीचा उगम पूर्व जोर्वेतून झाला, हे त्या काळातील रंगीत भांडी, त्यांचे घाट, त्यांचा रंग, त्यांवरील नक्षी यांवरून उघड दिसून येते. परंतु त्यांचा पोत आता निकृष्ट दर्जाचा होतो. भांडी खरपूस भाजलेली नसतात, नक्षीतील वैविध्यही आता कमी झालेले असते. शेतीला अवकळा प्राप्त झालेली असते. लोकांचा शेतीपेक्षा शिकारीवर उदरनिर्वाह अधिक होऊ लागला. इ.पू. १००० च्या सुमारास तर इतकी अवकळा आली, की बहुतेक लोकांच्या नशिबी पशुपालन आणि शेळ्या- मेंढ्यांचे कळप घेऊन भटके जीवन जगणे प्राप्त झाले. स्थिर जीवनाची चैन आता संपली. पुढे इ.पू. ९०० च्या सुमारास सारे लोक देशोधडीला लागले. याच काळात कर्नाटकातील महापाषाणीय संस्कृतीच्या घोडेस्वारांचे महाराष्ट्रात आगमन झाले. त्यांच्याजवळ लोखंडाची शस्त्रे होती. पुढे कैक शतके शातवाहनांच्या उदयापर्यंत बहुसंख्य ठिकाणी वस्ती झाली नाही. काय झाले असावे महाराष्ट्राच्या आद्य बळीराजाचे ? बहुधा कंदमुळे-फळे खाऊन आणि

शिकारीवर त्याची उपजीविका होत असावी. याचा एक पुरावा बौद्ध वाङ्मयात मिळतो. एक बौद्ध भिक्षु गावात भिक्षा मागून शिजवलेले अन्न खातो. त्यावर दुसरा भिक्षु त्याला दोष देतो. निसर्गात एवढे खाद्य म्हणजे कंदमुळे-फळे इत्यादी असताना त्याने भीक मागण्याची जरूर नव्हती, असे त्याला म्हणावयाचे होते.

**घरे**

उत्तर जोर्वे काळात आर्थिक परिस्थिती अत्यंत खालावल्यामुळे लोकसंख्या पुष्कळ कमी झाली. इनामगावात एकूण पाच ठिकाणी पूर्व जोर्वे काळात वस्ती होती, ती आता फक्त तीन ठिकाणी शिल्लक राहिली. अगदी ठळक जाणवण्यासारखा बदल म्हणजे घरांचा आकार. पूर्वीची लांबरुंद चौकोनी घरे जाऊन त्यांच्या जागी लहान, गोलाकार घरे बांधण्यात आली (आ. ३.१३). ती योजनाबद्ध उभारलेली नव्हती. एकंदर वसाहतीचा आलेख पाहिला तर त्यात तीन-चार गोल झोपड्यांचे समूह असल्याचे दिसते (आ. ३.१४). ही घरे अत्यंत लहान, जेमतेम दीड-दोन मीटर व्यासाची असत. त्यांच्या भिंती बैठ्या, अर्धा-पाऊण मीटर उंचीच्या; पावसाचे पाणी घरात शिरू नये म्हणून उभ्या केलेल्या. त्या भोवती वासे रोवून वर कोनाकृती छप्पर, ते सपाटही असण्याची शक्यता आहे. घरातील जमीन चोपून तयार केलेली. आत खड्डा खणून त्यात चूल, एका बाजूला चार चपटे दगड, त्यावर चार खुरांचा रांजण उभा असे. धान्य साठवण्याची बळदे आणि कणग्यांसाठी मातीचे कट्टे आता आढळत नाहीत; कारण त्यात साठवण्याएवढे धान्यच आता लोकांजवळ नव्हते. अंगण चोपून तयार केलेले. त्यात चुलाणे असे ते शिकारीत मारलेले प्राणी भाजण्यासाठी असावे. शिकारीचे प्रमाण या काळात खूपच वाढलेले दिसते. प्राण्यांच्या हाडांवरून त्यासंबंधी निष्कर्ष काढता येतो.

चौकोनी घरांऐवजी गोल घरे का बांधण्यात आली? आजही भारतात- राजस्थानात आणि आंध्र-कर्नाटकाच्या दुष्काळी प्रदेशात अनेक लोक गोलाकार झोपड्यांत राहतात. याचे एक मुख्य कारण असे की, वाळवंटी प्रदेशात वारा खूप जोरात वाहत असतो, चौकोनी घरांचा त्याला अटकाव होतो, परंतु गोल घराच्या बाजूने तो निघून जातो. शिवाय शास्त्रज्ञांना असे आढळून आले आहे की, गोल झोपड्यांत राहणारे लोक वर्षभर तिथे राहत नाहीत. काही काळ त्यांना भटके जीवन जगावे लागते, त्यामुळे गोल झोपड्यात ते राहतात. त्या उभ्या करायला फारसा वेळ आणि विशेष साधनसामग्री लागत नाही. एका कुटुंबाला एका दिवसात झोपडी उभी करता येते. पुन्हा काही दिवसांनंतर ती सोडून जाताना फारसे नुकसान होत नाही.

मानवशास्त्रज्ञांना असे आढळून आले आहे की, गोलाकार झोपड्यांत राहणाऱ्या लोकांत बहुपत्नीत्वाची चाल असते. नवी बायको आणली की तिच्यासाठी नवी झोपडी उभारली जाते. या विधानाची सत्यता तपासून पाहण्यासाठी आम्ही इनामगाव उत्खननात सापडलेल्या गोल झोपड्यांमध्ये सापडलेल्या वस्तूंचा बारकाईने अभ्यास केला. त्यात आम्हांला असे आढळून आले की, तीन-चार झोपड्यांचा एक समूह म्हणजे एका कुटुंबाचे घर. कारण प्रत्येक समूहात फक्त एका झोपडीत चूल असते. इतर झोपड्यांतील वस्तूंवरून पुरुषाची एखादी आणि दोन-तीन स्त्रियांच्या असाव्यात असा निष्कर्ष काढता येतो. त्यावरून त्या काळात बहुपत्नीत्वाची चाल असावी असे म्हणणे चूक ठरणार नाही. आजसुद्धा वऱ्हाडातले कोहाळी नवी बायको आणली म्हणजे तिच्यासाठी नवी झोपडी बांधतात.

इ.पू. १००० पासून हवामान इतके प्रतिकूल झाले की धड गोलाकार झोपडी बांधणेसुद्धा अशक्य झाले. अखेरच्या काळातील झोपड्या अत्यंत निकृष्ट दर्जाच्या आहेत. त्यांचा आकारही धड नाही, त्यातील जमीनही चोपून केलेली नव्हती. केवळ चुलीवरून किंवा आतील दफनावरून ती झोपडी आहे असे म्हणता येते. फार थोडा काळ, तीन-चार महिने लोक तिथे राहत असावेत. हल्लीच्या धनगरांसारखे त्यांचे जीवन असावे. ते पावसाळ्यात फक्त तीन-चार महिने गावात वस्ती करून राहतात. पावसाळा संपला की शेळ्या-मेंढ्यांचे कळप घेऊन कोकणापर्यंत जातात आणि पावसाळ्याच्या सुरुवातीस पुन्हा गावाकडे परततात. अशा प्रकारचे जीवन उत्तर जोर्वे कालीन लोकांचे झाले असावे असे वाटते.

**शेती**

उत्तर जोर्वे काळात पर्यावरण अत्यंत प्रतिकूल झाल्यामुळे वारंवार दुष्काळ पडत असावेत. त्यामुळे शेती करणे अत्यंत जिकिरीचे झाले असावे यात शंका नाही. पाऊस पुरेसा नसल्यामुळे नदीला पूर नाही, तेव्हा कालव्यात पाणी येणे शक्य नव्हते, तो गाळाने भरून गेला. पाटाचे पाणी नसल्यामुळे गहू पिकवणे बंद झाले. मुख्य पीक बार्ली (सातू). या

काळात ज्वारी पिकवण्यास मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली. परंतु तेही पुढे अवघड झाले. त्यामुळे कंदमुळे फळे व शिकार यांवर भर अधिक. मासेमारीही वाढली. या काळात हरणांची शिकार खूप मोठ्या प्रमाणावर केली गेली हे त्यांच्या हाडांवरून सिद्ध होते. तसेच माळढोक (Indian bustard) पक्ष्यांची कत्तलही खूप केली. हा पक्षी आकाराने मोठा असतो आणि एका पक्ष्याचे सुमारे दहा किलो मांस मिळते. सध्या इनामगावाजवळ रेहकुरी इथे महाराष्ट्र सरकारने हरिण आणि माळढोक पक्ष्यांसाठी अभयारण्य निर्माण केले आहे. त्यामुळे यामुळे हा पक्षी निदान पाहावयास तरी मिळतो. तो जवळजवळ नामशेष झाला होता.

**सामाजिक स्थिती**

या काळात प्रतिकूल पर्यावरणामुळे लोकजीवन अत्यंत अस्थिर झालेले होते. बहुसंख्य मंडळी काही काळ भटके जीवन जगत असली तरी काही लोक वर्षभर वस्ती करून राहत असावेत. या काळातील एक मोठे, चार चौकोनी खोल्यांचे घर इनामगाव उत्खननात आढळून आले. ते वसाहतीच्या मध्यभागी नव्हते, तर पश्चिमेकडच्या टोकाला, नदीजवळ होते. त्यावरून तो पूर्व जोर्वे कालीन वसाहत प्रमुखांचा वंशज नसावा. त्याच्या घरात एक दफन सापडले. त्यात एक पुरुष आणि एक स्त्री असे दोन सांगाडे होते. पुरुष साधारणपणे २८ वर्षे वयाचा आणि स्त्री २२ च्या जवळची असावी. तिच्या कपाळावर खूण होती. बहुधा नवरा मेल्यावर तिच्या डोक्यात घाव घालून तिला मारून टाकले असावे व नंतर दोघांचे दफन केले असावे. या दफनात १४ भांडी ठेवलेली होती. यावरून त्यांच्या सुस्थितीची कल्पना येते. शिवाय या दोघांचे पाय तोडलेले नव्हते. त्यावरून तो कोणी महत्त्वाचा माणूस कदाचित वसाहत-प्रमुख-असावा असे दिसते.

**धार्मिक समजुती**

उत्तर जोर्वे काळात शेती खालावली होती आणि शिकारीवर अधिक भिस्त होती त्यामुळे सुफलनाची देवता शिरोहीन देवता या काळातही अस्तित्वात होती. तिच्या मातीच्या लहान आकृत्या सापडतात. इतर स्त्रीमूर्तीही तत्कालीन धार्मिक समजुतींशी निगडित असाव्यात. इनामगाव इथे या काळातील दोन मातीची चित्रे सापडली. ती एका मोठ्या चुलाण्याजवळ पडलेली होती. बहुधा गावजेवणासारख्या मोठ्या प्रसंगी कार्यक्रम निर्विघ्न पार पडावा म्हणून आधी त्यांची पूजा केली असावी, असे हल्ली प्रचलित असलेल्या प्रथेवरून म्हणता येईल. आजही तिथे गावात गावजेवण असले म्हणजे स्वयंपाकासाठी मोठे चुलाणे खोदतात आणि प्रथम कणकीची पुरुषमूर्ती तयार करून कार्यसिद्धीसाठी तिची पूजा करतात. आपल्याकडे अनेक प्रथा अतिप्राचीन काळापासून प्रचलित आहेत. पुरातत्त्वीय पुराव्याचा अन्वयार्थ लावण्यासाठी त्यांचा बहुमोल उपयोग होतो. त्यामुळे वांशिक पुरातत्त्व (Ethnoarchaeology) या विषयाच्या अभ्यासास आपल्याकडे भरपूर वाव आहे.

**दफने**

मृताचे दफन करण्याची पूर्व जोर्वे कालीन प्रथा त्या काळातही अस्तित्वात होती. लहान मुलाचे दफन दोन कुंभांत करत. अगदी लहान अर्भकासाठी एक कुंभही पुरे. त्यात शव ठेवून तो खड्ड्यात उभा पुरला जाई. प्रौढांचे दफन खड्डा खणून त्यात करत. दफनापूर्वी मृताचे पाय तोडून टाकत. या काळातील लहान मुलांची अनेक दफने उत्खननात आढळली. त्यावरून बालमृत्यूचे प्रमाण अधिक असावे. प्रतिकूल पर्यावरणाचा हा परिणाम असावा. या काळात सिकल सेल मलेरियाचा प्रादुर्भाव झालेला होता. अनेक मृतांच्या टाळूचा भाग खूप जाड झालेला आढळला. त्यावरून हा निष्कर्ष काढता येतो.

**अंत**

इ.पू. १००० नंतर पर्यावरण खूपच प्रतिकूल झाले आणि त्यामुळे या ताम्रपाषाण- युगीन शेतकऱ्यांना एके ठिकाणी वस्ती करून स्थिर जीवन जगणे केवळ अशक्य झाले आणि थोड्याच काळात त्यांच्या वसाहती उजाड झाल्या. बहुधा कंदमुळे-फळे गोळा करून आणि छोट्या प्राण्यांच्या शिकारीवर त्यांना दिवस काढावे लागत असावेत. या काळात उत्तर भारत सोडून बाकी साऱ्या देशभर ताम्रपाषाणयुगीन आणि नवाश्मयुगीन वसाहती उजाड झालेल्या दिसून येतात. महाराष्ट्रात या काळात महापाषाणीय लोकांचे आगमन झाले. परंतु त्यांचे जीवनही भटके होते. त्यांची वैशिष्ट्यपूर्ण दफने शेकड्याने आढळतात, परंतु त्यांच्या वसाहती अपवादात्मकच आहेत. त्या प्रामुख्याने वऱ्हाड-नागपूर भागात आहेत.

इतरत्र पुढे इ.पू. दुसऱ्या शतकात शातवाहनांच्या काळापर्यंत वसाहती सापडत नाहीत. काही ठिकाणी मौर्य काळापासून वस्ती झाल्याचा पुरावा आहे. परंतु त्यापूर्वीही काही ठिकाणी वस्ती झाली होती.

**महापाषाणीय घोडेस्वार ( Megalith Culture)**

ताम्रपाषाणयुगाच्या अखेरच्या काळात म्हणजे उत्तर जोर्वे काळात (इ.पू. १२००- ९००) पर्यावरण कमालीचे प्रतिकूल झाले होते. साऱ्या भारतभर थोड्याफार फरकाने हे घडून आले. ताम्रपाषाणयुगीन शेतकरी त्यामुळे देशोधडीला लागले होते. अनेकांना शिकार आणि कंदमुळे फळे यांवर गुजराण करावी लागली. काहींना शेळ्या-मेंढ्यांचे कळप घेऊन भटकंती करावी लागली. याच सुमारास आंध्र प्रदेशातून आणि कर्नाटकातून काही नव्या लोकांचे महाराष्ट्रात आगमन झाले. त्यांच्याजवळ विशेष म्हणजे घोडा होता आणि लोखंडी हत्यारे होती. त्यामुळे ताम्रपाषाणयुगीन संस्कृती नामशेष झाली. लोखंडाचे तंत्रज्ञान या नवीन लोकांना अवगत असले, तरी त्यांनी शेती करून स्थिर जीवन जगल्याचा फारसा पुरावा नाही. दुष्काळ अत्यंत कडक असल्यामुळे शेती शक्य नव्हती. या मंडळींच्या वस्त्याही सापडत नाहीत. घोडा जवळ असल्यामुळे त्यांचे भटके जीवन थोडेफार सुसह्य झाले असावे. त्यांची दफने फक्त सापडतात. ती दक्षिण भारतात हजारोंनी आहेत आणि महाराष्ट्रात शेकडो आहेत. महाराष्ट्रात ती प्रामुख्याने विदर्भात सापडतात. मध्य महाराष्ट्रात ती तुरळक . आहेत. विदर्भात पाऊस थोडा अधिक असल्याने हे लोक तिकडे गेले असावेत. या लोकांची संस्कृती म्हणजे महापाषाणीय संस्कृती.

या संस्कृतीला महापाषाणीय संस्कृती हे नाव दिले गेले आहे, याचे मुख्य कारण त्यांची दफने उभारण्यात मोठ्या शिलाखंडांचा वापर केलेला असतो. ही मेगॅलिथिक (Megalithic) संस्कृती. मेगॅलिथ या इंग्रजी शब्दाचा महापाषाण हा शब्दशः अर्थ होय. Megas हा ग्रीक शब्द, म्हणजे 'मोठा,' आणि lithos म्हणजे पाषाण. हे महापाषाण मृत व्यक्तीच्या दफनावर खूण म्हणून उभे केलेले असतात. महापाषाणीय स्मारके युरोप आणि आशिया खंडात अनेक ठिकाणी सापडली आहेत. विशेषतः पश्चिम आणि मध्य युरोप, इराण, पाकिस्तान, भारत, आग्नेय आशियातील काही देश इत्यादी आणि जपानमध्येही महापाषाणीय दफने आढळतात. यातील सर्वाधिक पश्चिम युरोपमध्ये आहेत. इंग्लंडमधील महापाषाणीय स्मारके खूप आधीची, नवाश्मयुगीन, इ.पू. ४०००-३००० या काळातील आहेत. जपानमधील इसवी सनाच्या सुरुवातीच्या शतकातील आहेत. परंतु इ.स. सातव्या शतकात तिथे एका राजाज्ञेनुसार महापाषाणीय स्मारके उभारण्यास बंदी घालण्यात आली. त्यात खूप पैसा आणि वेळ यांचा अपव्यय होतो, असे कारण सांगितले गेले.

भारतामध्येही महापाषाणीय दफने मोठ्या प्रमाणावर सापडतात. त्यांपैकी उत्तर प्रदेशातील वाराणशीच्या आसपासची स्मारके ताम्रपाषाणयुगीन, इ.पू. दुसऱ्या सहस्रकातील आहेत. महाराष्ट्रातील आणि दक्षिण भारतातील मात्र लोहयुगीन आहेत. नव्या शास्त्रशुद्ध कालमापनावरून त्यांची प्राचीनता इ.पू. १४०० इतकी मागे जाते. दक्षिण भारतात इ.स. पहिल्या शतकापर्यंत ती उभारली जात होती आणि पूर्व भारतात आसाम, नागालँड आणि इतर राज्यात तर अद्याप उभारली जातात. तेथील आदिम जमातीत ही प्रथा अजून प्रचलित आहे.

महापाषाणीय संस्कृतीसंबंधीचे संशोधन भारतात १८२३ मध्ये बॅबिंगटन यांनी सुरू केले. आजवर जवळजवळ दोन हजार महापाषाणीय संस्कृतीची स्थळे सापडली आहेत. परंतु त्यांपैकी सुमारे चाळीस स्थळांच्या ठिकाणी त्यांच्या वस्तीचा पुरावा मिळतो. महाराष्ट्रातील सुमारे शंभर स्थळांपैकी फक्त चार ठिकाणी त्यांच्या वस्तीच्या खुणा आढळतात. त्यावरून महापाषाणीय घोडेस्वार प्रामुख्याने भटके जीवन जगत होते हे सिद्ध होते. महापाषाणयुगीन दफनांचे अनेक प्रकार आहेत. त्यांपैकी महाराष्ट्रात शिला- वर्तुळे (Stone-circle) प्रामुख्याने सापडतात (आ. ४.१). त्यामानाने दक्षिणेत खूप विविधता आहे. अनेक शिला-वर्तुळांचे उत्खनन महाराष्ट्रात झाले आहे. त्यात प्रथम मृत्ताला पुरण्यासाठी खड्डा खणत. त्यात थोड्या अस्थी ठेवून भांडी ठेवीत. त्यात अन्नपाणी असावे. नंतर माती लोटून देत आणि त्या दफनाची खूण म्हणून त्याभोवती मोठाले शिलाखंड वर्तुळाकार मांडून ठेवले जात. वर्तुळाचा व्यास १० मीटर ते ३० मीटरपर्यंतचा असू शकतो. खड्यात लोखंडी हत्यारेही ठेवतात. काही दफनांत घोड्याचे अवशेष आढळतात. बहुधा घोडा बळी दिला जात असावा. मृत व्यक्तीच्या आर्थिक स्थितीनुसार घोड्याला आभूषणांनी सजवले जात असे.

विदर्भातील काही महापाषाणीय स्थळांचे शास्त्रशुद्ध उत्खनन करण्यात आले आहे. त्यामध्ये टाकळघाट, खापा, माहुरझारी, नायकुंड, भागीमारी, रायपूर इत्यादी उत्खननांत महत्त्वाचा पुरावा उपलब्ध झाला आहे. त्यावरून महापाषाणीय संस्कृतीवर महत्त्वाचा प्रकाश पडतो.

भारतात महापाषाणीय दफनात मानवी सांगाडे पुरलेले क्वचित आढळतात. त्यात थोड्याफार अस्थी असतात. विदर्भात केलेल्या उत्खननात काही ठिकाणी मात्र मानवी सांगाडे पुरलेले आढळले. परंतु त्यावरून शव नेमके कोणत्या दिशेत ठेवीत, हे निश्चित ध्यानात येत नाही. काही वेळा ते पूर्व-पश्चिम ठेवलेले आढळते. क्वचित एकाच खड्यात एकाहून अधिक सांगाडे सापडले. माहूरझरी (जिल्हा नागपूर) इथे एकाच खड्ड्यात दोन सांगाडे होते. असे तीन खड्डे तिथे होते. दोन व्यक्ती एकाच वेळेस मरण पावणे अशक्य नाही. कदाचित दुसरी व्यक्ती पहिल्यानंतर थोड्या काळात मरण पावल्यामुळे त्याचे दफन तिथेच केले असावे. त्या एकाच कुटुंबातील असण्याची दाट शक्यता आहे. माहूरझरी (जिल्हा नागपूर) येथील

दफनात मृताच्या शरीरावर व त्याच्या आसपास लाल माती पसरलेली आढळली. विदर्भातील महापाषाणीय स्थळांत माहूरझरी हे अत्यंत समृद्ध लोकांचे असावे असे त्यातील अवशेषांवरून म्हणता येईल. त्यात सुवर्णालंकार होते आणि घोड्याची हाडेही होती. बोरगाव (जिल्हा नागपूर) इथेही घोड्याची हाडे सापडली. ती एका दगडाच्या डोणीत ठेवलेली होती. भागीमारी (जिल्हा नागपूर) येथील एका शिला- वर्तुळात प्रत्येकी ३ × ३ मीटर आकाराच्या एका शेजारी एक लागून दोन भिंती होत्या व मधून जाण्यासाठी वाट ठेवली होती. त्यात मध्यभागी एक शिला-वर्तुळ होते आणि त्याला दक्षिणेकडच्या बाजूस आत जाण्यासाठी प्रवेश होता. रायपूर (जिल्हा नागपूर) इथेही अशाच प्रकारचे शिला-वर्तुळ होते आणि त्यात एकाला एक दगड लावून पेटी (cist) तयार केली होती. अशा प्रकारच्या पेट्या कर्नाटकात मोठ्या प्रमाणावर आढळतात. रायपूर येथील पेटीत तीन मानवांच्या अस्थी होत्या.असे आणखी एक शिला-वर्तुळ तिथे होते. त्यात मोठाले शिलाखंड लावून एक खोली तयार केलेली आढळली. तिचा आकार १.४० मीटर लांब, १.२५ मीटर रुंद आणि १.६० मीटर खोल होती. विशेष म्हणजे शिलाखंडांची आतली बाजू तासून सरळ केलेली होती, परंतु या खोलीत कोणत्याही प्रकारचे मानवी अवशेष सापडले नाहीत.

अलीकडे केलेल्या उत्खननात पाचखेडी (जिल्हा नागपूर) येथील उत्खननाचा उल्लेख अवश्य केला पाहिजे. तिथे मेनहीर म्हणजे उंच उभा केलेला खांबासारखा दगड - होते. हाही महापाषाणीय स्मारकांचा एक प्रकार आहे. महाराष्ट्रात तो दुर्मीळ असला तरी इतरत्र तो आढळतो. त्याला स्मारक म्हणणे उचित होईल, कारण त्याच्याखाली मानवी अवशेष किंवा खापरे इत्यादी काही आढळत नाहीत. पाचखेडीच्या मेनहीरच्या खालीही काही सापडले नाही. याशिवाय तिथे एका शिलावर्तुळात एक खड्डा खोदलेला होता. त्यातही मानवी अवशेष नव्हते. फक्त थोडी खापराची भांडी,

एक तांब्याचा वाडगा आणि काही लोखंडी हत्यारे होती. धामणे (जिल्हा नागपूर) येथील शिला वर्तुळात मध्यभागी मातीचा ढिगारा (cairn) होता. त्यात एक तांब्याचा वाडगा, लोखंडी परशू, आणि काही मौल्यवान खड्यांचे मणी आढळले. मानवी अवशेष मात्र नव्हते.

विदर्भातील महापाषाणीय शिला-वर्तुळांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, काही ठिकाणी त्यांच्या शिळांवर खोदून काढलेले वाडग्याच्या आकाराचे खोलगट भाग आढळतात. ते अर्थातच नैसर्गिक नसून मानवाने तयार केलेले आहेत यात शंका नाही. त्यांचे काय प्रयोजन असवे हे निश्चित सांगता येत नाही, अशा प्रकारचे खड्डे युरोपमधील महापाषाणीय स्मारकातही आढळतात. दफनविधीचा तो एक भाग होता किंवा कसे याबद्दल तर्क करणे अशक्य आहे.

**लोकजीवन**

महापाषाणीय संस्कृतीचे लोक कसे राहत असावेत याची थोडीफार कल्पना दफनात सापडलेल्या वस्तूंवरून करता येते. परंतु त्यांचे जीवन स्थिर असावे की, भटके याबद्दल विद्वानांत एकमत नाही. त्यांची हजारो दफने सापडली असली तरी त्यांच्या वसाहती क्वचितच आढळतात. परंतु त्यांनाही महापाषाणीय वसाहती का म्हणावे असा प्रश्न उभा राहतो. दक्षिण भारतात ज्यांना निखळ महापाषाणीय वसाहती म्हणता येईल, अशा जवळजवळ नाहीतच, फक्त विदर्भातच चार-दोन ठिकाणी महापाषाणीय दफने आणि त्यांच्या आसमंतात वसाहतींचे अवशेष आढळून आले आहेत. या काळातील दफनांची शेकडो स्थळे आहेत, परंतु वसाहती फक्त चार आहेत, हे विचारात घेतल्यास बाकीच्या ठिकाणी

त्या का नाहीत याचे स्पष्टीकरण द्यावे लागेल. या चार स्थळांना महापाषाणीय वसाहती म्हटले जाते त्याचे मुख्य कारण म्हणजे तेथील खापरे (pottery) आणि दफनात ठेवलेली खापरे यांच्यातील साम्य. परंतु महापाषाणीय लोकांचे जीवन भटके असल्यामुळे केवळ लोखंडाच्या वस्तू तयार करण्याशिवाय त्यांच्याजवळ दुसरे कसब नव्हते. खापरे तयार करावयाची म्हणजे त्याला स्थिर जीवन आवश्यक आहे. सर्वश्रेष्ठ पुरातत्त्वज्ञ गॉर्डन चाईल्ड तर म्हणतात की, दोनशेहून अधिक कुटुंबे किंवा हजारहून अधिक लोकसंख्या असल्याशिवाय वसाहतीला स्वतंत्र कुंभार परवडत नाही, म्हणजे त्याला पुरेसे काम मिळणार नाही; तेंव्हा महापाषाणीय लोकांच्या स्वतंत्र वसाहती असाव्यात असे म्हणणे धाष्ट्र्याचे होईल.
महापाषाणीय लोकांचे भटके जीवन कसे असावे हे जाणून घेण्यासाठी हल्ली त्यांच्यासारख्या जमाती कशा प्रकारचे जीवन व्यतीत करतात हे पाहणे मनोरंजक ठरावे. उत्तर भारतात हल्ली लोहाणा कुंभार नावाची एक जमात आहे. ते भटके जीवन जगतात. त्यांचा मुख्य व्यवसाय नित्योपयोगी लोखंडी वस्तू तयार करण्याचा. ते गावोगाव फिरतात. आठ-पंधरा दिवस ते एखाद्या गावात मुक्काम करतात. लोकांना वस्तू तयार करून विकतात. त्यावर ते उदरनिर्वाह करतात. अशा प्रकारचे जीवन महापाषाणीय लोकांचे असण्याची दाट शक्यता आहे.

विदर्भात सापडलेल्या स्थळांपैकी टाकळघाट, नायकुंड, भागीमारी आणि रायपूर ही स्थळे म्हणजे महापाषाणीय लोकांच्या वस्त्या होत्या, असे त्यांचे उत्खनक कै. शां. भा. देव यांनी प्रतिपादन केले आहे. त्यांच्या मते महापाषाणीय लोक निमभटके जीवन जगत असावेत आणि वर्षातील काही काळ बहुधा पावसाळ्यात ते एका ठिकाणी मुक्काम करून राहत असावेत. तेव्हा टाकळघाट इत्यादी ठिकाणी जे वसाहतीचे अवशेष सापडतात, ते महापाषाणीय लोकांचे असावेत. तिथे घरांचे अवशेष आढळून आले आहेत. घरांच्या चोपून तयार केलेल्या जमिनी या त्यांच्या झोपड्यांच्या असाव्यात. नायकुंड इथे गोल आणि चतुष्कोणी घरे सापडली. त्यांच्या जमिनी चुन्याने सारवलेल्या होत्या. एक आयताकार घर ६.५ ४ मीटर आकाराचे होते. भोवताली खांब होते. एका गोल झोपडीच्या मध्यभागी अंडाकृती (७० × ३० सेंटिमीटर) खड्डा होता. ती त्यांची चूल किंवा चुलाणे. झोपडीत आणखी दोन खड्डे होते. त्यात शेळ्या-मेंढ्या, गुरे, डुकरे, हरिण यांची हाडे होती. काही अर्धवट जळलेली होती. गव्हाचे जळके दाणे आणि वरवंटाही सापडला. भागीमारी येथील चूल नालाकृती होती. धान्य साठवण्यासाठी मातीच्या कणग्याही होत्या. या संदर्भात मानवशास्त्रज्ञांचे एक निरीक्षण नमूद केले पाहिजे. त्यांना असे आढळून आले आहे, की स्थिर जीवन जगणारे लोक प्रामुख्याने आयताकृती घरे बांधतात, तर निमभटके लोक गोल झोपड्यांत राहतात.

विदर्भात उत्खनन केलेल्या महापाषाणीय वसाहती तसे पाहिल्यास मोठ्या आहेत. नायकुंड, खैरवाडा या वसाहती तर एक लाख चौरस मीटरहून अधिक विस्ताराच्या आहेत. एका एकरास शंभर माणसे असा निष्कर्ष प्राचीन वसाहतीबद्दल तज्ज्ञांनी काढलेला आहे. तो मान्य केल्यास या स्थळांची लोकवस्ती अडीच हजाराच्या आसपास होती, असे अनुमान करता येईल. महापाषाणीय लोक जर निमभटके जीवन जगत होते, तर त्यांच्या वस्त्या इतक्या मोठ्या असू शकतील यावर विश्वास बसत नाही. तेंव्हा तथाकथित महापाषाणीय गावे ही वास्तवात महापाषाणीयांच्या समकालीन लोहयुगीन, परंतु स्थिर जीवन जगणाऱ्या लोकांची असण्याची दाट शक्यता आहे. गावातील मूळ रहिवाशांबरोबर निमभटक्या महापाषाणीय लोकांचे परस्परावलंबी संबंध निर्माण होऊन वर्षातील काही काळ त्यांचे तळ या खेड्यांजवळ पडत असावेत.

विदर्भ अणि आंध्र प्रदेशातील कोलाम या जमातीचे उदाहरण या संदर्भात लक्षणीय ठरेल, कोलाम ही प्रामुख्याने शिकार आणि जुजबी शेती यांवर उपजीविका करणाऱ्या निमभटक्या लोकांची जमात आहे. ज्या खेड्यात काही काळ मुक्काम ठोकायचा, त्याच्या प्रमुखाकडे ही मंडळी जाऊन जागेसाठी विनंती करतात. सहसा त्यांना गावाजवळ टेकडीच्या उतारावरची किंवा माळरानाची जागा वस्तीसाठी दिली जाते. त्यावर हे लोक आपली खोपटी उभी करतात. एका जागी ते चार-पाच वर्षांसाठी स्थिरावतात. दरवर्षी ठरावीक वेळी बहुधा पावसाळ्यात - ते तिथे येऊन राहतात. जोपर्यंत वस्ती असते तोपर्यंत त्यांची गावातल्या लोकांशी देवाणघेवाण सुरू असते. महापाषाणीय लोकांच्या बाबतीत असेच काहीसे घडले असावे. महापाषाणीय संस्कृतीचे लोक लोहारकामात तरबेज होते. गावातील लोकांना ते लोखंडी हत्यारे, नांगर इत्यादी पुरवत असावेत व त्या बदलात गावातील कुंभाराकडून मातीची भांडी ते घेत असावेत. हीच भांडी त्यांनी दैनंदिन

व्यवहारात आणि दफनात मृताला अन्नपाणी ठेवण्यासाठी वापरली. असे काहीसे घडल्यामुळे दफनातील भांडी आणि वस्तीतील भांडी यांच्यात साम्य आहे.

**समाज**

महापाषाणीय लोकांच्या सामाजिक स्थितीसंबंधात आपल्याला फक्त आडाखे बांधता येतात. महापाषाणीय दफन पद्धतीचे दहा-बारा प्रकार आहेत. शिलावर्तुळ, त्यात मध्यभागी दफनासाठी खड्डा, त्यावर मातीचा ढिगारा हा प्रकार प्रामुख्याने महाराष्ट्रात आहे. क्वचित चार दगडी फरशा उभ्या करून त्यावर एक फरशी अशी पेटी (cist) केलेली आढळते. हा प्रकार प्रामुख्याने आंध्र-कर्नाटकात आढळतो. खांबासारखे मेनहीरही महाराष्ट्रात दुर्मीळ आहे. दफनाच्या या निरनिराळ्या पद्धती निरनिराळ्या टोळ्यांच्या असाव्यात. तामिळनाडू, केरळमध्ये आणखी काही प्रकार पाहावयास मिळतात.

महापाषाणीय लोकांच्या एका टोळीमध्ये पंधरा-वीस कुटुंबे म्हणजे शंभराच्या आसपास लोक असावेत. त्यांचा कोणीतरी म्होरक्या असणारच. हल्लीच्या धनगरांप्रमाणे वर्षातून एकदा काही काळ एका ठिकाणी वस्तीसाठी जमल्यावर जमातीतील वाद सोडवणे, तरुणांची लग्ने जमवणे, गुन्हेगारांना शासन करणे इत्यादी कामे केली जात असावीत. पुढच्या प्रवासातील मुक्काम इत्यादींचे वेळापत्रक ठरवले जात असावे. जमातीतील एखाद्याचा मृत्यू झाल्यास त्याची विल्हेवाट लावून अस्थी गोळा करून ठेवत व त्यांचे विधिपूर्वक दफन तिथे पुन्हा वस्तीसाठी मुक्कामाला आल्यावर होत असावे. बहुधा त्यामुळेच दफनात फक्त काही अस्थी सापडतात.

**आहार**

महापाषाणीय लोकांचे जीवन निमभटके होते. त्यामुळे त्यांची उपजीविका ' शिकार आणि पशुपालन व जुजबी शेती यांवर होत असे. खरे म्हणजे शेती ते किती करत असावेत याबद्दल शंका आहे. कारण शेतीकामाची अवजारे त्यांच्या लोखंडी हत्यारांत क्वचित आढळतात. लोखंडी हत्यारांच्या बदल्यात ते गावातील शेतकऱ्यांकडून धान्य घेत असावेत. त्यांच्याजवळ शेळ्या-मेंढ्या, गायी-गुरे होतीच. हरिण, ससे, रानडुक्कर यांची ते शिकार करत. त्यांची हाडे उत्खननात मिळतात. मासेमारीही होती. धान्यांपैकी गहू, कुळीथही सापडतात. पाळीव जनावरांमध्ये घोडा महत्त्वाचा. त्यांच्या भटकंतीत त्याचा बहुमोल उपयोग होत असे. त्यांचा सर्व संसार त्यावर लादून नेला जात असणार. हल्लीचे महाराष्ट्रातील धनगरही घोड्यावर सामान बांधतात. घोडा या प्राण्याबद्दल विद्वानांत वाद आहेत. सिंधु संस्कृतीच्या लोकांजवळ घोडा नव्हता. तो उत्तर सिंधु काळात इ.पू. २००० च्या सुमारास आला याचा निश्चित पुरावा आहे. आर्यांचा तो अत्यंत लाडका प्राणी. महापाषाणीय लोकांचाही फार आवडता. म्हणून तो दफनाच्या वेळी बळी दिला जात असे. परंतु सर्वांना घोडा परवडण्यासारखा नव्हता. त्याचे अलंकार दफनात सापडतात (आ. ४.२). अशी दफने फार थोडी. तेव्हा ती टोळीच्या प्रमुखांची असावीत असे अनुमान करणे चूक ठरणार नाही.

**भांडी**

दफनात मातीची भांडी पुष्कळ सापडतात. त्यात अन्न-पाणी ठेवले जात असावे. मृताला त्याच्या मरणोत्तर जीवनात ते उपयोगी पडावे म्हणून ठेवले जात असणार. या भांड्यांपैकी सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण म्हणजे काळी-तांबडी भांडी. पूर्वी अशी भांडी फक्त दक्षिणेतील महापाषाणीय दफनात आढळतात असा समज होता, परंतु गेल्या काही वर्षांत त्यांची प्राचीनता आणि व्याप्ती खूपच मोठी असल्याचे सिद्ध झाले आहे. गुजरातमधील सिंधु संस्कृतीच्या लोकांजवळ अशी भांडी होती आणि साडेपाच हजार वर्षांपूर्वी राजस्थानातील आहाड संस्कृतीचे लोक ती वापरत असत. इसवी सनाच्या पहिल्या-दुसऱ्या शतकापर्यंत ती भारतात सर्वत्र वापरात होती. त्यानंतर मात्र ती कोठेही सापडत नाहीत. भारताबाहेर ती इजिप्त आणि ग्रीसमधील नवाश्मयुगीन लोक पाच हजार वर्षांपूर्वी वापरत असत.

ही काळी-तांबडी भांडी बनवण्याचे विशिष्ट तंत्र होते. परंतु त्याबद्दलही वाद आहे. ही भांडी बाहेरच्या बाजूस काठाजवळ काळी आणि बाकीचा भाग लाल असतो; आतून मात्र संपूर्ण काळी असतात. काही वर्षांपूर्वी गॉर्डन चाईल्ड यांनी ही भांडी भट्टीत उलटी ठेवल्यामुळे काळी-तांबडी झाली असे प्रतिपादन केले. हे मत आपल्याकडे मान्य झाले. भाजताना भांडी पालथी रचल्यामुळे ज्या भागाला प्राणवायू (ऑक्सिजन) पुरेसा मिळाला, तो भाग लाल होतो आणि ज्या भागाला तो मिळत नाही, तो काळा होतो, असे त्यांचे मत होते. परंतु प्रयोगांती हे शक्य नाही असे ल्युकस नावाच्या एका

विद्वानाने दाखवून दिले. त्यासाठी भांड्याचा जो भाग काळा करावयाचा असतो, तो भाग शेण, भाताचा तूस यांसारख्या पदार्थाने लिंपणे जरुरीचे आहे. त्यामुळे तेवढा भाग प्राणवायू न मिळाल्यामुळे काळा होतो आणि बाकीचा लाल राहतो. परंतु उलटी ठेवल्यामुळे भट्टीत भांडी लाल-तांबडी होतात, त्यांचा रंग फिकट राहातो. गडद रंग हवा असल्यास मात्र 'भांडी दोनदा भाजावी लागतात. संस्कृतीच्या प्राथमिक अवस्थेत असणाऱ्या लोकांना भांडी दोनदा भाजणे परवडण्यासारखे होते असे वाटत नाही. काळ्या-तांबड्या भांड्यांचे अनेक आकार आहेत. परंतु त्यात प्रामुख्याने वाडगे, वाट्या, कुंडे आणि थाळ्या आढळतात. त्यांचा पोत तसा भरडच असतो. भांडी चाकावर घडवलेली असतात. त्यांच्या पृष्ठभागावर एक प्रकारची झळाळी असते. दगडी मण्यांच्या माळा घासून अशा प्रकारची झळाळी आणता येते. त्यावर रंगीत नक्षी किंवा कोरीवकाम नसते. या प्रकारची अतिप्राचीन भांडी (इ.पू. ३५००) राजस्थानात आहाड संस्कृतीच्या लोकांनी प्रथम निर्माण केली. त्यांच्या संपर्कामुळे गुजरातमधील सिंधु संस्कृतीच्या लोकांनीही ती तयार केली. तिथून ती महाराष्ट्रात ताम्रपाषाणयुगात आली. दक्षिणेत नवाश्मयुगात ती वापरात होती. पुढे इतिहासकाळात त्यांचा भारतभर प्रसार झाला. इ.स. दुसऱ्या शतकानंतर ती कुठेही आढळत नाहीत. तांबडी भांडीही मोठ्या संख्येने महापाषाणीय दफनात सापडतात. तीही भरड पोताची आहेत. त्यातील काही भांड्यांवर चमक दिसते. त्यात अभ्रक मिसळल्यामुळे ती चमकदार झाली. ती पक्की भाजलेली नसतात, त्यामुळे लवकर फुटतात.

**लोखंडाच्या वस्तू**

महापाषाणीय लोक कुशल लोहार होते त्यामुळे त्यांच्या दफनांत लोखंडाच्या अनेक वस्तू सापडतात. त्यात दैनंदिन वापराच्या वस्तू आणि हत्यारे व शस्त्रे आढळतात. तलवारी, खंजीर, भाले, कुन्हाडीही त्यात प्रामुख्याने आहेत. शेतीची अवजारे जवळजवळ नाहीत. एखादे विळ्यासारखे हत्यार क्वचित आढळते. विदर्भातील महापाषाणीय संस्कृती ताम्रयुग आणि लोहयुग यांच्या संक्रमणकाळात उदयास आल्यामुळे एखाद्या वस्तूचा एक भाग तांब्याचा आणि दुसरा लोखंडाचा असतो. माहुरझरी इथे मिळालेल्या खंजिराचे पाते लोखंडाचे आणि मूठ तांब्याची आहे. खिळे, डाव, दिवे हे मोठ्या प्रमाणावर सापडतात. कुळवासारखी दिसणारी एक वस्तू आहे. शेतीसाठी त्याचा वापर होत असावा. घोड्याची रिकीब लोखंडाची होती. ती अतिप्राचीन आहे. महापाषाणीय दफनांच्या उत्खननात सापडलेल्या वस्तूंच्या शास्त्रीय विश्लेषणावरून असे दिसून येते की, त्यांनी नागपूरच्या आसपास उपलब्ध असलेल्या उच्च प्रतीच्या खनिजाचा वापर केला. त्यातून गाळलेले लोखंड अत्यंत शुद्ध (९९ टक्के) आहे. खनिजापासून ते लोखंड कसे गाळत असावेत याचा उत्कृष्ट पुरावा नायकुंड उत्खननात मिळाला. तिथे एका लोखंडाच्या भट्टीचा शोध 'रेझिस्टिव्हीटी' चाचणीमुळे लागला. तिथे १.२५ मीटर खोलीवर ही महापाषाणीय भट्टी होती. ती ४ सेंटिमीटर जाडीच्या बाकदार विटांची बांधलेली होती. तिचा व्यास ३० सेंटिमीटर व उंची २५ सेंटिमीटर होती. तिचा आतील भाग सतत जळल्यामुळे काळा झाला होता. शुद्ध लोखंडाचा रस खनिजापासून वेगळा झाल्यावर उरणारा गाळ काढून टाकण्यासाठी तळाशी तोंड ठेवलेले होते. त्यामुळे भट्टीच्या तळाच्या विटांवर अशा गाळाचा व राखेचा एकत्रित थर पक्का जमून विटा एकजीव झाल्या होत्या. भट्टीतील जाळ प्रज्वलित ठेवण्यासाठी भात्याच्या बोगद्यासारख्या दोन मातीच्या नळ्यांचे बांधकाम केलेले आढळते. यातील एक सततच्या धगीमुळे चकाकीदार झालेली होती. भात्याच्या फुग्यातील हवा या नळ्यांद्वारे भट्टीपर्यंत पोहोचत असे. एक किलो खनिजातून ३५० ग्रॅम शुद्ध लोखंड मिळते. त्यावरून महापाषाणीय लोहार एका वेळेस १०-१२ किलो खनिज गाळून तीन किलो शुद्ध लोखंड तयार करत होता.

अलंकार

दफनांच्या उत्खननात तांब्याच्या वस्तूही आढळतात. हत्यारांसाठी लोखंड असल्यामुळे तांब्याचा उपयोग दागिने तयार करण्यासाठी केला जाई. बांगड्या, घोड्याचे अलंकार, घंटा आणि काही भांडी तांब्याची होती. घोड्याच्या तोंडावर बसवण्याचा एक अलंकार तांब्याच्या पातळ पत्र्यापासून बनवलेला आहे. त्याच्या वरचा भाग चंद्रकोरीच्या आकाराचा व खालचा वर्तुळाकार आहे. पत्र्यावर तांब्याच्या टोकदार मुठी ठोकून बसवल्या होत्या. त्यांना आतील बाजूस खिळे ठोकलेले होते. या प्रकारचे घोड्याचे अलंकार भारतात इतरत्र कोठेही आजवर सापडले नाहीत. मणी मोठ्या प्रमाणावर सापडतात. गारेचा दगड, अकीक, चर्ट इत्यादी मौल्यवान दगडांचे मणी तयार करत. पोवळे, शंख, इंद्रनील (lapis lazuli) यांचेही मणी त्यात आहेत. परंतु सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण मणी अकीकाचे आहेत. त्यातील काही मण्यांवर कोरीव

पांढरी नक्षी असते. त्यात ठिपके, रेषा, चौरस इत्यादी चिन्हे आहेत. अशा प्रकारचे नक्षीदार मणी सिंधु संस्कृतीचे लोक वापरत आणि निर्यातही करत. अगदी अलीकडे एकोणिसाव्या शतकापर्यंत अशा प्रकारचे मणी भारतात तयार करत असत.

या मण्यांवरील पांढरी कोरीव नक्षी काढण्याचे एक विशिष्ट तंत्र होते. मण्यांना छिद्रे पाडण्याआधी त्यांवरील कोरीव काम पुरे केले जाई. कोरून काढलेल्या खाचेत पोटॅश, व्हाइट लेड (पांढरे शिसे?) आणि किरार (Copris aphylla) नावाच्या वनस्पतीचा रस यांचे मिश्रण भरत. त्यानंतर मणी निखाऱ्यात भाजले जात. त्यामुळे ते रंगाने लालभडक होत. अकीक, गार, चर्ट इत्यादी दगड आपल्याकडे अनेक ठिकाणी उपलब्ध आहेत. परंतु उत्तम प्रतीचा इंद्रनील (lapis lazuli), अफगाणिस्तानातील उत्तरेकडच्या बदकशान टेकड्यांत मिळतो. थोडाफार अजमेरच्या जवळ आहे. अलीकडे बलुचिस्तानात चांगी इथे लॅपिसच्या खाणी सापडल्या आहेत याचा उल्लेख करणे आवश्यक आहे. खरे म्हणजे भटके जीवन जगणाऱ्या महापाषाणीय लोकांना लॅपिस परवडणारा नव्हता, असे वाटणे साहजिक आहे. परंतु महाराष्ट्रातले धनगर आणि गुजरातमधील रबाडी हे भटके जीवन जगणारे लोक सोने किती विकत घेतात हे पाहिले म्हणजे महापाषाणीय लोकांनी लॅपिस वापरणे अशक्य नव्हते हे पटते.

काही महापाषाणीय दफनांतून काचेचे मणी मिळाले आहेत. ते इ.पू. सातव्या शतकातील आहेत. परंतु भारतात इ.पू. दहाव्या शतकात काच प्रथम तयार केली गेली हे ध्यानात ठेवणे आवश्यक आहे.

**प्रसाधन**

शवाचे दफन करताना त्याला त्याच्या मरणोत्तर जीवनात उपयोगी पडावे म्हणून अन्नपाणी ठेवतच, परंतु कुटुंबाच्या आर्थिक कुवतीनुसार त्याला अलंकारही घालत. काही दफनांत शंखाच्या आणि तांब्याच्या बांगड्या, अंगठ्या, मण्यांच्या माळा आढळून आल्या. इतकेच नव्हे, तर काहींमध्ये सोन्याचे दागिनेही होते. जुनापाणी येथील एका दफनात सोन्याच्या बांगड्या, तर माहूरझरी येथे सोन्याचे वेढणे आणि कर्णभूषणही मिळाले. याशिवाय एक हस्तभूषणही होते. सोन्याच्या पट्ट्यांवर पर्णाकृती पदक असलेले एक हस्तभूषण माहुरझरी इथे मिळाले. जुनापाणी येथील एक दफनात एका चपट्या मण्यांचे हस्तभूषण होते. काही दफनांत चांदीचे अलंकारही आढळले. जुनापाणी येथील एका दफनात चांदीचे बुंदके होते. एक सोन्याचे वेढे नायकुंडला सापडले. आणखीही काही अलंकार होते, परंतु त्यांची मोडतोड झालेली होती. विदर्भातील या सोन्याच्या दागिन्यांत चांदीचे प्रमाण जाणवण्यासारखे होते. जुनापाणी येथील अलंकारांत ते ५१ टक्के इतके होते. हे मिश्रण हेतुपुरस्सर केलेले होते असे तज्ज्ञांचे मत आहे. त्यावरून अडीच हजार वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्रातील सोनारांचे कसब ध्यानात येते. विदर्भात भंडारा जिल्ह्यात सोने थोडेफार सापडते. महापाषाणीय सोनारांनी ते वापरले असण्याची दाट शक्यता आहे.

प्रसाधनाच्या काही वस्तू महापाषाणीय दफनांच्या उत्खननात सापडल्या आहेत. फण्या, आरसा (तांब्याचा) आणि नखे कापण्याचे उपकरण हे माहुरझरी उत्खननात मिळाले. नखे कापण्याचे उपकरण हल्ली न्हाव्यांजवळ असणाऱ्या उपकरणासारखे आहे. फण्या बहुधा लाकडी होत्या. खापा येथील एका टिकावासारख्या अवजारावर तिचा ठसा उमटलेला दिसला. त्यामुळे ती लाकडाची असावी असे अनुमान करता येते. ती हल्ली खेड्यांत वापरतात, त्यापेक्षा निराळी नाही. ती ६ सेंटिमीटर लांब आणि २ सेंटिमीटर रुंद होती. अंदमान-निकोबार बेटांत हल्लीसुद्धा अशा प्रकारच्या शिंपाच्या फण्या तेथील आदिम जमाती वापरतात. स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्रातही लाकडी फण्या वापरात होत्या.

**धार्मिक समजुती**

महापाषाणीय लोकांचा मरणोत्तर जीवनावर विश्वास होता हे त्यांच्या दफनांवरून म्हणता येईल. त्यात संपूर्ण मानवी सांगाडा क्वचितच सापडतो. त्यावरून मृत्यूनंतर शव काही काळ उघड्यावर ठेवून, त्याचे मांस पक्ष्यांनी खाल्ल्यावर राहिलेल्या काही अस्थी गोळा करून त्यांचे विधिपूर्वक दफन केले जात असावे. महाभारतात (३,८५.६) अशा पद्धतीचा उल्लेख आहे. त्यात झाडावर किंवा उघड्यावर प्रेत ठेवून ते मोराने (सिति-कण्ठ) खाल्ल्यावर अस्थी गोळा करत असत. बहुधा यामुळे उत्तर सिंधु संस्कृतीच्या एका अस्थिकुंभावर मोराचे चित्र असून त्याच्या पोटात एक मानवी आकृती उताणी झोपलेली दाखवली आहे. त्याचे स्पष्टीकरण महाभारतात मिळते. या संदर्भात खापा आणि माहुरझरी येथील दफनांचा उल्लेख अवश्य केला पाहिजे. तिथे अस्थिकुंभ होते, त्यात अस्थी होत्या व त्यांवर झाकणेही होती. ती वैशिष्ट्यपूर्ण होती.

त्यांच्या वरच्या बाजूस पक्षी बसवलेले होते. अतिप्राचीन काळापासून मातृदेवता आणि पक्षी यांचा अतूट संबंध होता. त्यात प्रामुख्याने कबुतरे. तेव्हा मातेच्या उदरी पुन्हा जन्म व्हावा ही त्यामागची भावना असावी.

काही दफनांमध्ये घोड्याची हाडे सापडल्याचा पूर्वी उल्लेख केला आहे. परंतु अशी दफने खूपच दुर्मीळ; कारण सर्वसामान्य माणसाला घोडा परवडणे शक्य नाही. एखाद्यालाच, खरे म्हणजे टोळीच्या म्होरक्याला, ते शक्य होणार. तेंव्हा ज्या दफनात घोडा बळी दिल्याचा म्हणजे घोड्याची हाडे सापडल्याचा पुरावा आढळला, ते टोळी प्रमुखाचे असावे असे अनुमान केल्यास चूक ठरणार नाही.

**काळ**

आता आपल्याला शास्त्रीय कालमापनाच्या काही पद्धती उपलब्ध आहेत. परंतु त्यापूर्वी म्हणजे १९५० च्या आधी कोणत्याही प्राचीन संस्कृतीचा कालनिर्णय त्यापू करणे हे अत्यंत जिकिरीचे काम होते. महापाषाणीय दफनांचा कालनिर्णय सर्वप्रथम सर मॉर्टिमर व्हीलर यांनी केला. ब्रह्मगिरी (कर्नाटक) येथे त्यांनी त्यासाठी उत्खनन केले. तिथे सापडलेल्या सांस्कृतिक कालक्रमावरून व रोमन नाणी आणि खापरे यांच्या पुराव्याच्या साहाय्याने त्यांनी तेथील दफनांचा काळ इ.पू. तिसरे शतक ते इ.स पहिले शतक असा निश्चित केला. परंतु अलीकडे शोधून काढण्यात आलेल्या रेडिओ-कार्बन (C-१४) आणि तप्तदीपन (Thermoluminescence) या शास्त्रीय कसोट्या लावून केलेल्या कालनिर्णयानुसार कर्नाटकातील महापाषाणीय दफनांचा काळ आणखी एक हजार वर्षे मागे जातो असे सिद्ध झाले आहे. त्यामुळे लोहयुगाची सुरुवातही तितकी मागे नेता येते.

विदर्भातील महापाषाणीय संस्कृतीच्या दफनांचे शास्त्रशुद्ध कालमापन झाले आहे. टाकळघाट येथील महापाषाणीय वसाहतीसंबंधी दोन तारखा - इ.पू. ५०५ व इ.पू. ६०५ - उपलब्ध आहेत. अर्थात ही वसाहत महापाषाणीय लोकांची होती हे गृहीत धरले आहे. त्यावरून तेथील वसाहतींची सुरुवात इ.पू. ७००च्या सुमारास झाली असावी, असे म्हणता येईल. नायकुंड येथील दोन शिलावर्तुळांतील कोळशाचे रेडिओ-कार्बन पद्धतीने केलेले कालमापन अधिक विश्वसनीय असल्यामुळे त्याला निश्चिती येते. इ.पू. ५०५/१०० आणि इ.पू. ५४५१०५ अशा दोन तारखा उपलब्ध झाल्या आहेत. तेथील समकालीन वसाहतीसंबंधीची एक तारीख इ.पू. ६९०-११० अशी आहे. ती वसाहतीच्या सुरुवातीच्या थराची आहे आणि तिच्या अंताची एक तारीख इ.पू. ३००१०० अशी आहे. या सर्वांचा विचार करता विदर्भातील महापाषाणीय संस्कृतीकाळ इ.पू. ७००-३०० असा निश्चित करता येतो. कर्नाटकातील हळ्ळूर (जिल्हा धारवाड) येथील महापाषाणीय संस्कृतीचा काळ या आधीचा आहे. तेथील इ.पू. ९५५ आणि ११०५ अशा दोन तारखांमुळे तिथे महापाषाणीय संस्कृती इ.पू. १००० पर्यंत मागे जाते. अलीकडे तप्तदीपन (TL) पद्धतीने कर्नाटकातील महापाषाणीय संस्कृती इ.पू. १४०० पर्यंत मागे जाते. त्यामुळे लोहयुगाची सुरुवातही मागे नेता येते. उत्तर भारतातही आता लोहयुगाची सुरुवात इ.पू. १५०० मध्ये झाली असल्याचा पुरावा मिळाला आहे आणि ती आणखी मागे जाण्याची शक्यता आहे.

**कोण होते हे लोक?**

केवळ विदर्भातच नव्हे, तर भारताच्या इतर भागांत, प्रामुख्याने दक्षिण भारतात, महापाषाणीय दफनात संपूर्ण मानवी सांगाडे फार क्वचित आढळतात. त्यामुळे हे लोक कोण होते, कोठून आले, यासंबंधी निश्चित पुरावा मिळत नाही. केवळ किरकोळ अस्थींवरून त्यासंबंधी निष्कर्ष काढता येत नाही. आता नव्याने उपलब्ध झालेल्या गुणसूत्र (DNA) चाचणीवरून मात्र ते करणे शक्य होईल. परंतु हा अभ्यास आपल्याकडे अद्याप बाल्यावस्थेत आहे.

महापाषाणीय संस्कृतीच्या लोकांसंबंधी जे काही निष्कर्ष पूर्वीच्या विद्वानांनी काढले आहेत, ते निर्णायक पुराव्याअभावी ग्राह्य होण्यासारखे नाहीत. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास कर्नल मिडोज टेलर यांनी त्यावेळच्या हैदराबाद संस्थानातील काही दफनांचे उत्खनन केले होते. ती दफने त्यांनी सेल्ट-ईइड लोकांची किंवा शक लोकांची असावीत असे सुचवले होते. जे. डब्ल्यू, ब्रीकस् यांना महापाषाणीय लोक येथील निलगिरी पर्वताच्या परिसरात राहणाऱ्या एखाद्या जमातीचे असावेत असे वाटले. काहींनी ते कर्नाटकातील कुरुबा या धनगर जमातीचे असावीत असे प्रतिपादन केले. प्रा. जी.एस. धुर्वे यांनी यांनी त्यांची त्यांची तुलना इजिप्तमधील प्राचीन दफनांशी केली. प्रा. ब्रिजबासीलाल यांनी इजिप्तच्या न्युबिया वाळवंटातील दफनांचे उत्खनन केले. त्यात सापडलेल्या काळ्या-तांबड्या खापरांचे महापाषाणीय खापरांशी असलेले विलक्षण साम्य त्यांनी दाखवून दिले. त्यावरील कोरलेली चिन्हेही समान

आहेत. प्रसिद्ध पुरातत्त्वज्ञ गॉर्डन चाईल्ड यांनी भारतातील आणि युरोपीय महापाषाणीय दफने, विशेषकरून त्यातील शवपेटिका (cist), यांच्या साम्यावरून ही संस्कृती युरोपातून इराणमार्गे सिंधमध्ये आणि भारतात आली असण्याची दाट शक्यता आहे हे दाखवून दिले. दफनपद्धती आली असणे शक्य आहे, परंतु तेथील लोक इकडे आले असे म्हणणे पुराव्याअभावी धार्ष्याचे ठरेल. या संदर्भात एक गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे ती ही, की या संस्कृतीचा उगम व विकास भारतातच झाला असे दाखवणारा पुरावा आपल्याकडे नाही; ती सापडते, ती पूर्ण विकसित स्वरूपात. ती प्रामुख्याने दक्षिणेत विस्तारित असल्यामुळे द्राविडी होती याबद्दल विद्वानात एकमत आहे. परंतु याबद्दलही शंका घेण्यास जागा आहे. उत्तर भारतात अलाहाबाद, वाराणसी प्रदेशात, मध्य गंगेच्या खोऱ्यात आता ताम्रपाषाणयुगीन महापाषाणीय दफनांचे उत्खनन झाले आहे. ती इ.पू. १८००-१४०० या काळातील आहेत. तेव्हा हे लोण उत्तरेकडून दक्षिणेत आले असण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महापाषाणीय दफनांत सापडलेल्या अस्थींचा आणि मानवी सांगाड्यांचा अभ्यास मानववंशशास्त्रज्ञांनी केला आहे. झुकरमन या पंडिताने आदिचन्नलूर (तामिळनाडू) येथील महापाषाणीय लोक भारतीय उपखंडाबाहेरचे होते असे प्रतिपादन केले. फादर हेरास यांनी ते लोक भूमध्य (Mediterranean) वंशाचे होते व त्यांच्यातूनच पुढे द्राविडी वंश निर्माण झाला, असे सांगितले. सर मॉर्टिमर व्हीलर यांच्या मते कॅस्पियन समुद्राच्या प्रदेशातील लोक व भारतीय यांच्या संकरातून महापाषाणीय संस्कृती निर्माण झाली. परंतु मानवी सांगाड्यांचा सर्वंकष अभ्यास करून प्रा. केनेथ केनेडी यांनी महापाषाणीय लोक परकीय नसून भारतातील होते असा निष्कर्ष काढला आहे.

आजवर केलेल्या उत्खननात मस्की (कर्नाटक) आणि यल्लेश्वरम (आंध्र प्रदेश) इथेच फक्त संपूर्ण मानवी सांगाडे सापडले आहेत. मानवशास्त्रज्ञांच्या मते महापाषाणीय संस्कृतीचे लोक आणि हल्लीचे द्रविडीयन यांच्यात लक्षणीय साम्य आहे. विदर्भातील दफनांत सापडलेल्या अस्थींचा अभ्यास केनेडी यांनी केला आहे. यावरून दफनात २२ ते ३२ या वयोगटातील लोक प्रामुख्याने दिसतात. त्यात अधिक पुरुष आहेत. याउलट १६ ते २२ या वयोगटात स्त्रियांची संख्या अधिक आहे. दोन उदाहरणांमध्ये घोड्यावर सतत बसणाऱ्यांमध्ये ज्या विकृती आढळतात, तशा प्रकारच्या खुणा मांडीच्या हाडांवर आढळल्या. लहान मुलांची (वय ५ ते ९ वर्षे) फक्त चार दफने होती. लोकांचे आरोग्य फारसे चांगले नव्हते. त्यांच्या दातांची वाढ अपुरी होती. मांडीची हाडे वाकून पाय फेंगडे झाले होते. हाडांची वाढ खुंटल्याची ही लक्षणे 'ड' जीवनसत्त्वाचा अभाव, मुडदूस, सूर्यप्रकाशाचा अभाव आणि पूरक आहार न मिळाल्याची लक्षणे होत. दाढांचा आकार मोठा होता. त्यावरून आहार मिश्र असावा असे केनेडी यांचे मत आहे. कंदमुळे फळे आणि वनस्पती यांवर उदरनिर्वाह करणाऱ्यांच्या दाढा मोठ्या असतात.

महापाषाणीय लोक 'आर्य' होते किंवा 'द्रविड' या वादात आता अर्थ नाही, कारण मानवशास्त्रज्ञांच्या मते 'वंश' ही संकल्पनाच चुकीची आहे. एकूण पुरावा पाहता असे दिसून येते की, महापाषाणीय लोक इथलेच रहिवासी होते.

महापाषाणीय घोडेस्वार / ७९